# आंगण

## मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

## नियतकालिक १९८५-८६


-प्रमुख संपादक-

प्रा. प्र. ना. हुपरीकर

-विद्यार्थी प्रतिनिधी-

श्री. र. सो. नारखेडे

श्री. र. मा. मोराणकर

## आमचे नूतन उपप्राचार्य



प्रा. डॉ. एस्. आर्. चिरमाडे



प्रा. एम्. के. येवले

# मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव

LIBRARY
RECEIVED
11-8-86
Date
Signature

KNOWLEDGE IS POWER

# अजिंठा

## ( नियतकालिक १९८५-८६ )

-:० प्रमुख संपादक ०:-

**प्रा. प्र. ना. हुपरीकर**

-:० विद्यार्थी प्रतिनिधी ०:-

श्री. रविंद्र सोपान नारखेडे टी. वाय बी. एस्सी.

श्री. रविंद्र माधवराव मोराणकर एस वाय. बी ए.

मुखपृष्ठ सजावट— श्री राजेंद्र सोनार

प्रकाशक
प्रा. प्र. ना. हुपरीकर
मु. जे. महाविद्यालय
जळगांव ४२५ ००२.

मुद्रक
श्री. सो. ना. चौधरी
स्वस्तिक प्रिंटींग प्रेस,
१०३, पोलन पेठ, जळगांव

# मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव

# अजिंठा

## १९८५-८६

### -o संपादक मंडळ o-

प्राचार्य- **डी. एस. नेमाडे**
उपप्राचार्य- **डी. एच. महाजन**
उपप्राचार्य- **एम. के. येवले**
उपप्राचार्य- डॉ **एस. आर. चिरमाडे**
प्रमुख संपादक- प्रा. **प्र. ना. हुपरीकर**

प्रा. डॉ. सौ. साळवेकर
प्रा सौ. गोखले
प्रा. डॉ एच बी. चौधरी
प्रा. शा. न पाटील
प्रा. एन डी. पाटील
प्रा. अकबर रेहमानी

विद्यार्थी प्रतिनिधी

१) रविंद्र सोपान नारखेडे
टी. वाय. बी. एससी.
२) रविंद्र माधवराव मोराणकर
एस. वाय. बी. ए.



# संपादकीय

अजिंठा नियतकालिकेच्या या अंकाद्वारे आपल्याशी हितगुज करताना आम्हास मनस्वी आनंद होत आहे. या अंकाद्वारे आमच्या महाविद्यालयातील विविध प्रकारच्या उपक्रमांची आणि हालचालींची कल्पना आपणास करून देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

देशातील सध्याची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती पाहिल्यानतर मन बेचैन होते. अतिरेक्यांच्या कारवाया, हिंसाचार, राजकीय पक्षांतर्गत हेवेदावे ही आज आपल्यापुढील फार मोठी आव्हाने आहेत. गेल्या वर्षी पंजाबचा आणि आसामचा प्रश्न सोडविण्यात सरकारला यश आले. लोकशाहीच्या परंपरेला अनुसरून त्या ठिकाणी निवडणूका घेण्यात आल्या. विरोधी पक्ष सत्तेवर आले. यावरून आपल्या देशात लोकशाही कशी मजबूत आहे हे आपण जगाला दाखवन दिले. त्यानंतर असे वाटू लागले की आपण आपल्या शक्तीचा उपयोग विधायक कार्याकरता करू या. परंतु हा एक आभास ठरला. अतिरेक्यांच्या कारवायांनी पंजाबमध्ये उच्छाद मांडला आहे. पंजाबचा प्रश्न कधी आणि कसा सुटणार आहे यांची चिंता वाटते, असे जरी असले तरी नाऊमेद होण्याचे कारण नाही. निरनिराळ्या क्षेत्रात आपले उत्पादन सतत वाढत आहे. सध्याची अस्थिर परिस्थिती फार दिवस टिकणार नाही असा आम्हास विश्वास वाटतो. अडचणींना तोंड देऊनच आपल्याला प्रगती करावयाची हे आपण विसरता कामा नये.

या शैक्षणिक वर्षापासून केंद्रसरकार देशामध्ये नवीन शैक्षणिक धोरण राबवणार आहे. या नवीन धोरणामध्ये शैक्षणिक दर्जा वाढविण्याचा कसोशिने प्रयत्न केला जाणार आहे या नवीन शैक्षणिक धोरणाची गेल्या वर्षभर सबंध देशात उलटसुलट चर्चा झाली आहे योग्य ते बदल सुचविण्यात आले आहेत. या नवीन धोरणाच्या अमलबजावणीसाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. देशात प्रथमच शैक्षणिक धोरणावर एवढी जाहीर चर्चा झाली आहे. काही विशिष्ट ध्येय डोळ्यापुढे ठेवून हे धोरण आखण्यात आले आहे. या नवीन शैक्षणिक धोरणाचे आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो !

पुणे विद्यापीठाने गेल्या वर्षी सत्रपद्धती रद्द करून एक धाडसी पाऊल उचलले, टप्प्याटप्प्याने ही सत्रपद्धती बंद होणार आहे या नवीन वार्षिक परीक्षा पद्धतीचा विद्यार्थ्यांना निश्चित फायदा होणार आहे वर्षभर सतत अभ्यास करून स्वतःचा दर्जा वाढविण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे त्याच प्रमाणे सतत अभ्यासाच्या मागे न लागता, क्रिडा, कला, संगीत या विविध क्षेत्रात प्रगती करण्याची संधी पुन्हा मिळणार आहे. एकंदरीत या नवीन पद्धतीमुळे पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक दर्जात निश्चित भर पडेल असे आम्हास वाटते.

गेले वर्ष आपण आंतरराष्ट्रीय युवा वर्ष म्हणून साजरे केले. या वर्षात युवकांच्या कल्याणासाठी, केंद्र सरकार, राज्य सरकार आणि विद्यापीठ यांनी

विविध योजना जाहिर केल्या आहेत. कल्पक बुद्धी, धडाडी, चिकाटी, राष्ट्रीय एकात्मतेची भावना, चारित्र्य या गुणांच्या जोरावर युवापिढी राष्ट्राला प्रगतीच्या मार्गावर निश्चित घेऊन जाईल असे वाटते. भारताचे भवितव्य युवा पिढीच्या हातात उज्वल आहे यात शका नाही हे आंतरराष्ट्रीय युवक वर्ष जरी संपले असले तरी युवकांची स्वतःच्या आणि देशाच्या उन्नतीसाठी धडपड मात्र अशीच चालू राहणार आहे यात शंका नाही.

# महाविद्यालयीन वार्ता

१९८५-८६ या वर्षातील महाविद्यालयीन वार्ता आपणापुढे सादर करताना आम्हास विशेष आनंद होत आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात तर सुयश मिळवलेच, पण त्याचबरोबर आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विविध क्षेत्रात मौलिक कार्य करून महाविद्यालयाच्या यशास उज्वलता प्राप्त करून दिली आहे.

## १) विविध क्षेत्रातील यश–

गेल्या वर्षातील विद्यापीठीय परीक्षांच्या निकालाच्या तुलनेत विज्ञान, कला आणि वाणिज्य या तिन्हीही शाखांमधील विद्यार्थ्यांनी उत्तम दर्जाचे यश संपादन महाविद्यालयाच्या उच्चशैक्षणिक परंपरेत भर घातली आहे प्रथमश्रेणी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कला, विज्ञान आणि वाणिज्य तिन्ही शाखांमध्ये दरवर्षी वाढतच आहे.

शैक्षणिक प्रगतीबरोबरच कला आणि क्रिडा ह्या क्षेत्रातही आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश मिळविले आहे. या वर्षी विद्यार्थ्यांनी तीन एकांकिका सादर केल्या, त्यापैकी "पानी गये न डबरे" या हिंदी एकांकिकेस 'मानस सांस्कृतिक व्यासपीठ, धुळे' यांच्यातर्फे आयोजित केलेल्या खुल्या एकांकिका स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या स्पर्धेत श्री. चंद्रशेखर त्रिपाठी यास उत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले. कु. आरती वझे या विद्यार्थिनीला वैयक्तिक अभिनयाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. श्री शफी पटेल यांना अभिनय नैपुण्याचे उत्तेजनार्थ पारितोषिकही मिळाले. याच हिंदी एकांकिकेस संघवी ढाल एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. "काळा ग्रंथ" या एकांकिकेस 'संवाद मुक्त व्यासपीठ, धुळे' यांच्या वतीने आयोजित झालेल्या एकांकिका स्पर्धेत सांघिक प्रथम सर्वोत्तम प्रायोगिक एकांकिका, सर्वोत्तम दिग्दर्शन, अभिनय नैपुण्य प्रथम क्रमांक उत्तेजनार्थ अशी एकूण सहा पारितोषिके मिळवून कौतुकास्पद विक्रम केला, श्री. नरेंद्र तोरवणे या विद्यार्थ्यास, 'मानस धुळे' तर्फे आयोजित करण्यात आलेल्या कथाकथन स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले, महाविद्यालयातील गायक कलावंत श्री. नितीन केंकरे, संदीप भिसे, शंखमहंमद, कु. साधना पटवर्धन, कु. संजीवनी पाठक, कु विजया साठे आणि कु लक्ष्मी कुलकर्णी या सर्वांनी आपल्या मधुर आवाजाने अखिल भारतीय एकात्मता शिबिरांत सर्व शिबीरार्थींची मने जिंकली, नाट्य आणि संगीत क्षेत्रातील हे आमच्या विद्यार्थ्यांचे यश निश्चितच गौरवास्पद आहे.

या वर्षी कनिष्ठ आणि ज्येष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंनी क्रिडा क्षेत्रात नेत्रदिपक यश मिळवून महाविद्यालयास अनेक पारितोषिके मिळवून दिली. पुणे विद्यापीठाच्या विविध संघात विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली या सर्व क्रिडापटूंचे आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतो.

## २) राष्ट्रीय एकात्मता शिबीर–

या वर्षी पुणे विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयात गेल्या फेब्रुवारी महिन्यात राष्ट्रीय एकात्मता शिबीर भरविण्यात आले होते. देशातील विविध विद्यापीठातून सुमारे ४०० विद्यार्थी-विद्यार्थिनी आले होते. शिबीराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे उद्योग व गृहमंत्री नामदार जि. तु. महाजन यांच्या शुभहस्ते झाले. पुणे विद्यापीठ कार्यकारिणीचे ज्येष्ठ सभासद व विज्ञान अधिष्ठाता श्री. एन. सी. जोशी यांनी अध्यक्षस्थान भूषविले होते. शिबीरामध्ये रोज सकाळी पी. टी., समाजसेवा कार्य केले जात असे. दुपारी विविध विषयांवर गटवार चर्चा होत असे. या शिबीरास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू श्री. भोगीशयन यांचे मार्गदर्शन लाभले. राष्ट्रीय एकात्मता कशी साधता येईल याचे प्रत्यक्ष उदाहरण शिबीरार्थींनी घालून दिले. रात्रीचे सांस्कृतिक कार्यक्रम सर्वांना फारच आवडले, या शिबीराचा समारोप महाराष्ट्र राज्याचे माजी क्रिडा आणि युवक कल्याण मंत्री श्री. नकुल पाटील यांच्या शुभहस्ते झाला. लोकसेवक श्री. बाळासाहेब चौधरी यांनी अध्यक्षस्थान भूषविले होते

३) आमच्याच महाविद्यालयातील कॉस्टिग विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. ग म. तल्हार यांची धरणगांव महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्याचप्रमाणे अर्थशास्त्राचे प्राध्यापक आर. डी. राणे यांची शारदा महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नियुक्ती करण्यात आली, या दोघा प्राध्यापकांचा महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. या नूतन प्राचार्यांच्या कार्यात त्यांना उत्तम यश लाभो हीच सदिच्छा !

महाविद्यालयाच्या प्रशासनच्या वाढत्या जबाबदाऱ्या लक्षात घेऊन यावर्षी संस्थेने डॉ एस. आर. चिरमाडे यांची वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रा एम. के. येवले यांची विज्ञानशाखचे उपप्राचार्य म्हणून नेमणूक करण्यात आली या नवीन नेमणूकीबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्यांच्या नवीन कार्यात आम्ही त्यांना सुयश चिंतितो. त्याचप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासन सुकर व्हावे म्हणून प्रा. व्ही ए. अमोदेकर प्रा एस. डी. भोळे आणि प्रा. एन डी. पाटील यांचे एक कामकाज मंडळ नियुक्त केले. त्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन.

## ४) एम. एस. सी. केमिस्ट्री–

विविध विषयातील पदव्यूत्तर शिक्षणाची वाढती गरज लक्षात घऊन गेल्या वर्षीपासून महाविद्यालयात एम एस. सी. रसायनशास्त्र शिकविण्याची सोय करण्यात आली आहे, त्यामुळे कलाशाखेकडे मराठी, इंग्रजी, हिंदी, संस्कृत अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास हे विषय पदव्युत्तर पातळीवर शिकवण्यात येतात वाणिज्य शाखेकडे पदव्युत्तर शिक्षणाची उत्तम सोय आहे. गणित प्राणिशास्त्र, रसायनशास्त्र हे विषय विज्ञानशाखेकडे शिकविण्यात येतात. पदव्युत्तर शिक्षणाच्या बाबतीत आमचे या शैक्षणिक वर्षापासून विज्ञान शाखेकडे Electronics Science हा विषय F. Y. B. Sc. पासून नव्याने सुरू करण्यात आला. महाविद्यालय नेहमीच अग्रेसर राहील यात शंका नाही. येत्या शैक्षणिक वर्षापासून भौतिकशास्त्र विषयाचा M. Sc (Electronics) हा अभ्यासक्रम आम्ही सुरू करणार आहोत.

## ५) प्राध्यापकांचे मौलिक यश –

विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणा देत असतानाच महाविद्यालयातील प्राध्यापकांनीही आपापल्या क्षेत्रात व इतरही अनेक क्षेत्रात लक्षणीय कार्य केले आहे

प्राध्यापक एस. डी. जोशी यांनी अर्थशास्त्र विभागात मराठवाडा विद्यापीठाला पी. एच. डी. साठी सादर केलेल्या "मराठवाड्यातील ग्रामीण विद्युतीकरणाचे परिणाम" प्रबंधास विद्यापीठाने मान्यता दिली आहे.

संख्याशास्त्र विभागातील प्रा. मिश्रा यांनी M. Phil. ही पदवी प्राप्त केली. प्राणिशास्त्र विभागातील प्रा. सुरेश जावळे यांनी M. Phil. पदवी प्राप्त केली. विद्यापीठाने दिलेल्या वेळात त्यांनी आपला प्रबंध पूर्ण केला. त्यांचे संशोधन कार्य फारच चांगले झाले आहे. वाणिज्य विभागातील प्रा पी. टी. चौधरी यांनी नागपूर विद्यापीठाची M. Phil पदवी प्राप्त केली आहे. या वर्षी वाणिज्य विभागातील प्रा जे. एम. आगरवाल आणि प्रा. कोठारी हे दोघेही C. A. ची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन !

प्रा. डॉ ग. म. तल्हार आणी प्रा. पी. टी. चौधरी महाविद्यालयाच्या वतीने अखिल भारतीय

वाणिज्य सभेस उपस्थित होते. उपप्राचार्य डी. एच. महाजन महाराष्ट्र राज्य अर्थ परिषदेस उपस्थित होते. प्रा. एस. डी. सिरसीकर, भूगोल विभाग प्रमुख, यांनी महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध चर्चा आणि शैक्षणिक कार्यक्रमात भाग घेतला.

इंग्रजी विभागातील प्रा. प्र. ना हुपरीकर यांची पुणे विद्यापीठाच्या इंग्रजी अभ्यास मंडळावर मानद सभासद म्हणून निवड झाली. इंग्रजी अभ्यास मंडळातून त्यांची कला विद्याशाखेवर सभासद म्हणून निवड झाली आहे. प्रा. शामकांत कुलकर्णी यांची जळगाव नगरपालिकेचे शिक्षण सभापती म्हणून निवड झाली. अत्यंत चुरशीच्या निवडणूकीतील त्यांचे हे यश निश्चितच अभिनंदनीय आहे. तसेच प्रा. जी. टी. अत्तरदे, प्रा. एन. एस. खडके. हे नगरपालिकेत निवडून आले. प्रा. व्ही. जी. चौधरी यांची नेमणूक झाली.

या वर्षी खालील प्राध्यापकांनी ग्रंथलेखनाचे मौलिक कार्य केले.

| लेखक | पुस्तकाचे नांव |
|---|---|
| १) प्रा. एम. के येवले | 1) Principles of Physics for std XI. |
| | 2) A Text Book of Physics for std XI. |
| | 3) Elementary Expriments in Physics for std XI. |
| | (पहिल्या दोन पुस्तकांना महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची मान्यता मिळाली आहे) |

महाविद्यालयातील पदवीधर आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, विविध विषयांची संबंधीत चर्चासत्रे इ. निमित्ताने अनेक मान्यवर व्यक्तींनी आमच्या महाविद्यालयास भेट देऊन आपल्या मार्गदर्शनाचा लाभ करून दिला आहे. या सर्व मान्यवर व्यक्तींचे आम्ही सदैव ऋणी राहू.

महाविद्यालयातील विविध प्रकारचे उपक्रम, अभ्यासेतर हालचाली व वेगवेगळ्या योजनांचा त्यांच्या वर्षभरातील कार्याचा परिचय या अंकात दिलेल्या विविध अहवालावरून होऊ शकेल.

## ५) स्टॉफ वार्ता–

यावर्षी ज्येष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयात खालील प्राध्यापकांच्या नेमणूका झाल्या. या सर्व नव्या प्राध्यापकांचे मनःपूर्वक स्वागत! हे सर्व प्राध्यापक महाविद्यालयाच्या परंपरेत मौलिक भर घालतील असा विश्वास वाटतो.

### ज्येष्ठ महाविद्यालय–

१) प्रा. ए. बी. पाटील
२) प्रा. एस. एस. राजे
३) प्रा. सौ. नेमाडे
४) प्रा. पी. एम. कोठारी
५) प्रा. के. यू. जोशी
६) प्रा. सौ. चांदोरकर
७) प्रा. कु. तळेले
८) प्रा. आर. टी. महाजन
९) प्रा. एस. एम. चौबे
१०) प्रा. सौ. बोंडे

### कनिष्ठ महाविद्यालय–

१) प्रा. आर. बी. चौधरी
२) प्रा. एल. एम. पाटील
३) प्रा. सुनिल भाई
४) प्रा. सौ तळेले.

महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये खालील नेमणूका करण्यात आल्या. या सर्व नवोगतांचे स्वागत!

### लिपीक–

१) श्री. के. पी. पाटील
२) श्री. एम. वाय. पाटील
३) श्री. ए सी. मन्सुरी

### सेवक–

१) श्री. जितलाल मौर्य
२) ,, ए. के. मोरे
३) ,, आर. पी. शिंदे
४) ,, एस. बी इंधाणे
५) ,, एस. बी. कोळी
६) ,, एस. यू. कोळी
७) ,, टी. डी. सोनवणे
८) ,, एस. एम. गुरव
९) ,, जी. आर. जंगले.
१०) ,, डी. एम वाणी

त्याचप्रमाणे खालील प्राध्यापक आम्हास सोडून गेले आहेत, त्यांची आम्हास सदैव आठवण येत राहील.

१) प्रा. एस. पी. बडगुजर
२) ,, डॉ. सौ. विप्रदास
३) ,, एस एच. पाटील
४) ,, कु. पी. डी. चौधरी

६) महाराष्ट्रातील एक प्रथितयश शिक्षणशास्त्रज्ञ, सुप्रसिद्ध लेखक आणि एक कुशल आणि निरलस मुख्याध्यापक श्री. ल. नी तथा आण्णासाहेब छापेकर यांचे ७ फेब्रुवारी १९८६ रोजी दुःखद निधन झाले. ते शिक्षण क्षेत्रात सतत प्रयोगशील होते. पूर्व प्राथमिक शिक्षणापासून विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यंतच्या विविध स्तरावरील शिक्षण संस्थांशी ते संबंधित होते.

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीशी त्यांचा सुरवातीपासूनचा या संस्थेचे सदस्य आणि नंतर कार्यकारी मंडळात शिक्षण तज्ञ या नात्याने त्यांनी केलेली सेवा वैशिष्टयपूर्ण अशी आहे. व्यवस्थापन मंडळ, शिक्षक, पालय, विद्यार्थी या साऱ्यांशी त्यांचे वर्तन अत्यंत सौहार्दपूर्ण असे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राची मोठी हानी झाली आहे. कै. आण्णासाहेबांच्या स्मृतीस आम्ही विनम्र अभिवादन करीत आहोत.

आपल्या महाविद्यालयातील सुरवातीपासूनचे एक अध्यापक श्री. के. पी वारके यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. श्री वारके हे अत्यंत मनमिळावू आणि व्यासंगी असे अध्यापक होते. आपल्या कार्याबद्दल ते नेहमीच सतर्क असत. विद्यार्थी वर्गातही त्यांना लोकप्रियता लाभली होती. सर्व सहकाऱ्यांशी त्यांचे वर्तन नेहमीच सहकार्याचे आणि खेळीमेळीचे असे त्यांच्या स्मृतीस आम्ही विनम्र अभिवादन करीत आहोत.

या वर्षात विविध क्षेत्रातील काही मान्यवर व्यक्तींचे निधन झाले. महाराष्ट्र कवि यशवंत, सुप्रसिद्ध नाटककार मधुसुदन कालेलकर सुप्रसिद्ध नट डॉ. काशिनाथ घाणेकर, नामवंत सिनेनट संजीव कुमार एव्हरेस्ट शिखर प्रथम पादाक्रांत करण्याचा बहुमान मिळवणारे श्री. तेनसिंग नोर्गे, सुप्रसिद्ध लेखिका श्रीमती मालतीबाई दांडेकर, सुप्रसिद्ध लेखक प्रा. अरविंद मंगरूळकर आणि क्रिडा, कला, व साहित्य या क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती या साऱ्यांच्या

दुःखद निधनाबद्दल आम्ही त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

**आभार –**

'अजिठा' नियतकालीक तयार करण्यासाठी अनेकांचे परिश्रम सहाय्यभूत ठरले आहेत विद्यार्थी-विद्यार्थिनींनी दिलेले स्वयंस्फूर्त लेखन सहकार्य आणि मे. व्ही. जी. जोशी, ब्लॉक मेकर्स, पुणे यांनी परिश्रम घेऊन केलेली ब्लॉकची छपाई व मुखपृष्ठ सजावट याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

अजिठा छपाईची जबाबदारी स्वस्तिक प्रिंटींग प्रेसचे व्यवस्थापक श्री. सोपानदेव चौधरी यांनी दिलेल्या मुदतीत अंक छापून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच स्वस्तिक प्रिंटींग प्रेस कर्मचाऱ्यांच्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत. शिवाय ज्या हितचिंतकांनी अंकासाठी जाहिराती देऊन आम्हास सहकार्य केले त्यांचेही आम्ही ऋणी आहोत. आमच्या महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी ह्या अंकाच्या छपाईसाठी वेळोवेळी जे सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचेही आम्ही आभारी आहोत. तसेच आम्हास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरणे ज्यानी सहकार्य केले त्याचेही मनःपूर्वक आभार !

**प्रा. प्र. ना. हुपरीकर**
[ प्रमुख संपादक ]

☎ : P. P. 3380

**आमचेकडे–**
शाळा, कॉलेज, ऑफिस तसेच घराला लागणारे उत्तम व टिकाऊ फर्निचर मिळेल.
तसेच फॅन, कुलर व फ्रीज मिळतील.

संपर्क–
**अे. पी. अेजन्सीज्**
**खानदेश मील शॉपींग कॉम्प्लेक्स**
**जळगांव**

**ITE SEARS**
Colour and Black and White TV
* Super Technology
* Brillant Pictures & High Resolution
* Trouble free Performance
* Isolated SMPS System for B/W TV for ITE

**Sight and Sound**
Matched to Perfection
Authorised Sole Dealer-
**Vimal Enterprises**
71, Khandesh Shopping Complex,
**JALGAON–425001.**

We render
Prompt efficient & courteous after Sales Service to all types of TV Sets
Manufactured by reputed companies



राष्ट्रीय एकात्मता शिबिर : उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब बेंडाळे – प्रमुख पाहुणे नामदार जे. टी. महाजन यांचे स्वागत करतांना


किशोर भोळे S. Y. B. A.
विद्यापीठ प्रतिनीधी व हातोडाफेक मध्ये प्रथम


प्राचार्य डी. एस. नेमाडे पाहुण्यांचा परिचय करून देताना


मधुकर पाटील जनरल सेक्रेटरी १९८५–८६
जळगाव विभागिय खेळाडू (वजन उचलणे) रनर


पुणे विद्यापीठ कार्यकारिणीचे जेष्ठ सभासद – उद्घाटनचे अध्यक्ष श्री. एन्. सी. जोशी भाषण करित असताना


आर. आर. चौधरी T. Y. B. Sc.
उत्कृष्ठ विद्यार्थी १९८५–८६



समारोप प्रसंगी महाराष्ट्राचे माजी क्रिडा आणि युवा कल्याण मंत्री श्री. नकुल पाटील भाषण करताना



समारोप प्रसंगी लोकसेवक श्री. बाळासाहेब चौधरी आपले मनोगत व्यक्त करताना



बज़मे उर्दु अदबची हस्तमुखाने प्रशंसा करताना प्राचार्य श्री. डी. एस्. नेमाडे, डावीकडून प्रा. अकबर रहमानी, उदघाटनकर्ता श्री. तेज किरण दर्डा (व्यवस्थापक दै. लोकमत) उजवीकडे श्री. भागवतराव चौधरी (संपादक जळगाव समाचार)



श्री. वरात एस्. ए. M. Sc. (Maths) परिक्षेत सर्वप्रथम



कु. सुचिता अरविंद कर्णिक M. Com परिक्षेत सर्वप्रथम



प्रभाकर राजाराम चौधरी, एम् ए. मराठी 1st १९८५



सतत सात वर्षे चॅम्पियनशिप मिळविणारे (वेटलिफ्टिंग) चे महाविद्यालयाचे विद्यार्थी



आंतर महाविद्यालयीन विजयी खो खो संघ



बास्केटबॉल व हॅन्डबॉल जिल्हा पातळीवरील विजयी संघ ज्युनिअर जिमखाना १९८५–८६



विश्राम अभ्यंकर
अखील भारतीय विद्यापीठ विजयी खेळाडू



संजय थोरात Sr. M. Com.
पुणे विद्यापीठ क्रिकेट संघात निवड



कु. अल्पना सैनी–बॅडमिंटनसाठी विद्यापीठातून निवड



ज्युनि. जिमखाना
बॅडमिंटन जिल्हा पातळीवरील विजयी संघ १९८५–८६



किरण खडके
वजण उचलणे व भालाफेक प्रथम



ज्युनि. जिमखाना १९८५–८६
कबड्डी जिल्हापातळीवरील विजयी संघ



पुणे विद्यापीठ हॅन्डबॉल महाविद्यालयीन खेळाडू



ज्युनि. जिमखाना १९८५–८६
खोखो विभागीय उपविजयी संघ



कु. वंदना लड्ढा
पुणे विद्यापीठ हॉकी खेळाडू

# अजिंठा

## मराठी विभाग

# अनुक्रमणिका


१) राष्ट्रीय एकात्मता शिबीर-एक दृष्टीक्षेप
रविंद्र मोराणकर

२) मोती
कु. वनिता काशिनाथ वाणी

३) गोंधळात गोंधळ
जयराज छपरीबंद

४) शिक्षण क्षेत्र व भ्रष्टाचार
अनिल ताराचंद गर्गे

५) डीके
प्रसन्न मुकुंद देशपांडे

६) भिंतीला तुंबड्या
किशोर बी. खडसे

७) आजच्या युवकापुढील आव्हाने
कु. मनिषा खेमचंद महाजन

८) भंगलेले स्वप्न
कु. कल्पना वि. जोशी

९) जन्म-तुझ्या पोटी
राजेन्द्र म. पाटील

१०) आजचा युवक
विजयकुमार हरी पाटील

११) अगतिक
मिलींद म. कुळकर्णी

१२) यशवंताची काव्यसृष्टी
कु. प्रतिभा भडंग आडगांवकर

१३) अशीच एक रात्र येते
कु. कल्पना कोसोदे

१४) खान्देशचे भूषण – शिरीष मेहता
नरेंद्र म. तोरवणे

१५) असहायता
पितांबर डालू पाटील

१६) अनोळखी पाऊलवाटा
प्रा. सौ. चारुता गोखले

१७) युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती
राजेंद्र चौधरी

१८) गडकऱ्यांचा विनोद
कु. विनीता दि. महाजन




# राष्ट्रीय एकात्मता शिबीर : एक दृष्टीक्षेप


रवींद्र मोराणकर
विद्यार्थी प्रतिनिधी,
द्वितीय वर्ष, साहित्य, (मराठी)


अखिल भारतीय पातळीवरील राष्ट्रीय एकात्मता शिबीर जळगांवी मुळजी जेठा महाविद्यालयात दि २ ते ७ फेब्रुवारी ८६ ला संपन्न झाले. त्याअगोदर आपण ह्या शिबीराकडे एक बारीक नजर टाकून पाहिले पाहिजे.

या शिबिरात दररोज समहगीते, व्याख्याने, चर्चासत्रे, श्रमदान व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते. शिबिराची सुरुवात स्वा. सावरकर यांच्या स्वतंत्रेच्या स्तोत्राने झाली. त्यात आणखी एक कवी राजा महाजन यांच्या 'जय जय खानदेश माझा' या गीताने एक प्रकारची वातावरण निर्मिती केली मग काय ती वक्त्यांची अस्सल इंग्रजीतली भाषणं ........

विशेष जाणवणारी गोष्ट म्हणजे ह्या शिबिरार्थींनी दोन दिवस मेहरुण तलावावर जाऊन तेथील बराचसा गाळ काढला. त्यामुळे पावसाळ्यात मेहरुण तलावात मोठ्या प्रमाणात पाणी साठू शकेल. ही आम्हा जळगांवकरांना एक अमोल देणगीच म्हणावी लागेल.

केवळ श्रमदान आणि सांस्कृतिक कार्यक्रम इथपर्यंतच हे शिबीर मर्यादित नव्हते तर तरुण पिढीत राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जाणिव निर्माण व्हावी हा एक महत्वाचा उद्देश त्यामागे होता.

शिबीरातील युवक-युवतींशी बातचित केल्यावरच त्यांच्या भावना

**अ. भा. पातळीवरील राष्ट्रीय एकात्मता शिबीर जळगांवी मुळजी जेठा महाविद्यालयात दि. २ ते ७ फेब्रु. ८६ रोजी संपन्न झाले. त्यासंबंधी मुलाखतीवर आधारीत विशेष लेख.**

परस्परांना समजून घेण्याची प्रवृत्ती चा अंदाज आला. पहिलीच बातचित मुंबई विद्यापिठाच्या कु. सोनाली सोलापूरकर ( काँटिनेन्टल टीचर ) यांचेशी झाली

प्रश्न : या राष्ट्रीय एकात्मता शिबीराविषयी तुम्हाला काय वाटत ?

कु. सोनाली : संपूर्ण भारतातील ४० विद्यापीठातील ४०० युवा-युवती एकत्रित आलेत. त्यांचे भिन्न-भिन्न वेष, भाषा, वर्ण यांचं दर्शन झालं कुठे काडीमात्रही गोंधळ नाही. मी अशाप्रकारचं शिबीर पहिल्यांदाच पाहात आहे माझ्या मनातल्या मनात संभ्रम निर्माण झाला 'आपण कुठे स्वर्गात तर वावरत नाही ना !' मनात एक विचार आला; समाजात अशा प्रकारचे युवक-युवती वावरु लागले तर समाज परिवर्तनास वेळ लागणार नाही. पर्यायाने राष्ट्रहित साधले जाईल म्हणजेच राष्ट्रीय एकात्मतेत भर पडू शकेल.

प्रश्न : यापूर्वी अशा प्रकारच्या शिबिरात भाग घेतला आहे काय ?

कु. सोनाली : हो, पण अशी माणुसकी असलेली माणसं, त्यांचे स्वभाव, बोलणे-चालणे या गुणांचं

दर्शन यापूर्वी फारसं घडलेलं नाही एवढं मात्र निश्चितच !

नंतर मोर्चा दुसरीकडे वळवला. तो 'जगन्नाथपुरी संस्कृत विश्व विद्यालय ओरिसा'च्या मधूसुदन मिश्रकडे.

प्रश्न : अशा प्रकारच्या राष्ट्रीय एकात्मता शिबीरातून खऱ्या अर्थानं राष्ट्रीय एकात्मता साधली जाईल कां ? (तो स्मितहास्य करून म्हणाला.)

मधुसूदन : कां नाही ? जरूर ! कारण आपण एवढे युवक-युवती एकत्रीत राहात आहोत, या शिबिरामुळे आपल्यात संघटीत होण्याची भावना निर्माण झालेली आहे. घरी गेल्यावरही आपण कुटुंबात अशा प्रकारे राहिल्यास कुटुंबाचे प्रश्न तेव्हाच सुटू शकतात. पर्यायाने अशा भावनेने आपण राहिल्यास राष्ट्रीय एकात्मतेस कोणतीही गोष्ट बाधा आणू शकत नाही.

प्रश्न : राष्ट्रहिताच्या दृष्टीने राष्ट्रीय एकात्मतेत हिन्दी व इंग्रजी या दोन्ही भाषांपैकी कोणत्या भाषेला महत्त्व दिले पाहिजे ?

मधुसूदन : हिन्दी व इंग्रजी या दोन्हीही भाषांना महत्त्व द्यावं असं माझं प्रामाणिक मत आहे आणि त्याचबरोबर संस्कृतलाहीं महत्त्व दिलं पाहिजे माध्यमिक शाळांतून संस्कृत हा विषय आवश्यक केला पाहिजे.

पुढे 'श्रीकृष्ण देवराया अनंतपूर विद्यापीठ, आंध्रप्रदेश'च्या बी. अरविंदला गाठले.

प्रश्न : या शिबीराविषयी तुम्हाला काय वाटतं ?

बी अरविंद : शिबीर खरोखरच चांगल्या प्रकारे आयोजित केलेलं आहे येथे अनेक भाषांचे, धर्मांचे, जातीचे युवक-युवती एकत्रित आलेत, आपल्याला जर एखादी भाषा ( उदा. तेलगू ) येत नसेल तर काही प्रमाणात का होईना समजायला लागलेली आहे. इथली माणसं माणुसकीनं वागतांना दिसताहेत.

प्रश्न : मी मध्येच अडवून त्याला प्रश्न केला 'माणुसकी' म्हणजे तुम्हाला नक्की काय अभिप्रेत आहे ?

बी. अरविंद : समजा दोन विद्यार्थी-विद्यार्थिनी आहेत तर त्यांची ओळख वगैरे नसतांना त्यांनी एकमेकांस भाऊ-बहिण म्हणावं असं मी मुळीच म्हणत नाही. तर त्यांनी मित्रत्व या नात्याने वागलं पाहिजे.

पुढे पुणे विद्यापीठाच्या जळगावच्या मिलिन्द मधुकर कुलकर्णी (द्वितीय वर्ष विज्ञान) या युवक मित्राशी भेट झाली.

प्रश्न : या शिबीराविषयी तुम्हाला काय वाटतं ?

मिलिन्द : राष्ट्रीय एकात्मता साधली जाऊ शकते परंतु विद्यार्थ्यांनी शिबीरात निव्वळ एंजॉयमेन्टकरता येऊ नये, तर यातून निरनिराळ्या राज्यातल्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधून आपल्या विचारांची देवाण-घेवाण केली पाहिजे. त्यांची संस्कृती, आचार-विचार समजावून घेतले पाहिजे. त्याच्यातील चांगलं तेवढंच घ्यावं.

अशा प्रकारे युवक-युवतींशी बातचित केल्यावर प्रत्येकाची उत्तरे काही प्रमाणात समान येत होती.

शेवटी मनात विचार आला, 'आजचे भारतीय युवक खरोखरच स्वराज्याचे सुराज्य घडवू शकतील...'

## कवि

जिवनाच्या विणेतुन
सूर प्रेमाचे येवू दे,
हृदयाच्या बागेतुन
प्रितीचे गुलाब फुलू दे,
कल्पनेच्या तळ्यातून
आशावादी कमळ उमलू दे,
उत्साहाच्या रथातून
प्रेमरुप मूर्ती मजकडे येवू दे,
निसर्ग रम्य देखाव्यातून
कवि मजला बनू दें

जोशी मोरेश्वर एल.
११ वी वाणिज्य

# "मोती"

**कु. वनिता काशिनाथ वाणी**
११ वी, वाणिज्य

इशाऱ्याचा बार हवेत उडाला आणि हां हां म्हणता समोरील घोडी चौखूर उधळलीत. घोड्यावरील स्वार त्यांना जीव तोडून दामटू लागले. तामसे गावाबाहेरील पटांगणाच्या चौफेर जमलेली हजारो माणसे डोळ्यात तेल घालून समोरील घोडदौड पहात होती. पर्वतराव इनामदारांचा पांढरा शुभ्र मोती अरबी चालीने हिंदुराव सरदेशमुखांच्या घोड्याची पाठ धरून, त्याला बगल देवून पुढे सरसावला आता तोच जिंकेल व मानाचा तोडा त्यालाच मिळेल हे नक्की. तोच न जाणे त्याचा पाय घसरला आणि स्वार धोंडीबा किंचाळत खाली पडला ! ओठाशी आलेला यशाचा प्याला नियतीने थप्पड देऊन भिरकावला ! ! जखमी धोंडीने डोळे उघडले तेव्हा सखू त्याची बायको त्याला उठवित होती.

दिवस बराच वर आला होता. त्याने आपले सकाळचे काम आटोपून चूळ भरली आणि चहासाठी घरात डोकावला. तो सखूने रागातच एक कपभर चहा त्याचे पुढे जवळजवळ आपटलाच त्याला काही ते नवीन नव्हते. त्याने चहाचा कप हातात घेत घेत तिला विचारले 'मंजी कुठं हाय ?' "गेली असल म्हसणात ! कां ? काय पुळका आला व्हयं मंजीचा?" "तसं नव्ह, पोर दिसली न्हाई म्हून ईचारलं." ठाव हाय मला." सखू फणकारली

धोंडीबा चहा घेवून डोक्याला टोपी चढवत बाहेर पडला. इनामदाराच्या कडे वाढलेला धोंडी अंगकाठीने ठसठशीत तितकाच चपळ. प्रामाणिकपणाचे तर तो बाळकडूच प्याला होता. असा अगदी सरळमोट धोंडी आताही पर्वतराव इनामदारांकडे नेहमीच्या कामावर निघाला होता. मधेच कसलासा आवाज झाल्याने त्याने मागे वळून पाहिले. त्याचा कुत्रा खंड्या त्याची साथ करीत होता. धोंडी जागीच बसला आणि म्हणाला, "आरं बाबा, तूच खरा मैतर हायस्. आता जावा घरला. मी इनामदाराकडून येतो-तीन पारी. जावा माझ्या राजा." आणि खंड्याही मागे फिरला.

धोंडीबा संध्याकाळी इनामदारांकडून नेहमीचे काम आटोपून घरी आला. जेवण करून बाजेवर अंग टाकले. नवरात्रीचे दिवस असल्यामुळे देव्हाऱ्यात तेलाची वात तेवत होती त्याला मुलगा नसल्याने त्याने त्याचा भाचा वसंता यालाच जवळ ठेवून वाढवले होते. सखूनेही त्याच्यावर जीवापाड प्रेम केले होते.

आता तो I. T. I. चा कोर्स करुन म्हसव्याच्या साखर कारखान्यात नोकरीस लागला होता. व मंजूशी त्याचे लग्न लावून द्यावे म्हणजे सुटलो एकदाचे असे धोंडीबाला वाटायचे. पण वसंता पाच हजार रुपये हुंडा मागत होता. आणि इथंच सर्व गाडं अडलं होतं.

याच पाच हजार रुपयांसाठीं सखू धोंडीबावर रागवत होती. घालून पाडून बोलत होती. मंजू मोठी झाल्याचे सुतावत होती. तिचे बोलणं ऐकून धोंडी जेरीस आला होता. व आताही याच विचारात तो बेचैन झाला होता. झोप त्याचे पासून लांब पळाली होती.

मनाच्या द्विधा मनःस्थितीत तो बाजेवरुन उठला पायात पायताण डोक्याला टोपी चढवून बाहेर पडला. बाहेर हवेत गारवा पडला होता. शरदाचं टिपूर

चांदण पडलं होत. वातावरण एकदम भारावून टाकत होतं खंडू कुत्रा अंगाच मुटकळ करुन झोपला होता. त्याला कसलीही चाहूल लागू न देता धोंडी चालू लागला तो सरळ मुंजुबाच्या डोंगराकडे.

धोंडी दोन अडीच मैल जंगलात शिरला असेल नसेल तोच दोन माणसांच्या आकृत्या त्याने त्याच्याकडे येत असल्याचे पाहिले तो जागीच थबकला व काही विचार करण्याचे आतच ते दोन्ही दंडधारी त्याचे दोन्ही बाजूस उभे राहून दरडावून म्हणाले "धोंड्या, गुमान, गप रावा कालवा मांडलास तर जिवानं जाशील याद राख!" मिशाळ ओठ हालत होते "आम्ही सांगू तसं ऐकलस तर पाच हजार रुपये मिळणार न ऐकलसं तर तुझं समदं खानदान कापलं जाईल. तवा नीट इचार करं." धोंडी मनात थोडा चरकला. पण मनाचा हिय्या करुन त्याने विचारलं, "अरं पण अगूदर काम तरी सांगा की" त्यावर गालावर जखमेचा मोठा व्रण असलेला काळा पहाडच जणु गुरकला "ये धोंड्या, काम तसं जोखीमचं न्हाई. फकस्त आम्ही जे औषध देतो ते तू इनामदाराच्या मोतीला चार, म्हणजे तुझं काम झालं औषधाने मोती मरणार आणि पौर्णिमेच्या जत्रेत ज्या शर्ती हाईत. त्यांत आमचं घोडं बाजी मारणार. घे हे पाच हजार." धोंडीने कसलासा विचार केला त्या धिप्पाड माणसाचे हातून ते पांच हजार रुपये घेतलेत व हातात हात घेवून त्यास सागीतले "अक्षी आपण सांगीतलं तसंच व्हईल. आपण बीनघोर जावा" त्या दोन आकृत्या आल्या तशा अंधारात निघून गेल्यातं.

धोंडी परत घराकडे निघाला त्याच्या मनात विचारांचा कल्लोळ माजला. त्याचा धनी पर्वतराव अगदी जीवापाड प्रेम करणारा. त्याला मध्ये अपघात झाला तेव्हा स्वतःच्या खर्चाने सातान्याच्या खाजगी दवाखान्यात त्याचा इलाज केला. मध्यंतरी सखू आजारी पडली तेव्हाही इनामदाराने दोन हजार रुपये औषध पाण्यात खर्च केले होतें. अन्नधान्याची काही एक अडचण इनामदार पडू देत नव्हते. सुपाएवढे काळीज असलेले इनामदार धोंडीबाच्या प्रामाणिक पणावर बेहद् खूष होते.

मोती पांढराशुभ्र मस्तकावर कुमकुम तिलक असावा तसा बदामी लाल चट्टा. नेहमी सतर्क असणारे कान, फुरफुरणारे नाक, बांधेसूद शरीर व तेवढेच दणकट पाय. जनावर पंचक्रोशीत नावाजलेलं धोंडीचा या जनावरावर भारीच लळा. धोंडीच्या हातून ५ किलो चंदी सकाळी व संध्याकाळी मोतीला घातली जाई. मधल्या वेळेस मळ्यातील हिरवेगार गवत आणि शंकरकरवी स्वच्छ हवेचा आनंद त्याला मिळे. मध्यंच जेव्हा मोती आजारी पडला तेव्हा धोंडी आणि शंकर यांनी भूकतहान विसरून मोतीला औषधपाणी व सेवासुश्रुषा देत होते. पण आराम पडेना तेव्हा शंकरने परत चांभार आवळीचा पाला वाटून त्याचे खुरास बांधला; आणि काय आश्चर्य जं विलायती औषधाने दोन महिन्यात साधले नव्हते ते आठवड्यात देशी पाल्याने साधले. मोती परत रस्त्याने डौलत दौडू लागला त्याची दौड पाहून शंकर, धोंडीचा उर भरुन येई. इनामदार तर आपल्या मोतीला बरं वाटायला लागल्याचं पाहून धोंडी व शंकर यांना चांदीची कडी इनाम देऊन त्यांची कृतज्ञता व्यक्त केली.

घराच्या दाराशी येताच धोंडीची तंद्री तुटली. खंड्या त्याचे पायाशी आला व घोटाळू लागला. सकाळी सखू उठली, नेहमीची कामे आटोपत होती तोच तिच्या हातून पडलेल्या भांड्याच्या आवाजाने धोंडी जागा झाला. चूळ भरली व चुलीजवळ चहासाठी गेला. सखू चुलीत लाकूड पेटवत होती, 'पांच हजार रुपये हैती मंजीच्या लग्नात हुंड्यासाठी' सखू मनात सुखावली पण परत "एवढं पैसं कुठून आनलं" हे विचारायची ती विसरली नाही. धोंडी म्हणाला, 'इनामदाराकडनं आनलंन काय', सखूने चहा गाळून प्रेमाने धोंडीच्या हातात कपबशी दिली व बारीक हसू तिच्या चेहऱ्यावर पसरले.

धोंडी चहा घेऊन व भाकरी बांधून इनामदाराकडे जायला निघाला. वाड्यावर आला तसा तबेल्यात जाऊन मोती घोडाच्या गळ्यात हात घालून रडू लागला. थोडा शांत झाल्यावर मोतीला खरारा करून त्याची पाच किलोची चंदी त्याचे गळ्यात अडकवून बराच वेळ त्याचे सानिध्यात राहिला. दोनतीन दिवस कसे गेले ते कळलेच नाही.

आज तामसे गावातील जत्रेची सुरुवात घोड्याच्या शर्यतीने होणार होती. दुपारी ४ वाजेपासूनच गावाबाहेरचं पटांगण माणसांनी फुलून यायला सुरुवात झाली होती. पांच वाजेच्या सुमारापर्यंत माणसांनी ते पटांगण घेरलं गेलं होतं. एका टोकाला हिंदुराव पाटील यांचा चितकाबरा पंचकल्याणी घोडा थयथयाट करीत होता त्याचे मागे म्हसव्याचे दौलतराव यांचं उमदं जनावर त्यावरील स्वार आवरीत होता. पंधरा–वीस घोडी मातब्बर लोकांची शर्यतीत उतरली होती. पण लोकांचे डोळे पर्वतरावाचा मोती शोधत होते व नेमका तोच हजर नव्हता. वेळ अगदी थोडा उरला होता हिंदुराव पाटलांच्या घोड्यावर तो काळा कभिन्न पहाडासारखा तुक्या आरुढ झाला होता दुसरा मिशाळ भिवा त्याचे शेजारी एका काळ्या कुळकुळीत घोड्याबर स्वार होऊन इशाऱ्याची वाट पहात होता. इनामदार अजून आले नाहीत ते आता येणार नाहीत शर्यत सुरु करा. असा घोशा हिंदुराव पाटील पंचमंडळीपुढे लावीत होते अजून दहा मिनिटं उरली असल्यामुळे पंच हिंदुरावकडे लक्ष द्यायला तयार नव्हते आता अगदी पाच मिनिटं उरली इनामदाराचा मोती अजूनही न आल्यामुळे जमाव अगदी अस्वस्थ झाला होता. तोच गावांकडून चौखूर उधळत इनामदारांचा मोती शंकरला पाठीवर बसवून मैदानाकड लोकांनी येताना पाहिले व आनंदातिशयाने 'खंडराव महाराज की जय' म्हणून लोक ओरडले इनामदार स्वतः घोडागाडीतून मैदानावर दाखल झाले

इनामदारांचा घोडा फर्लांगभर मागे उभा राहिला कारण नंबरच तसा मिळाला होता. सर्वात पुढे हिंदुराव पाटील यांचा घोडा तुक्या सांभाळीत होता त्याचेनंतर लांडे पाटील यांचा घोडा दहा यार्डावर अशा अंतराने १५–२० चपळ घोडी उभी होती व अगदी मागचे बाजूस धृवताऱ्यासारखा पांढराशुभ्र 'मोती' डौलात उभा होता

शर्यत सुरु होण्याचीं वेळ होत आली तसा इशाऱ्याचा बार फुटला पंधरा-वीस घोडी इशारतीसह धावायला लागलीत मोतीने उसळी मारून चाल धरली पुढे फक्त तुक्या व भिवा यांचीच घोडी होती. बाकीची घोडी मोतीने केव्हाच मागे टाकली, मोती पुढे सरकण्याचा प्रयत्न करी पण भिवा मध्येच त्याला आडवा येई, त्यामुळे शंकरला मोतीस आवरावे लागे थोडा विचार करून शंकरने मोतीला इशारत केली चपळ मोतीने लगेच भिवाला डावी बगल देऊन पुढे मुसंडी मारली, त्यासरशी भिवा मागे पडला व त्याच चालीत पुढे तुक्या बसलेल्या घोड्यासही मागे टाकून शंकरने ती शर्यंत जिंकली मोतीने परंपरा राखली होती! इनामदारांची मान उंच ठेवली होती

तुक्या आणि भिवा खाली मान घालून उभे होते, हिंदुराव पाटील त्या दोघांवर कातवत म्हणाले, "बांगड्या भरा लेको."

इनाम म्हणून ठेवलेले रु ५००० मानाचा तोडा फेटा पर्वतरावांनी स्वीकारला व ते धोंडीच्या घराकडे त्याची खबर घ्यायला निघाले धोंडी कां आला नाही हा एकच प्रश्न त्याचे पुढे होता.

इनामाची रक्कम घेऊन पर्वतराव धोंडीचे घरी गेलेत स्वतः इनामदार आलेले पाहून सखूने हात जोडून इनामदारांचे स्वागत केले आल्याआल्याच इनामदारानी धोंडीची चौकशी केली आणि हातातील बॅगतून ५०००।– रु. नोटा सखूकड देत ते म्हणाले, "हे ठिवा मंजूच्या लग्नासाठी उपेग होईल"

त्यावर सखू म्हणाली, "मालक काय थट्टा करत्यात व्हय गरीबास्नी, परवाच तर पाच हजार पाठवल्यात ते हाईत की." हे ऐकून इनामदार चमकलेच "बरं धोंडी कुठं हाय? आता हो ते तर सकाळपासनं आपल्याकडेच जातो म्हून म्हटलं व निगलेत बी वाड्यावर." इनामदार लगेच मागे फिरले त्यांचे मनात शंकेची पाल चुकचुकली ते घोडागाडीत बसणार तोच खंड्या कुत्रा त्यांना आडवा आला नि त्यांची पैजार ओढून जंगलाच्या दिशेने भुंकू लागला. दोन–तीन वेळा तसे झाले तेव्हा इनामदार त्याला थोपटीत म्हणाले, 'खंड्या व्हय्,

मोन्ह तुझ्या मागून गाडी चालवतो. खंड्या काय समजायचे ते समजला व रानाच्या वाटेला दौडू लागला. पांच-सात मिनिटात मैल दीड मैल आल्यावर तो थांबला. इनामदार गाडी थांबवून खाली उतरले आता कुत्रा आडवाटेला लागला. त्याचे मागून इनामदार चालू लागले. करवंदाच्या जाळीजवळ ते आले नि दचकून खालीच बसलेत. धोंडी तेथे मरून पडलेला होता ! जवळच त्याच्या भाकरीचे गाठोडे पडले होते ! एका कागदावर भिजलेल्या हरबऱ्याचे १०।१२ दाणे पडलेले होते. त्यावर पांढऱ्या रंगाची पुड लागलेली दिसत होती !

इनामदार हे पाहून हतबद्ध झाले व त्यांचे तोंडून शब्द फुटले.

## " धोंडी ! "

---

# ओठातील गीत

भाऊराव ओ. इंगळे
१२ वी 'कला'

घेता मिठीत सखे ही रात्र धुंद व्हावी ।
धुंदीत रात्र सारी जागून गाजवावी ।।
स्वप्नात पाहिले ते सत्यात हाती यावे ।
संपून वेदना त्या मनी फुलत जावे ।।
ओठात गीत यावे उसळून त्या उद्याचे
रंगून रात्र सारी धुंद उरून राहे
सखये मिठीत माझ्या तू ही विलीन व्हावे
माझ्या हृदयात एकरुप तूही व्हावे,
एकरुप तू ही व्हावे !

# हे मृत्यू !

वैशाली अेडसीकर
प्रथम वर्ष वाणिज्य

येऊ नकोस म्हटलं तरी
आल्याशिवाय रहाणार नाहीस तू
पण निदान योग्य वेळी तरी ये,
हे शुभंकर मृत्यू ! !
आजवर आपले वाटणारे
होतील जेव्हा परके
आणि प्रेम, माया सारे
नेऊन मला करतील पोरके
तेव्हाच ये तू !
विश्वास, प्रेम, निष्ठा जेव्हा
दूर होतील आत्म्यापासून
आणि प्रियजनच माझे जेव्हा
हसतील मला उपहासून
तेव्हाच ये तू !
जेव्हा व्यर्थ जाईल अट्टाहास माझा,
होण्यासाठी 'त्यागी'
ज्यांच्यासाठी त्यजिले सारे,
तेच हिणवतील म्हणून, 'भोगी'
तेव्हाच ये तू !
माझीच पाखरं दगडं मारून
घायाळ करतील मला
आणि जीव एकवटून मी
आर्त साद घालेन तुला
तेव्हाच ये तू !
प्रेयसी माझी– सलज्ज, सुंदर,
जात असेल पतीसमवेत
आणि निराशेने मी जेव्हा
झोकून देईन मलाच चितेत
तेव्हाच ये तू !
निदान योग्य वेळी तरी ये,
हे शुभंकर मृत्यू ! !

# गोंधळात गोंधळ !



जयराज छपरीबंद
द्वितीय वर्ष ( कला )

"द्वारका टेलिफोन एक्स्चेंज ?"

"यस् सर, गुड मॉर्निंग"

"मला एस. व्ही यादव हवेत."

"डिरेक्टरी एन्क्वायरीला फोन करा."

"डिरेक्टरी एन्क्वायरी ?"

"यस् सर, गुड मॉर्निंग."

"एस व्ही. यादवांचा नंबर काय ?"

"पत्ता काय दिला आहे ?"

"पत्ता माहित नाही. पण, एस. व्ही. यादव फक्त पहा

"अहो ! द्वारकेच्या डिरेक्टरीत हजारो यादव आहेत. एस. व्ही. या आद्याक्षरांचीच सहा–सातशे नांवे आहेत. त्यापैकी कोणते सांगा. मग नंबर सांगते."

"ते यादव हो, राजवाड्यात राहतात ते."

"तसा नंबर सांगता येणार नाही. पत्ता सांगा"

फोन बंद. अर्जुन वैतागला कौरव-पांडवांचे युद्ध होणार हे आता नक्की ठरलेलं. श्रीकृष्णाची मदत घ्यायलाच हवी. हस्तिनापूरहून त्यानं द्वारकेला ट्रंककॉल जोडला तर त्याची ही तऱ्हा. 'श्रीकृष्ण वासुदेव यादव' असं पूर्ण नांव सांगून त्यानं पुन्हा प्रयत्न करून पाहिला पण प्रभु श्रीकृष्णाचा फोन नंबर 'बिचाऱ्या' ऑपरेटरला माहित नव्हता शेवटी त्यानं रागारागानं म्हटलं, "अहो बाई, भगवान श्रीकृष्णाचा नंबर तुम्हाला माहित नाही ?"

त्यावर ती बाई फणकाऱ्यानं म्हणाली, " हे पहा मिस्टर, मला भगवान-बिगवान माहित नाही. तुमचा तो कोणी श्रीकृष्ण सरकारी अधिकारी असेल तर गव्हर्मेंट सेंट्रल किंवा गव्हर्मेंट स्टेटमध्ये पहायला हवं. तुम्ही आम्हाला नक्की तपशील दिलात तरच मी मदत करु शकेन."

"बरं ! एस. व्ही. यादव, रंगभवन. या पत्त्यावर पाहा"

"जस्ट-ए-मिनिट, हा सापडला. सिक्स, एट, थ्री, नाओन, टु"

अर्जुनाने तो टेलिफोन नंबर उतरवून घेतला आणि लगेच हस्तिनापूरहून द्वारकेला ट्रंक टेलिफोन मागितला. ट्रंक ऑपरेटर म्हणाली, हं घ्या. तिकिट नंबर बी फॉर भीम. वन् झिरो फाईव्ह."

अर्जुनाला आता बरं वाटलं. मग तो श्रीकृष्णाच्या रंगभवनाला ट्रंककॉल लागायची वाट पाहू लागला. इतक्यात दुर्योधनाकडे पाठविलेला गुप्तहेर आला. त्याने सांगितले, "महाराज, दुर्योधनानेही कृष्णजी महाराजांच्याकडे कॉल लावला आहे."

ते ऐकून भीम संतापाने उठून म्हणाला, असं काय ? मी आत्ताच्या आत्ता जाऊन या गदेनं त्याच्या टेलिफोनच्या ताराच तोडून टाकतो."

धर्मराज त्याला शांत करीत म्हणाले, "नाही. भीमा हे धर्मयुद्ध आहे. यात टेलिफोनच्या तारा तोडणं हे गैरकृत्य आहे."

ते निर्भत्सनेचे भाषण ऐकून भीमाने 'दुर्योधन टेलि-

फोन तारभंगाचा' आपला निर्णय स्थगित केला.

दोन तासांनी, "द्वारका -हस्तिनापूर हिअर तुम्हाला कोणती पार्टी हवीयं ?"

"मी मघाशीच नंबर सांगिलाय्."

"थांबा एक मिनिट." काही वेळानं-"हस्तिनापूर ६८३९२ ऑन द लाईन." बऱ्याच तपश्चर्येनंतर अर्जुनाला दुखद टेलिफोनची घंटा ऐकू आली. कोणी तरी फोन उचलल्याबरोबर अर्जुन घाईघाईनं म्हणाला, "प्रणाम महाराज, आपल्या पायाशी एक विनंती आहे, लवकरच कौरव-पांडव युद्ध होण्याची शक्यता आहे. त्यात आम्हाला आपल सहाय्य पाहिजे आहे."

"कोण रे बोलतंय ?" उग्र आवाज आला.

"मी ... मी ... अजानुबाहू, धर्मबंधु, सुभद्रापती, पार्थ, अर्जुन..."

"अरं-तिच्या-मारी ! येकदम येव्हढी मानसं फोनावर बोलत्यात."

तो आवाज आणि भाषा ऐकून हे श्रीकृष्ण नव्हेत हे अर्जुनाच्या लक्षात आले. त्याने घाईघाईने विचारले, "आपलं शुभनाम ?"

"मी बकासुर आहे."

"आऊ ! सॉरी रॉंग नंबर" म्हणत अर्जुनानं फोन खाली आपटला.

द्वारकेचा कॉल मागितला तो मथुरेला गेला. आता काय करायचं ? आपल्या आधी दुर्योधनाचा फोन श्रीकृष्णांच्या कडे लागला की संपलाच कारभार !

यावेळी श्रीकृष्ण रंगभवनातून राधेला फोन करीत होते, हे बघ आज संध्याकाळी रासक्रिडेची अँपॉइंटमेंट आहे लक्षात आहे ना ?"

"कोण पाहिजे आपल्याला ? कोण बोलतंय ?" पलिकडून एका तरुण स्त्रीचा आवाज, "अगं मी श्रीकृष्ण बोलतोय. मला...... मला...... राधा...

"रॉंग नंबर" त्या बाईने रुक्ष आवाजात उत्तर दिले.

"अहो रॉंग नंबर होता तर तुम्ही तो घेतलात कशाला ? असं रागानं म्हणून श्रीकृष्णांनी फोन बंद केला. इतक्यात पुन्हा फोनची घंटा वाजली श्रीकृष्णांनी फोन घेतला, हॅलो ! कोण आहे ?"

"मी दुर्योधन, थोड्या दिवसांनी युद्ध करावं असा विचार आहे. तेव्हा, आपण मला जर शस्त्रपुरवठा करावा अशी विनंती करण्यासाठी फोन केलाय."

"अहो, पण शस्त्रपुरवठा केल्यानं आंतरराष्ट्रीय क्षेत्रात तणातणी वाढते हे माहित आहे ना तुम्हाला ? असं करा, मग मला . . . "

"माफ करा दुसरा फोन वाजतोय." असं म्हणून श्रीकृष्णांनी दुर्योधनाचा फोन तसाच ठेवून दुसरा फोन घेतला.

" मी अर्जुन. मला आपली मदत हवीय्. युद्धाचा प्रसंग नजिक येऊन ठेपला आहे." अर्जुन सांगू लागला. श्रीकृष्णानी सांगितलं, "पण मी प्रत्यक्षात लढाई करणार नाही, फक्त युक्तीच्या गोष्टी..." इतक्यात श्रीकृष्णाच्या महालातील तिसरा फोन वाजू लागला. तेव्हा ते म्हणाले, "थांबा हं—हा लायटनिंग कॉल दिसतोय..." तिसरा फोन उचलून श्रीकृष्ण बोलू लागले, "हॅलो— हा मीच बोलतो आहे, कोण ? नारदमुनी ! या . या... केव्हाही या, तुम्हाला काही शस्त्रास्त्रांची मदत ?"

"छे रे बाबा, मला लढाई करून करून काय मिळवायचं आहे ? मला फक्त तुझं दर्शन घ्यायचं आहे. काल टि. व्ही. वर कार्यक्रम पाहिला तुझा, म्हटलं भेटून चर्चा करावी. छान झाला हं कार्यक्रम." नारदांनी सांगितलं.

"कसचं.. कसचं, एस्क्यूज् मी, माझा चौथा फोन ." असं म्हणून श्रीकृष्णांनी चौथा फोन उचलला. ते त्या फोनवर बोलतात, तोच अर्जुन आपल्या मागणीची घाई करू लागला, "हॅलो-हॅलो महाराज, त्या कपटी दुर्योधनाचा काही फोनबीन ?" टेलिफोन एक्स्चेंजच्या चमत्कारानं अर्जुनाचा हा फोन दुर्योधनाच्या फोनशी जोडला गेला. पण बोलून-चालून कपटीच. त्यानं श्रीकृष्णाच्या आवाजाची नक्कल करीत म्हटलं, "नाही बुवा दुर्योधनाचा कित्येक महिन्यात फोन नाही, बरं तुला काय हवंय ते सांग ?"

" महाराज, त्या दुष्ट कौरवांचा पाडाव करण्यासाठी -- हॅलो -- हॅलो. अहो माझा फोन कट झाला वाटतं ? द्वारका एक्सचेंज ?" अर्जुन आपल्या फोनवर मोठमोठ्याने ओरडून फोन मध्येच डिसकनेक्ट झाल्याची तक्रार करु लागला शेवटी एक्सचेंज मधल्या ऑपरेटरचा सुमधुर आवाज आला," येस ? यु वॉन्ट द्वारका ? जस्ट-ए-मोमेंट सर. हा ! इकडे बोला "

"द्वारका " एक नाजुक आवाज आला, " मी आपल्यासाठी काय करु शकते ? "

अर्जुनानं तितक्याचं नम्रमणे सांगितले, " आपण मला श्रीकृष्ण यादवांचा फोन देऊ शकता ? "

" वन मोमेंट सर. त्यांचा रुम नंबर ? "

" खोली ? अहो महाराज श्रीकृष्ण म्हणजे तुम्हाला काय ' पिअरलेस्चे ट्रव्हलिन एजंट ' वाटले काय ? त्याचा राजवाडा आहे. हॉटेलात राहात नाहीत ते "

अहो पण हे द्वारका हॉटेल, हस्तिनापुर आहे " तिनंही नम्रपणे पण स्पष्टपणे सांगितलं

" रॉंग नंबर. " म्हणून अर्जुनानं फोन आपटला.

इकडे श्रीकृष्णांनी नारदांचा फोन बंद केला. मग त्यानी दुर्योधनाचा फोन उचलला आणि ते बोलु लागले, " हां मग तुम्हाला किती अक्षौहिणी सैन्य पाहिजे म्हणता ? "

" सैन्य ? अहो मला सैन्य काय करायचं ? मी राधा आहे

" अरे बापरे ! अग तू इकडे कशाला फोन केलास? ही रुक्मिणी इथंच आहे. अग, निरोप पाठविन मी. तू फोन ठेव खाली. " म्हणून श्रीकृष्णाने फोन ठेवला.

श्रीकृष्ण या कटकटीने जाम वैतागून जातो. तो बसणार तेवढ्यात, -- " ट्रिंग -- ट्रिंग --- " फोन उचलतो, " मॉर्निंग अलार्म सर, प्लीज गेट अप "

" गेट अप ? अहो हे टेलीफोन खातं आहे की चेष्टा आहे ? अजून मी झोपलेलो नाही, इतक्यात उठा काय ? "

"आपला नंबर काय ?" श्रीकृष्णांनी नंबर सांगितला. त्यावर ती ऑपरेटर म्हणाली, " सॉरी सर, रॉंग नंबर. " पुन्हा घंटा वाजली.

" ट्रंक कॉल फॉर एस व्ही यादव "

" मीच बोलतो आहे "

" --- शीं बोला ! "

" कोण ? "

" मी -- अरे तुझा जुना मित्र सुदामा बोलतो आहे. "

" अरे व्वा ! काय मित्रा कसं कायं चाललं आहे तुझं ? तुझे रथ, विमाने, मोटारी, उद्योगधंदे -- कारखाने वगैरे धुमधडाका असेल नाही ? बरं वहिनी काय म्हणतात ? हॅलो -- हॅलो -- . "

" कोण शंख करतोय ह्यो ? " कुणाचा तरी भसाडा आवाज मध्येच आला " अरे पण मी आत्ता सुदाम्या बरोबर बोलत होतो. आणि मध्येच तोंड खुपसणारे तुम्ही कोण ? " श्रीकृष्णांनी रागाने विचारलं.

" मी घटोत्कच हाये, तू कोन रं ? " श्रीकृष्णांनी पटकनं फोन बंद केला. उगीच शिविगाळ ऐकायला नको. पण द्वारका-एक्सचेंज म्हणजे आजकाल एक वैतागच कोणाचाही फोन कोणालाही जोडला जातो हा विचार मनात येतो न् येतो तोच पुन्हा खणखणाट, " हॅल्लो -- "

" अरे ओ कालियाँ ! कितने आदमी थे रे ?

...स..स ..सरकार पाँच आदवी थे! वो पाँच थे और तुम सौ! फिर भी वापस आ गये। क्या सोचकर आये? के सरकार खुश होंगे?— सुव्वर के बच्चो! तुम सबने दुर्योधनका नाम पुरा मिट्टीमे मिला दिया हैं। इसकी सजा मिलेगी, जरुर मिलेगी ..'' मध्येच टेलिफोन वर हा संवाद सुरू झाला.

श्रीकृष्णाने वैतागून विचारलं, ''कोण बोलतंय्?''

''महाराज पायाला गू! मी भीष्म् प्रॉडक्शनचा व्यवस्थापक मास्टर अंजनपर्व बोलतोय. उद्या सकाळी दहा वाजता आमच्या 'द्रोण स्टुडिओ' मध्ये 'कंसविजय' चित्रपटाचा मुहूर्त आहे ..आपल्या हस्ते ..''

''काय?'' श्रीकृष्णांनी आपल्या कानावर अविश्वास दाखवित विचारलं, ''हो कंसविजय हा आमचा नवा चित्रपट, आम्ही जाहीरसुद्धा केलंय आजच्या 'दैनिक बोंबाबोंब' पेपरात. नव्या 'कंसविजय' चित्रपटाचा मुहूर्त दुःशासन महाराजांच्या हस्ते तेव्हा दुःशासन महाराज आपल्या पायांशी विनंती की...''

''राँग नंबर'' म्हणूत श्रीकृष्णानं फोन वंद केला. इतक्यात आणखी एक फोन खणखणला, ''मी दुर्योधन बोलतोय, परवा फोन कट झाला...''

''जाते मथुरेच्या बाजराला अडवू नको रे मला...'' फोनवर मध्येच ही शृंगारीक लावणी ऐकू येऊ लागल्यामुळं श्रीकृष्ण आणि दुर्योधन यांना शस्त्र पुरविण्याच्या वाटाघाटी करण अगदी अशक्य झालं. त्यातच अर्जुनाचीही लाईन जोडली गेली, त्यामुळं तीन फोन एकत्र आल्यामुळं एकंदर संवाद असा झाला; —

''मला पांडवांचीं पर्वा नाही, पण...'' दुर्योधन.

''दही..दुध..लोणी...'' गौळण.

''युक्तीच्या गोष्टींचं काम आहे?.. अर्जुन.

''न धरी मी शस्त्र...'' श्रीकृष्ण.

''पदराला सोड...'' गौळण.

''मी कुठं धरलंय तुझ्या पदराला?'' वैतागलेला अर्जुन.

''अरे कान्हा! नको हसू माझ्याकडं बघून...'' गौळण

''कोण हसतंय तुझ्याकडे बघून..?'' दुर्योधन, अर्जुन, श्रीकृष्ण

''चोळी माझी...'' गौळण.

''शटअप्. आमच्या येथे लढाईच्या गोष्टी चालल्यात...नि तुझ्या...''

''सगळेच बडबड बंद करा पाहू, नाहीतर मी फोनच तोडून टाकतो.'' श्रीकृष्ण संतापले आणि त्याबरोबर सगळे फोन बंद झाले श्रीकृष्ण स्वतःशीच म्हणाले, ''या टेलिफोन्सचा उपयोगापेक्षा त्रासच जास्त छे! छे!! काय भयानक गोंधळ! जेव्हा जेव्हा या भारतात असा गोंधळ होतो, तेव्हा तेव्हा मला अवतार घ्यावा लागतो.'' त्यांनी गभीर विचार केला व बलरामला फोन करून सांगितलं, ''आज मध्यरात्रीपासून भारतातील सर्व फोन नष्ट होतील आणि त्यानंतर पाच हजार वर्षेपर्यंत त्याचं पुनरागमान होणार नाही...''

''महाराज, आगमनाची तर संपूर्ण तयारी झालेली आहे.'' मध्येच एक भसाडा आवाज आला.

''कोणाच्या.'' चिडलेला श्रीकृष्ण.

''... ... बाईच्या...''

''ओ...शटअप्, राँग नंबर'' म्हणून संतप्त श्रीकृष्णाने फोन उचलून जमिनीवर आपटला आणि त्याच वेळेस घड्याळात ठोके पडले; रात्रीचे बारा वाजले होते.



# शिक्षणक्षेत्र व भ्रष्टाचार




आनिल ताराचंद गर्गे

१२ वी, वाणिज्य


भारताचे पंतप्रधान श्री राजीव गांधी यांनी निवडणूकीनंतर कोणती महत्त्वाची घोषणा केली असेल तर ती म्हणजे भ्रष्टाचार निर्मूलन व स्वच्छ प्रशासन, भ्रष्टाचाराबावत काही मर्यादित व सोयीस्कर समजुती केल्या जातात विशेषतः भ्रष्टाचार हा सरकारी कार्यालयात आपले काम करून घेण्यासाठी होतो. एवढाच मर्यादित अर्थ करून, आपला या गोष्टीशी काहीही संबंध नाही असे प्रदर्शित केले जाते. परंतु भ्रष्टाचाराचे क्षेत्र हे एवढ्यापुरतेच मर्यादित नाही.

पूर्वी देवाचे मंदीर व शाळा ही पवित्र स्थाने मानली जात. अजूनही मानली जातात. देवाचे मंदीर जसे पवित्र तसे 'विद्या मंदीर' पवित्र अशी भावना आजही लोकांच्या ठायी आहे. व त्या दृष्टीने लोक शिक्षण संस्थेकडे पाहतात परंतु पूर्वीचे मंदीराचे पावित्र्य हल्ली विद्या क्षेत्राला राहिलेले दिसत नाही. हल्ली वर्तमानपत्रात व रेडिओवर आपण बातम्या ऐकतो की, अमुक एक पेपर फुटला, दहावीच्या मुलांना कॉपी करतांना पकडले, अमुक एका शिक्षकाने विद्यार्थ्यांचे मार्क वाढविले. हे प्रकार हल्ली शिक्षण क्षेत्रात चालू आहेत. हे शिक्षण क्षेत्रातले पावित्र्य आहे असे आपण म्हणावे काय? हा महत्त्वाचा प्रश्न आहे व याला जबाबदार कोण?

पूर्वी कोणत्याही विषयाचे गाईड वापरणे विद्यार्थ्यांना माहीत नव्हते. शिक्षक काही महत्त्वाच्या म्हणजे ७ वी फायनल, किंवा ११ वी S.S.C. च्या शिकवण्या घेत. परंतु त्याही विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी त्यांनी चांगल्या मार्कांनी पास व्हावे यासाठी जादा तास विनामूल्य घेत असत. व शिक्षकाच्या व विद्यार्थ्यांच्या सचोटीने अभ्यास केला जात असे परंतु या प्रामाणिक प्रथला काही स्वार्थी लोकांनी वेगळेच वळण लावले आहे. व विद्यार्थ्यांच्या शिकवण्या हा हल्ली दुय्यम व्यवसाय बनला आहे विद्यार्थ्यांवरही त्याचा इतका पगडा बसला आहे की, शिकवणी नसली तर आपण पासच होऊ शकत नाही असे त्यांना वाटते. शिकवणी ही फॅशन होऊन बसली आहे. शिकवणी प्रतिष्ठा झाली आहे. आपल्या पाल्याचे नुकसान होऊ नये या भीतीने पालक बिचारे मुलांच्या शिक्षणासाठी कितीही पैसा ओतण्यास तयार असतात. व शिकवणी असल्याने वर्गात लक्ष दिले नाही तरी चालते व हमखास पास होण्याची शाश्वती असते. अर्थार्जन विनासायास होत असल्याने शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांकडं पाहिजे तसे लक्ष देत नाहीत व हेतुपुरस्कर विद्यार्थ्याला कच्चा ठेवून ''अहो याला काहीच येत नाही, पहा बुवा शिकवणी लावा नाहीतर नुकसान होईल.'' हे पालकांच्या मनावर ठसवले जाते. व पालक बिचारा आर्थिक परिस्थिती असो, नसो वेळी कर्ज काढून मुलांचे नूकसान होऊ नये म्हणून शिकवणीचे पैसे भरतो शिकवण्या करणारी ही जी शिक्षण क्षेत्रातील संस्था आहे येथेच खरा अशा प्रकारे भ्रष्टाचार होत राहतो.

पुढे हाच विद्यार्थी बोर्डाच्या परिक्षेत मात्र दोन, तीन वाऱ्या सहज करतो. व वाऱ्या करुन जर फायदा होत नसेल तर सहाजिकच आयत्या कॉप्या करण्याची प्रवृत्ती होते. कॉप्या करुनही फायदा झाला नाही तर काही लोक पैशांच्या जोरावर आपल्या पाल्याचे पेपर ज्या शिक्षकाकडे गेलेले असतात तेथे शाळेच्या एखाद्या

शिक्षका मार्फत वशिला लावून व पेपर ज्या गावाला गेला असेल तेथील शिक्षकाला दोन चारशे रुपये देऊन मार्क वाढवून घेतात. ही आजची शिक्षण क्षेत्रातील पवित्रता आहे.

परंतु अशा परिस्थीतीमुळे खरा अभ्यास करणारा विद्यार्थी खरोखर कॉप्या न करता परिक्षा देतो. परंतु त्याला स्वकष्टाचे मार्क मिळतात. परंतु त्याचाच एक मित्र त्याला हिणवतो. की, मी अभ्यास न करता शेकडा ८० गुण मिळवले. व तू रात्रंदिवस अभ्यास करुनही शेकडा ४५ गुण मिळवले. व अभिमानाने सर्वदूर फीरतो व त्याचा फोटो देखील वर्तमान पत्रात येतो शिक्षक लोक ज्याच्याकडे शिकवणी घेतली तेही कौतूक करतात. व शिकवणी वर्ग पुन्हा जोरात चालावे म्हणून अशा मुलांना माध्यम बनवतात. हा शिक्षण क्षेत्रातील लाजिरवाणा भ्रष्टाचार नाही काय ?

मध्यंतरी शिकवणी बंद करण्याचे फँड निघाले होते. परंतु विद्यार्थ्यांनीच शिकवण्या चालू ठेवा म्हणून 'आंदोलन' केले होते. यासारखी हास्यास्पद गोष्ट आणखी कोणती असू शकते. समाजच वाईट गोष्टींना प्रोत्साहन देतो असा यातून अर्थ निघतो. पूर्वी काही श्रीमंत लोकांच्या मुलांना शिकवण्या असत. तेही मुलांच्या घरी जावून शिक्षक त्यांना ते शिकवत. परंतु हल्ली शेतात मजूरी करणारा बापही मुलाची शिकवणी भरतो. व ती भरणे त्याला भाग पडते. नाहीतर त्याचा मुलगा नापास होण्याची भिती त्याला सांगितली जाते. व त्या भिती पोटी तो कर्जबाजारी होतो. पूर्वी शिकवण्या होत्या कां ? मग मुले कशी पास होत ? पूर्वी गाईड होते कां ? मग मुले कशी पास होत ? याचे उत्तर कोणाजवळ आहे ? शिक्षण क्षेत्रातील ही अपवित्रता जर अशीच जोम धरत गेली तर विद्यामंदिरात पवित्रता राहील कां ?

या अशा प्रवृत्तीमुळे प्रामाणिक शिक्षक व विद्यार्थी यांचे मात्र अतोनात नुकसान होत आहे यास जबाबदार कोण असेल तर अर्थार्जनाचे व्यसन लागलेले काही शिक्षक व भितीने घाबरलेले पालक. नुसते 'भ्रष्टाचार, भ्रष्टाचार' ओरडून भ्रष्टाचार कमी होणार नाही, तर तो निपटून काढण्यासाठी जेथून भ्रष्टाचाराचे मुळ आहे तेच खणून काढावयास पाहिजे. अन्यथा भ्रष्टाचाराचे हे रोपटे वाढून पुढे घातक ठरणार आहे. भारताचे भवितव्य हे भारतीय नवयुवकांवर आधारीत आहे परंतु त्यावर असेच भ्रष्टाचाराचे सावज राहीले तर भारताचे भवितव्य काय आहे याचा विचार न केलेलाच बरा.

## सी आर ( C. R. )

दिलीप रामदास पाटील
द्वितीय वर्ष वाणिज्य (ई)

मला वाटते व्हावे सी आर;
हाताशी असावी गर्दी फार.
पण सोडून देतो मी 'तो' विचार,
कारण पोरांचीच अडचण फार.

मला वाटते व्हावे सी. आर;
तासाला बसायची कटकट नको फार.
पण सोडून देतो मी तो विचार,
कारण भटकावे लागेल दारोदार.

मला वाटते व्हावे सी. आर;
हाताखाली असावे दोस्त चिकार.
पण सोडून देतो मी तो विचार,
कारण खिशाला पडते चांगलेच भुयार.

मला वाटते व्हावे सी. आर;
भाव मिळावा कॉलेजात फार.
पण सोडून देतो मी तो विचार,
कारण वावच नाही मग करायचं काय ?

## डीके



प्रसन्न मुकुंद देशपांडे
द्वितीय वर्ष वाणिज्य

'डीके' म्हणजे डी. के. उर्फ दिनेश केशव कुळकर्णी. आम्हा मित्रांमध्ये 'डीके' या नावानेच लोकप्रिय. क्वचित् प्रेमाने आम्ही त्याला 'डीक्या' म्हणायचो. डीके माझा पँटयार. ( कारण, कॉलेजातच त्याची व माझी ओळख झाली. ) उंच शिडशिडीत बांध्याचा, मिचमिच्या डोळ्यांचा डीके, दोन डीके आरामात मावतील इतके ढगळ कपडे घालायचा. या कपड्यांना जिथे जिथे म्हणून खिसे करणे शक्य असेल, तिथे तिथे खिसे केलेले व प्रत्येक खिशात कंगवा, छोटा चाकू, पेन, रुमाल यासारखं काहीना-काही कोंबलेलं तसेच, विसराळू, कनवाळू, झोपाळू इत्यादी अनेक 'आळू' त्याच्या स्वभावाला चिकटलेले असा हा डीके पोरका पोर होता. तो एक वर्षाचा असतांनाच त्याचे आई-बाबा वारलेत. इथे तो त्याच्या दादाकडे राहायचा.

एकदा आम्ही डीकेकडे टी. व्ही. वर क्रिकेट-मॅच पहात होतो. ( याचा अर्थ आमच्याकडे टी. व्ही. नाही, असे नाही. त्यादिवशी डीक्याचा वाढदिवस होता, म्हणून आम्ही जमलो होतो ) मॅच ऐन रंगात असताना फोनची बेल वाजली. डीके सोडून आम्हा त्रौघांच्या कपाळावर, 'काय शिची कटकट !' या अर्थाने सतरा चोक अड्सष्ट आठ्या पडल्यात. पण डीकेने मात्र शांत मुद्रेने रिसीव्हर हातात घेतला. तिकडून आवाज आला, "हॅलो ! अँड. शहा ?" "सॉरी, रॉंग नंबर !" डीके पुटपुटला. थोड्या वेळाने पुन्हा हेच घडलं. तिसऱ्या वेळी मात्र आमच्यापैकी कोणीतरी टी. व्ही. बघण्यात 'व्यत्यय' नको म्हणून रिसीव्हर खाली काढून ठेवला. मग पुन्हा डीके उठला आणि रिसीव्हर हाती घेऊन म्हणाला, " हॅलो ! मिस्टर, वन मिनीट प्लीज. मी तुम्हाला डिरेक्टरीत पाहून अँड. शहांचा नंबर सांगतो. " आणि नंबर सांगून डीके पुन्हा आमच्यात येऊन बसला. तो म्हणाला, " अरे आधीच रॉंग नंबर मिळाल्याने माणूस वैतागलेला असतो, तेव्हा त्याला मदत करणे आपले कर्तव्य नाही का? " असा हा परोपकारी डीके.

आमचा बारावीचा निकाल लागला. आमच्यापैकी काहीजण पास झालेत. तर डीकेसह एक-दोन जण निकालांत निवालेत. एक-दोन वाऱ्या करुन तेही मित्र पास झालेत पण, बारावीच्या खड्डयात अडकलेलं डीकेचं गाड चार-पाच धक्के मारुनही खड्डयाबाहेर निघेना. शेवटी डीकेनेच बारावीच्या परीक्षेचा नाद सोडला.

दादाच्या वशिल्याने डीके, आमच्या गावच्या 'बोंबाबोंब' या दैनिकात सहसंपादक म्हणून कामास लागला पण तिथेही डीके आपली एकेक अचाट कृत्ये दाखवू लागला. एखादा नेता गंभीर आजारी असतांना त्याच्यावर एखादा लेख लिहून तो तयार ठेवायचा व तो नेता वारल्यावर लगेच दुसऱ्या दिवशी छापायचा व संपादकांची शाबासकी मिळवायचा.

मागे एकदा विनोबा आजारी असतांना, डीकेने त्यांच्यावर लेख लिहायला घेतला विनोबांची प्रकृती गंभीर आहे, ते औषध, अन्न-पाणी औषधालाही घेत नहियेत वगैरे बातम्या ऐकून डीकेला जास्तच अवसान चढायचे. मग विनोबा वारल्यावर, दुसऱ्या दिवशी डीकेने लेख छापला. असं डीकेचं डोकं अचाट होतं.

मात्र, ही बाब एकदा त्याच्या व त्या संपादकाच्या चांगलीच अंगाशी आली. त्याचं असं झालं– आमच्या गावचे लोकप्रिय, मान्यवर, निष्ठावान, धीरगंभीर प्रवृत्तीचे वगैरे वगैरे नेते बाबासाहेब पाटील यांची प्रकृती गभीर होती. लगेच डीकेने त्याच्यावर लेख लिहून ठेवला, नंतर ते वारल्याची अफवा उठली. डीकेने संपादकांना लेख दिला. संपादकांनीही डोळे मिटून लगेच छापलं – "बाबासाहेब पाटील देवाघरी गेलेत. जिल्हा पोरका झाला. बाबासाहेब मनाने सज्जन व पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते होते." वगैरे. (खरं तर त्यांनी चांगलं दोन–तीन वेळा पक्षांतर केलं होतं !) पुढे खरी बातमी कळल्यावर चांगलीच 'बोंबाबोंब' झाली नतर डीकेने व त्या संपादकाने बाबासाहेब पाटलांची समक्ष व पेपरातून जाहिर माफी मागितली. असली अजब वल्ली आपल्याकडे कामास नको, म्हणून संपादकाने डीक्याला डच्चू दिला.

मग बेकार झालेला डीके 'वॉण्टेड'च्या जाहिराती वाचून अर्ज करीत होता. शेवटी एकदाचा त्याला पुण्याच्या एका कंपनीचा इंटरव्ह्यूसाठी कॉल आला. मलाही जरा पुण्याला काम होतं म्हणून मी व डीके बरोबरच निघालो. शाळांना उन्हाळ्याच्या सुट्टया असल्याने गाड्यांना तुफान गर्दी होती. मला व डीकेला कशीबशी दारात बसण्यापुरती जागा मिळाली. आम्ही मजेत पाय खाली सोडून बसलो होतो तोच, नुकतीच विकत घेतलेली डीकेची कोरी करकरीत चप्पल खाली पडली. गाडी वेगात असल्याने उतरणं शक्यच नव्हतं. डीकेने लगेच दुसरीही चप्पल काढून, त्या चपलेच्या दिशेने फेकली. मी म्हटले, "अरे; हे काय ?" डीके उत्तरला, "अरे, मला ही एक चप्पल काय कामास येणार.? निदान ज्याला सापडतील त्याला तरी दोन्ही चपला कामास येतील" मी गप्पच बसलो.

पुण्याला आम्ही डीकेच्या दूरच्या नातेवाईकांकडे उतरलो. इंटरव्ह्यूच्या दिवशी मी त्यांच्याकडेच राहिलो व डीके माझ्या चपला घालून कंपनीच्या ऑफिसकडे निघाला. पुण्यात चित्रविचित्र नावाचे, सतरा प्रकारचे मारुती त्यापैकी एकाचे मंदीर डीकेला रस्त्यात लागले डीके लगेच चपला बाहेर काढून मंदिरात गेला, दर्शन करून बाहेर आला इथे त्याचा विसराळूपणा जागा झाला स्वारी चपला तिथेच ठेवून आणवाणीच चालू लागली. थोड्या वेळाने शुद्धीवर आल्यावर, धावत–पळत मंदिराजवळ येऊन पाहतो, तर चपला गायब. हा तसाच अनवाणी इंटरव्ह्यूला गेला तिथे याचं काहीच इंप्रेशन न पडल्याने सिलेक्शन झालं नाही

आम्ही परतल्यावर दोन-चार महिन्यांनी डीकेचं दादा-वहिनीशी जोरदार भांडण होऊन, तो घराबाहेर पडला. नंतर त्याचा कुठेच ठावठिकाणा लागला नाही. आम्ही त्याला सर्वत्र शोधलं, पण डीके कुठेच सापडला नाही

या घटनेला तीन-चार वर्षे झाली होती. मी जवळजवळ डीकेला विसरलोच होतो.

आणि एके दिवशी अचानक डीके कार घेऊन आला. आमच्या चाळीपाशी आचार्य अत्र्यांच्या भाषेत सांगायचे तर, गेल्या दहा हजार वर्षांत कोणी कार आणली नव्हती आणि डीके चक्क 'मारुती' (अर्थातच, कार) घेऊन आला होता चाळीतली पोरं गोंधळ करू लागलीत, म्हणून मी, 'काय आहे ?' हे पाहण्यासाठी दार उघडले तर समोर साक्षात डीके उभा ! डोळ्यांवर क्षणभर विश्वास बसेना पण तो नक्कीच डीके होता. मी "डीक्या !" म्हणून त्याला मिठी मारली

किती बदल झाला होता डीकेत ! तो बहुतेक कोणत्या तरी बाबाच्या नादी लागलेला दिसत होता. अंगात भगवी शर्ट-पँट, गळ्यात लॉकेट होते.

त्याच्या बोलण्यावरून कळलं की– घर सोडल्यावर तो तडक मुंबईला गेला. तेथे एका हॉटेलात 'पोऱ्या' म्हणून कामास लागला. एकदा एका किराणा दुकानावर सुटा एक रुपया नसल्याने दुकानदाराने डीकेला लॉटरीचे तिकीट दिले. डीकेला चक्क पाच लाखांचे बक्षीस लागले. एवढ्या पैशांचं करायचं तरी काय, म्हणून त्याने रेसवर पैसे लावलेत तर तिथेही बेटयाला पंधरा लाख रुपये मिळालेत. ही सगळी त्या 'बाबांची' कृपा असं तो म्हणतो नंतर डीकेने ट्रान्सपोर्ट कंपनी काढली, त्यातही त्याला भरभरून यश मिळाले

सध्या डीके, मुंबईला आपल्या दादा-वहिनी व बायको–पोरांसह मजेत रहात असून 'डी. के. ट्रान्सपोर्ट कंपनी' चालवतो. आज त्याच्या स्वतःच्या दहा ट्रक्स् आहेत.

नाहीतर आम्ही ! आम्हाला साधं बँकेचं २५,००० रुपयांचं लोनही मिळविता येत नाही.



# भिंतीला तुंबड्या


किशोर बी. खडसे
प्रथम वर्ष वाणिज्य


"पिंकीचे बाबा– कुठे गेलेत हे ?"

"अहो ऐकलं कां ?"

"काय."

"मी ही आपली तळमजल्यावरची खोली सोडायचं ठरविलं आहे—"

"का बरं काय झालं या खोलीला. पूर्वीची आपली खोली पाचव्या मजल्यावरची होती, तिथे तुला चढ–उताराला त्रास होत होता. म्हणून आपण तुझ्याच हट्टाने तळमजल्यावरची जागा घेतली आणि तीही तू सोडायचं म्हणतेस. खोली म्हणजे काय तुला कपडे वाटले दररोज बदलायला ! आणि मिळालेच तर ते कधी खचतील याचा पत्ता नाही शिवाय."

"हे बघा उगीच वादविवाद करू नका. ही तळमजल्यावरची खोली मी का सोडायचं म्हणतेय ते तरी नीट ऐकून घ्या-"

"तुझं बोलण नीट ऐकून घ्यायच्या अगोदर मला समजलेस तू खोली सोडायच का ठरविल. कारण तुला हवी तशी प्रायव्हसी मिळत नसणार !"

"इश्श ! अस काहीतरीच काय बोलताय हो, आपल लग्न का चार दिवसापूर्वी झालेय प्रायव्हसीचा विचार करायला !"

मग खोली सोडायच कारण काय आहे ते सांग बर."

"कारण ती दुसऱ्या मजल्यावरची बाटकोपरे बाई आणि तिसऱ्या मजल्यावरची आशा वाणी. या दोन्ही मला येता जाता 'तुम्ही तळात रहाणारी माणसं, तुम्ही तळात रहाणारी माणसं.' अस चिडवत असतात. जस आपण तळात रहातो म्हणजे गटारात रहातो."

"हे बघ – – – माझ्याशी भांडायला तुझ्यात बळ असतं – – – मग त्यांच बोलण का ऐकून घेतेस ?, त्यांना चांगला धडधडीत प्रश्न विचार त्या अस का म्हणतात म्हणून" –

"मी विचारायची राहिलेय असं वाटतं तुम्हाला ? मी विचारल तर त्या म्हणतात की पंतप्रधान राजीव गांधीच म्हणालेत की तळात भ्रष्टाचार असतो नि वरच्या भागातील माणसं स्वच्छ असतात." –

"कमालच करतेस तू अग पंतप्रधानांच्या उद्गारांचा खरा अर्थ त्या बायांना कळलाच नाही म्हणजे"–

"अग पंतप्रधान हातात कसली ना कसली सत्ता असलेल्या लोकांबद्दल बोलत होते. त्याच म्हणणं अस की तळातल्या भ्रष्टाचाराला आळा घालण कठिण असतं, कारण तळात हजारो माणसे काम करित असतात, वरती टोकावर कमी माणसे असतात – – – कुठल्याही कारभार यंत्रणेचा आकार तळातून वर निमूळता होत नाही का ?"

"होतो, पण काय हो – – – तुम्ही साधे हेडक्लार्क आहांत ना ?"

"होय ना."

" मग तुमच्यावर किती माणसे आहेत ? "

" ऑफिस सुप्रेंटेंडंट, उपखाते प्रमुख नि खात्याचा प्रमुख " –

" म्हणजे तुम्ही पण तळातलेच आहांत होय ना. "

" अलबत साली " — ' उगीच काहीतरी बोलू नका हं ' —

" म्हणजे पंतप्रधानांच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही तुमच्यावरील सर्व वरिष्ठाहून भ्रष्टाचारी आहात ? "

" म्हणजे ... ... मला तस काही म्हणायंच नाही ... .. पण पण " —

" आता त . त ... प . प .. करुं नका. माझ्या प्रश्नाला सरळ उत्तर दया म्हटल "

" अग तस नाही, पण माझ्या हातात कुणाच भल करण्याची थोडी सुद्धा सत्ता नाही बघ " —

" होय ना. मग तुम्ही वरिष्ठ लांचखोर आहेत, वशिलेबाज आहेत असं गाणं केव्हाही का म्हणत असतात हो ?"

" ते वरचे लोक तसे असतात म्हणून... कारण प्रत्येक प्रकरणात ते पैसे खात आहेत हे मी दररोज बघत असतो. " —

" आणि तरीही तुम्हाला पंतप्रधानांच्या उद्‌गारात काही गैर वाटत नाही ? "

" हे बघ, पंतप्रधानांनी हे उद्‌गार काढलेत ते एका परदेशी नियतकालिकाला मुलाखत देतांना — अशा वेळी अस बोलावंच लागते. ' त्यांनी काय असं सांगायला हवं होत की भारतातले सर्व वरच्या श्रेणीतले सत्ताधारी भ्रष्टाचारी आहेत म्हणून ? " ते जर असं म्हणाले असते तर आपल्या देशाची विकृत प्रतिमा परदेशांत उमटली असती नां "

" अच्छा ! ... म्हणजे वरच्या श्रेणीतले लोक स्वच्छ आहेत. नि खालच्या श्रेणीतले लोक भ्रष्टाचारी आहेत असं सांगितल की परकीयांच्या मनात भारताबद्‌दलची चांगली प्रतिमा निर्माण होते ? "

" तसं नव्हे ग ...... पण शिपाई, कारकून, वगैरे तुटपुंजा पगार मिळवणारी मंडळी .. .. ... चहा पानी नी पानसुपारी खाणार हे सर्वत्र गृहीतच धरल जातं. कारण या लोकांना दिल्या जाणाऱ्या पगारात त्यांचा महिन्याचा खर्च भागणार नाही अस सर्वच जण समजून असतात. उच्च पदस्थाचे पगार नि उत्पन्ने दणदणीत असतात. ते कशाला भ्रष्टाचारी मार्गाने पैसे खातील ? ते बिचारे संतुष्ट असल्याने स्वच्छ-स्वच्छ रहाणेच पसंत करतात " —

" म्हणजे तळच्या लोकांत भ्रष्टाचार आहे हे तुम्ही मान्यच करताय तर ? "

" मान्य न करुन कस चालेल ? आजकाल पुढे माल ठेवल्या शिवाय एकही गोष्ट पुढे सरकत नाही हे आपण प्रत्यक्ष बघतोच " —

" अहो पण पंतप्रधानांच्या मुलाखतोत काढलेले उद्‌गार " —

" हे बघ ! एकतर मुलाखतीत काढलेले उद्‌गार फारसे गांभिर्याने दयायचे नसतात. आणि पंतप्रधनांनी मुलाखत दिली ती ' चीफ एक्झिक्युटीव ' या नियतकालिकाला त्यामुळे असे काही बोलण्याशिवाय त्यांच्या पुढे पर्याय नव्हता. "

" डोंबल माझं ! तुम्ही काय बोलताय ते तुमच तुम्हालाच कळतय् की नाही तेच मला कळत नाही. " –

" कळतय तेव्हा तर बोलतोच " –

" मी खोली बदलवल्याच विचारत होती तर काहितरीच राजकारण घेऊन आले, उगीच डोक्याला त्रास आहे हा. काय कराव काही समजत नाही. " –

" डोक शांत करायला बाहेर फिरायला चला मग "

" चलताय " —

" आता नाही म्हणून कस चालेल याव तर लागेलच. "

" चलातर मग, आपण बाहेर फिरायलाच जाऊ या. " —



# आजच्या युवकापुढील आव्हाने


## कु. मनिषा खेमचंद महाजन

इ. ११ वी डी (वाणिज्य)


आजचा युवक हा अनेक समस्यांतून जात असतो. किंबहूना समस्यातून नव युग जन्मास येत असते. जीवनाची यशस्वी वाटचाल करणाऱ्यांना नवे आणि जुने तसेंच गेल्या पिढीचे आणि विद्यमान पिढीचे संघर्षमय प्रसंग उद्‌भवतात.

" आमच्या वेळी असं नव्हतं बुवा " असा सूर धरणारे लोक नेहमीच आपल्याला आपल्या भोवती आढळतात. जुन्या पिढिला नवी पिढी ही वाया गेल्यासारखी वाटते उदासीन, ध्येयशून्य किंवा आदर्शहिन अशी विशेषणे त्यांना लावली जातात. आज जी मंडळी साठी ओलांडू इच्छित आहे, ज्यांनी स्वातंत्र्याच्या यज्ञकुडात आपल्या श्रमाचे आणि स्वतंत्राचे बलिदान केले आहे. त्यांना वाटते की, " ह्या तरुणापुढे आज काही आव्हानात्मक कार्यच राहिले नाही. पण तसे नाही. आजचा तरुण जरी स्वतंत्र भारतात जन्माला आलेला आहे. तरी त्याच्यापुढे अनेक आव्हाने आ वासून उभी आहेत.

स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर करणे, वाढती लोकसंख्या, खेडी स्वच्छ करणे, अस्पृश्यता नष्ट करणे, अज्ञानाचे निर्मूलन, बेकारी, भ्रष्टाचार या भस्मासुर, हुंडा पद्धत, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी तरुणापुढील ज्वलत आव्हाने आहेत.

इंग्रज राजवट संपली स्वातंत्र्य मिळाले. शतकानंतर स्वातंत्र्याची पहाट उगवली. अंधाराची काळरात्र संपली. स्वराज्य मिळाले. पण त्याची फळे ज्या प्रमाणात मिळावयास पाहिजे ती अद्याप मिळाली नाहीत, " स्वातंत्र्य मिळाले पण सुराज्य साकार झाले नाही." याची कारणे आजच्या तरुणांनी शोधून काढली पाहिजेत. आपल्या राष्ट्रापुढील कितीतरी प्रश्न हे आजच्या तरुणापुढील आव्हानेच्च आहेत.

आपल्या भारत देशापुढे अनेक प्रश्न आहेत. त्यापैकी सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे " वाढती लोकसंख्या " जागतिक दृष्टीने लोकसंख्येचा विचार केला तर प्रथम क्रमांक चीन आणि दुसरा नंबर भारताचा लागतो. सन १९८१ च्या शिरगणतीनुसार भारताची लोकसंख्या ६८·४ कोटी आहे आणि या शतकाच्या शेवटी भारताची लोकसंख्या १०० कोटीपेक्षा जास्त होईल. " मुले म्हणजे देवा घरची फुले " अशा अंधश्रद्धांचा होम केला पाहिजे.

केशवसुतांनी जुन्या अंधश्रद्धेचा, जुन्या विचारांचा जसा त्याग केला त्याप्रमाणे जुन्या रुढींचा आणि जुन्या समजुतींचाही त्याग करण्यासाठी ते म्हणतात, ' जुने जाऊ द्या मरणालागुनी जाळुनि किंवा पुरुनि टाका. '

" दोन लेकरं नक्षत्रावाणी, घर हसतंय फुलावाणी. " हे नवे सुत्र लोकसंख्येच्या दृष्टीने पाळावयास हवे.

आजही खेड्यात दारिद्र्य, रोगराई अस्वच्छतेचं घाणीचे साम्राज्य पसरले आहे. यासाठी तरुणांनी पुढे यावयास हवे. गांधीजींच्या " सत्याच्या प्रयोगातील " खेड्याची कल्पना यशस्वी करावयास हवी. खेडे स्वयंपूर्ण व्हावे. स्वावलंबी व्हावे, निर्भय व्हावे, स्वच्छ व्हावे, आदर्श व्हावे, तसेच ज्ञानाची गंगा शहरापासून खेड्यात पोहचली पाहिजे. २१ कलमी राज्याचे गांधीजींच्या योजना खऱ्या अर्थाने

खेड्यात गेल्या पाहिजेत. रावविल्या पाहिजे. तरच " खेडी सुखी तर देश सुखी होईल " आणि हे जेव्हा होईल तेव्हाच " हरीत क्रांतीचे पाऊल पडते आहे " असे म्हणावयास जागा निर्माण होईल. परंतु आजही खेड्यातील जनतेस लुबाडले जात आहे. खेड्यात क्रांतीकारी परिवर्तने होणे दूरचंच आहे.

बेकारी हे आजच्या तरुणांपुढील असेच आव्हान ठरेल. आज युवक मोठ्या आशा आणि आकांक्षांनी पदवी घेतात. पण पदव्या घेऊन भाकरीचा प्रश्न सुटत नाही सुशिक्षित आणि अशिक्षितांना हा प्रश्न विशेषत: भेडसावतो. खरे म्हणजे आजची शिक्षण प्रसारने अमुलाग्र बदल होण्याची आता वेळ आली आहे. सातव्या योजनेचा विचार होवून नवे मंथन हाती येण्याची शक्यता आहे. पण सुशिक्षितांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता आपली गरीबी हटावसाठी स्वत:चे व्यवसाय काढून बेकारीवर मात केली पाहिजे. स्वत:चा व्यवसाय काढल्याने आत्मनिर्भर होता येईल. गोळ्याचा कारखाना, पाव कारखाना, हत्यारी व्यवसाय यासारखे सांगता येतील. कुटिरोद्योग व लघु–उद्योगामुळे अनेक बेकारांच्या हातांना काम देऊन नैराश्य टाळता येईल. भारत जपानसारखे उद्योगप्रधान राष्ट्र बनू शकेल.

अडचणी राहणार म्हणून पळून जाऊन चालणार नाही. कारण " साहसे श्री प्रति वसंति ।। " हे त्यांनी ध्यानी घेतले पाहिजे आज जिकडे तिकडे भ्रष्टाचाराचा भस्मासूर, ससर्ग रोगासारखा वाढत आहे. या रोगाला वेळीच आळा बसला पाहिजे यामुळे समाजपुरुष पोखरून निघाला आहे. यासाठी स्वच्छ प्रशासन हाच एकमेव उपाय सुचविता येईल. यासाठी स्वतंत्र मोहीम उभी करावयास हवी, अशा रितीने समाजातील सर्व थरातील भस्मासूर भस्मच केले पाहिजे. लोकशाहीत यथा राजा तथा प्रजा असे सूत्र व्हायला हवे. निवडणुकीत भ्रष्टाचाऱ्यास खळ्यासारखे बाजूला फेकायला हवे.

" हुंडा पद्धत " ही एक मोठी कीड आपल्या समाजाला ग्रासून बसली आहे. आज हुंडा बळी कायदा झाला आहे. परंतु कायद्याने सर्वंच होते असे नव्हे. यासाठी तरुण–तरुणींनी पुढे आले पाहिजे. आचार आणि विचार जेव्हा हातात हात घेऊन चालतील तेव्हा त्यातून चांगले निष्पन्न होते. " बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले " असे संतांनी उगीच म्हटले नाही.

म्हणून कोणत्याही कामाची सुरवात प्रथम घरापासून व्हावी कारण आचरण संहिता प्रथम गृहपासून प्रारंभ करता यावा म्हणून प्रत्येक युवकाने— " मी हुंडा घेणार नाही आणि कुणाला घेऊ देणार नाही. " अशी त्याने प्रतिज्ञा केली पाहिजे.

" राष्ट्रीय एकात्मता " बाबत देखील प्रत्येक युवकाला आव्हान पेलावे लागेल. राष्ट्रीय एकात्मतेसाठी आपल्या माजी पंतप्रधान इंदिराजी यांनी आपले प्राण वेचले. आपल्या प्राणाची आहुती दिली. इंदिराजींनी अखेरपर्यंत लढा दिला आजच्या युवकांना इंदिराजींनी आदर्श दिला. आजच्या युवा पिढीला हे आव्हान आहे.

" हा जातीभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी ।। "

राष्ट्रीयतेचे हे शिवधनुष्य आमच्या पिढीने पेलले पाहिजे.

# सुकल्या आठवणी

सतीश वामनराव साळुंखे
एस. वाय. बी. एस्सी.

आठवणींच्या जीवंतधारा,
नेत्रांमधूनी वाहती झराझरा
मी एकटी मनात रडते
अश्रूंमधुनी शब्द उमलते.
आल्या लाटा आठवणींच्या
जळला मोहोर विझली आशा
वेलही प्रितीची जळून गेली
स्वप्ने सारी मनात विरली
स्मृती चिन्हे ही पुसून गेली
तुझ्या अभावी, तुझ्या अभावी.

# भंगलेले स्वप्न !

कु. कल्पना वि. जोशी
१२ वी कला



" आज कुणीतरी यावे, ओळखीचे व्हावे "

रूपाला हे गाणे आज सारखे म्हणावेसे वाटत होते, आणि कारण ही तसेच होते. आज तिला रविचे पत्र मिळाले होते. तिला त्याने पुण्याला बोलावले. रूपाचे मन अगदी मोहरुन येत होते. कारण तिचे स्वप्न आता साकार होणार होते. पण मनाच्या दुसऱ्या कप्प्यात कुठेतरी पाल चुकचुकल्यासारखी होत होती. मन हे अगदी फिरत्या भोवऱ्या प्रमाणे चंचल असते. क्षणात इथे तर क्षणात तिथे. पत्र हातातच असतांना तिला मागील इतिहास आठवला.

रूपा ही तशी कमालीची बोलकी मुलगी, त्यामुळे तिला तिच्या शेजारीच काय, पण सर्वंच गल्लीत कोणाची बदली झाली, कोण नवीन रहायला येणार, यापासून ते त्यांच्याकडे आज काय भाजी केली इथपर्यंत माहिती असे. तिच्या शेजारी आज कुलकर्णी रहायला येणार होते. आता आपणास नवीन शेजार मिळणार, आणि नवीन मैत्रिणी मिळणार या आनंदात रूपा स्वत:ला पूर्ण विसरली होती. तिचे यंदा बारावीचे वर्ष होते. कॉलेजात गेली तरी तिच्या डोक्यात त्याच विचारांचे थैमान चालू होते. कॉलेजातून येताच तिला शेजारचे दार उघडे दिसले, तिथे हसण्या बोलण्याचा आवाज ऐकू येत होता. रूपाने कसे तरी वह्या पुस्तकं घरात ठेवले व धावत पळत शेजारील घरात शिरली. तर तिथे रूपाची आई सर्वांची ओळख कुलकर्णी काकूंना करुन देत होती.

तितक्यात रूपा तिथे पोहचली तेव्हा सर्वांचे लक्ष तिच्याकडे वेधले विशेषत: कुलकर्णी काकूंचे. ही कोणाची मुलगी या भावार्थाने त्या बघत राहिल्या. तेवढ्यात कुठूनसा आवाज आला. " आज टेलीफोन घरी नव्हता वाटत ! " तशी रूपाची आई म्हणाली " अहो, तिचे कॉलेज होते ना. म्हणून नाहीतर सर्वांना नवीन पाहुण्यांची तीच देते माहिती " असे बोलता-बोलता कुळकर्णी काकूंना आईने ओळख करुन दिली. " ही माझी मुलगी रूपा. यंदा बारावीत आहे " तशा देशपांडे काकू म्हणतात " आणि हो ! तशी हुशार व खूप बडबडी आहे तुमचे सारखे मनोरंजन करील ती ! " असा सर्वजणी तिचा परिचय करुन देत असल्याने रूपा अगदी लाजून अंग चोरुन तिथे उभी होती. आता काय बोलावे, या विचारात असतांना तिने त्यांच्या घरात कोणकोण आहे हे सर्वांच्या बोलण्यावरुन जाणून घेतले. ती घरी परतली तसे तिचे मन जरा नाराज झाले होते. कारण तिला मैत्रिणी मिळणार नव्हत्या. कुलकर्णी काकूंना फक्त एकच मुलगा होता. त्याचे नाव रवी. तो यंदा टी. वाय. बी.एस्सी. ला होता.

दुसऱ्या दिवसापासून रूपाचे शेजारी व कुलकर्णी काकूंचे रूपाकडे येणे जाणे सारखे सुरु झाले. त्या दिवशी त्यांनी रूपाला जेवायला बोलवले होते, व रवीची ओळख करुन देतांना त्या म्हणाल्या, " आम्ही इथे नविन असल्याने इकडचा भाग आम्हाला माहीत नाही. तर तूच आज रवीला कॉलेज वगैरे दाखवशील का ? " अर्थात रूपाला नाही म्हणणे शक्य नव्हते. नविन पदार्थांची देखील एकमेकांकडे देवाण घेवाण होई. या परिचयाने सर्वांना सर्वांच्या स्वभावाची चांगलीच जाणीव झाली.

रूपाचा आज रिझल्ट लागायचा होता. ती बडबडी असल्याने सर्वांचेच लक्ष तिच्या निकालाकडे वेधले होते. केव्हा एकदा परीक्षेचा निकाल कळतो व आपणास पेढे मिळतील असे सर्वांना झाले होते. तेवढ्यात रूपा आली. ती फर्स्ट क्लास मध्ये पास झाली होती. तिचा रिझल्ट पाहून बायकांच्या हास्य-विनोदाला ऊत आला 'रूपा आहेच म्हटल तशी हुशार !' अशातऱ्हेने विविध आवाज तिला ऐकायला मिळाले, तो दिवस कुठे गेला हे रूपाला देखील कळले नाही. काही दिवसांनी रवीचा देखील बी. एस्सीचा रिझल्ट लागला तो देखील चांगल्या मार्कांनी पास झाला होता. आता त्याला पुण्याला पुढील शिक्षणा-साठी जायचे होते. एक वर्ष कुठे निघून गेले हे कुणालाही कळले नाही.

एक दिवस रविची आई रूपाच्या घरी आली व म्हणाली "रूपाच्या आई, इतके दिवस कुठे निघून गेले ते कळले नाही, आपल्या सर्वांच्या बोलक्या स्वभावामुळे आम्ही अगदी रमून गेलो होतो. पण आता तुमचा व आमचा सहवास आता थोड्या दिवसांचा. आणि हो ! आपणास एक विचारले तर, राग तर येणार नाही ?" त्यावर रूपाच्या आई म्हणाल्या "अहो राग कसला ? काय विचारायचे ते अगदी बिनधास्त विचारा" "अहो म्हणजे तुमच्या रूपाला आम्ही सून करायच म्हणतो !" ऐकताच आई मोहोरली. तिला जणु आनंदाचा व सुखद आश्चर्याचा धक्का बसला ! "अहो, त्यात काय विचारणं झालं, आम्हालाही रवी पसंत आहेच. हरकत नाही. झाल तर मग, रवी डॉक्टर होतो, तोवर रूपा देखील बी. ए. होईल, मग मी आपणास तसे कळवीनच झाले. यावरच त्यांचे त्यादिवशीचे बोलणे थांबले.

नंतर कुलकर्णी काकूंचा जायचा दिवस उजाडला आम्हा सर्वांनाच, अगदी आमच्या घरातील कोणी व्यक्तीच गावाला जातय् असं वाटलं कुलकर्णी काकू गेल्या खऱ्या, पण मन अगदी रमेना त्यानंतर पत्र आलं ते तीन वर्षांनीच. व त्यात फक्त तिला बोलावले होते इतकेच. आता मात्र रूपाची धांदल उडाली. तिने आवश्यक तेवढ्या सामानाची बांधाबांध केली. व सर्व सामान घेतला की नाही ही खात्री करुन ती लगेच स्टेशनवर जाण्यास निघाली. तिला आज असे झाले होते की, हा एवढा प्रवास अगदी क्षणात संपावा? एकदाची गाडी आली. गाडीत अगदी कंटाळल्यासारखं झालं म्हणून तिने पेपर वाचण्यास घेतला. तेवढाच वेळ जाईल. एकेक कॉलम वरुन रूपाची नजर फिरु लागली तेवढ्यात एका ठळक मथळ्याने तिचे लक्ष वेधले त्यात असे होते, "आज रवी व रजनी यांचा विवाह." हे वाचून तर रूपाला भोवळ येते की काय, असे झाले. पण तिने स्वतःला सावरले. या जगाचा आणि त्यातील लोकांचा तिला असा संताप आला आणि वाटले त्या पेपराच्या फाडून चिंधड्या चिंधड्या कराव्या

"पण काय उपयोग !" होणार ते थोडच टळलं असत. ती बेचैन नजरेने इकडे, तिकडे बघत आहे. तोवर तिच्या कानावर नकळत से सूर पडले./ "मुझे भूल गये सावरीया ऽऽऽ" तिला वाटले हा आवाज (सूर आताच नाहीसा करावा. पण करणार काय? अखेर रूपाचे स्वप्न ते स्वप्नच ठरले नव्हते का ?

# यायचेच होते ....

प्रल्हाद पाटील
द्वितीय वर्ष वाणिज्य

यायचेच होते जीवनात माझ्या
सोडूनी तू गेलास का ?
तहानलेल्या कळीवर
प्रितीचा वर्षाव केलाच का ? ।। १ ।।

यायचेच होते जीवनात माझ्या
दुःख तू दिलेस का ?
या खुल्या मधमाशीस तू
प्रिती-सुमनात कोंडलेंच का ? ।। २ ।।

यायचेच होते जीवनात माझ्या
विरह तू दिलास का ?
सांग प्रियकरा सांग
निष्ठूर तू झालास का ? ।। ३ ।।



# जन्म-तुझ्यापोटी

राजेंद्र म. पाटील
प्रथम वर्ष वाणिज्य ( सी ) वर्ग प्रतिनिधी

सकाळची प्रसन्न वेळ- झाडावरील पक्ष्यांची किलबिल हवेच्या लहरी पानांची सळसळ वातावरण अल्हादकारक होतं. भानूचं घर त्या प्रसन्न वातावरणात खुलून दिसत होतं. आज पोरीच्या जन्माचा बारावा दिवस होता. पत्नीला मातृत्व प्राप्त होऊन जीवनाची परिपूर्ती झाली होती. संसाराच्या वेलीवर एक नाजुक कळी उमलली होती. पाळण्या-तील गोंडस पोर सगळ्यांना मोहित करीत होती. सकाळपासून शेजारच्या बाया-बापड्या यायला सुरुवात झाली. घर अगदी अपुरे पडायला लागले होते. आज नामकरण विधी होता.

बाया बापड्यांचे पाहुणे झाले. बाळाचे जो-जो-रे बाळा गीत झाले. बाळ दर्शनाच्या भेटी झाल्या. प्रत्येक जण मोठ्या प्रेमाने, जिज्ञासेने वाट पहात होते नाव काय ठेवायचं ? एका मागून एक नावं सुचू लागली नावाची नामावली तयार झाली. नावांचा चढउतार ठरू लागला. आवड-निवड पारखली जावू लागली. पोरीच्या आईला नावाचं कुतुहल वाटू लागलं. पाचूच्या मोहक खड्यासारखी अनेक नांवे डोळ्यापुढे फिरू लागली. प्रत्येक नावाचा मोह वाटू लागला.

'काय ग ह्या नामावलीतील कोणतं नाव आवडलं ?' एकीने मध्येच प्रश्न केला ? त्याच क्षणी मातेने उत्तर विरहीत प्रश्न केला. 'त्यांना कोणतं नांव आवडेल ते काय सांगू मी ?' घरातल्या आनंदाची सीमा भरतीसारखी ओसंडत होती, पण भानूच्या विचारांची नौका किनाऱ्याला पोहचली नव्हती. तो शांतपणे बसला होता. विचारात गर्क होता. घरातल्या वातावरणाने चेहऱ्यावर स्मित होते. पण त्यात भग्नता जाणवत होती. तो कुठेतरी स्वतःला भूतकाळात ओढून नेत होता. समरस झालेला असून देखील त्याला प्रत्येक नावात नीरसपणा जाणवत होता. भानू सगळा बाया-बापड्यांचा खेळ पहात होता, अनुभवत होता. पण सारे अबोल !

'भानू ए भानू- तुला कोणते रे नाव आवडतं पोरीचं ?'

घरातल्या बायांपैकी सुमतीने प्रश्न केला. तरी भानू आपला स्तब्ध आणि शांत ओठावर शब्द येत आणि त्याच ठिकाणी विरत असत. शब्द रूप घेत नव्हते- साकार होत नव्हते

'अहो सगळ्यांना वाटतं आपणच आपलं आवडतं नाव ठेवावं पोरीचं मग सांगत का नाही ?' सौभाग्य-वतीने भानूची मूक समाधी भंग केली.

'तुला आवडेल काय ?'

'त्या आवडीचं रूप प्रकट झालं आहे. आता काय आवड निवड बघायची आहे.' सौभाग्यवतीच्या उत्तराने भानूचं मन फुलावर दव पडावेत तसं बहरलं. आणि ओठातून शब्द बाहेर पडले. 'शर्मिला'

घरातल्या बाया बापड्या बाहेर पडल्या. भानू, त्याची पत्नी आणि पाळण्यातील चिमुरडे पोर अेकमेकांकडे टकाटका पहात होती. बाळाच्या गालाचे मुके घेऊन त्याचेवर गुलाबी ठसे उमटत होते. वाता-वरण तसं गुलाबी होतं कुठतरी सुप्त अशी प्रणयाची

चाहूल लागत होती. बाळाला कुरवाळीत सौभाग्यवतीने भानूला आपल्या बाहुत ओढले. तिच्यातील सौभाग्य जागृत झालं... ? आनंदाची भरती आली.

' अरे, अरे हे काय ? ' भानूने विचारले.

' कांही नाही नित्याचाच खेळ, पण काहो 'शर्मिला' हे नाव का आवडलं आपल्याला ' सौभाग्यवतीने प्रश्न केला.

त्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे आज त्याला धाडस झाले होते. आता त्याला पितृत्व प्राप्त झाले होते कानात धुमसणारे बोल प्रत्यक्षात अवतरले होते. कोणाच्यातरी कानाला वास्तव करून असणारा आर्त स्वर आज अचेतनातून चेतनात रुपांतरीत झाला होता. हृदयात गुदमरणारा उमाळा, अंत:करणातील जतन केलेली प्रतिमा आज रूप घेऊन साकार झाली होती. त्याने पोरीचे पटापट मुके घेतले. त्याला ती फारच गोड वाटू लागली – समाजाला वीट आणणाऱ्या जीवावर अेवढी प्रिती अेवढी माया का ?

सोन खेड नावाचं छोटसं गाव होतं. खोपटांची वस्ती होती. गाव तसं घाणेरडं आणि वस्ती त्याहूनही गलिच्छ. सोनखेडच्याच थोडया अर्धा फर्लांग अंतरावर एक माळावर एक खोपट होत. त्या ठिकाणी पती-पत्नी आणि त्यांचा मुलगा भानू रहॉत होता. भानू कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होता. रोज गावाजवळ येऊन बसने तो सकाळी कॉलेजात जात असे सांजच्याला परत येत असे.

त्याच गावात अेक सरकारी दवाखाना होता. डॉक्टर तसे जीवनाचे अर्धे अंतर चालून आलेले होते. त्यांना एकच मुलगी होती. मुलीवर अत्यंत प्रेम होतं. गावाचे ती भूषण होती. मोठ्याचं मूल म्हणून सगळ्यांची लाडकी होती. डॉक्टर गावची आणि आजूबाजूच्या खेड्यांची प्रामाणिकपणे सेवा करीत असे. त्याला पैशाची हांव नव्हती. माणूस माणूसकीचा होता. डॉक्टर सगळ्यांचा चाहता आणि गावकरी डॉक्टरचे चाहते होते. रात्री बेरात्री डॉक्टर जनसेवा करीत असे. अेकटी मुलगी होती. मुलीवर अत्यंत प्रेम होते संसार फारच सुखी मानणारी ती व्यक्ती. मुलगी शहरात कॉलेजला शिकायला जात असे. गावातून शिकायला जाणारी पोरं दोनच. अेक माळावरचा भानू आणि दुसरी डॉक्टरांची मुलगी

दोन्ही पोरांची स्थिती उत्तर-दक्षिण धृवासारखी, रोज बसने जात येत असत. अेका वर्गातील विद्यार्थी पण दोघातही महदंतर होते. दोन्ही पोरं गोड होती. हुशार होती. सोज्वळ होती. निर्वीकार होती. अेकमेकांना ओळखत असून अनोळख्या सारखी होती त्याचं कारण होतं स्थिती ! भानू गरिबाचा मुलगा तर मुलगी डॉक्टरची–! भानू स्वत: लाजरा बुजरा. स्त्री स्वभावाचे अनुभव घेण्याचे साधन म्हणजे आई ! —

कॉलेज सुरु होऊन महिना भराचा काळ लोटला गेला एके दिवशी सांजच्याला पोरं घराकडे परतलीत. मुसळधार पावसाने वेग धरला. बसने परतणाऱ्यांची संख्या दोनच ! बस गावाला पोहोचली. बाहेर पाऊस आणि गडद अंधार, भानू कसाबसा बस मधून खाली उतरला पाठोपाठ डॉक्टरची मुलगी उतरण्याच्या प्रयत्नात होती. ' धपकन ' असा आवाज तिच्या कानावर आला. पट्‌दिशी ती खाली उतरली प्रवासी उतरताच बस निघून गेली. भानू जमिनीवर पडला डॉक्टरांच्या मुलीने हात दिला त्याला जमिनीवरुन उचलले. त्याला काही अेक समजत नव्हते. सुचत नव्हते.

' आपण – आपण - कोण ? '

' मी–मी शर्मिला आहे, भानू ! डॉक्टरांची मुलगी'

भानूला फणफणत ताप भरलेला होता. तो अस्वस्थ झालेला होता. चेहरा निस्तेज झाला होता. अकस्मात आजार ओढवला. शर्मिलाने त्याला हात धरुन घरी नेले. डॉक्टरांनी तात्काळ उपचार केला. रात्रभर राहण्याची व्यवस्था केली. भानुच्या आई-वडिलांना बोलावणे पाठविले. पोराच्या मायेने घिरट्या घालणारे आई-वडिल अंधारात चाचपडत डॉक्टरकडे आले. भानू शांत झोपला होता. त्याच्या कडेलाच शर्मिला बसली होती. आई–वडिलांनी रात्रीचा दिवस केला. मध्यरात्री नंतर तापाने उतार घेतला. आईवडिलांच्या पाणावलेल्या डोळ्यांचे आसू पुसले गेलेत. भानूला बरे वाटले. डॉक्टरांनी पोटच्या पोरासारखी काळजी घेतली, जीवनाचा अर्थ कळलेली माणसं क्षुद्रत्वापासून फार दूर असतात भानू घरी जायला निघाला. वडिलांनी डॉक्टरांच्या पायावर पागोटे ठवले कृतज्ञता व्यक्त करीत म्हणाले " शर्मिला–बाय–हचा जन्मात उपकार कसे फेडावेत ? " भानूचेही डोळे पाणावले.

' भानू तू समजतो तसं नाही. सेवा करणं हे डॉक्टरांचे व्रतच असते. तू समजतो ते अंतर तरी कमी झालं, '

ती घटना घडली तिचे स्वरुप फारच लहान होते. लोकही आजारी पडतात डॉक्टर सेवा करतात. माया, प्रेम, आपुलकी व्यवहार सारा खेळ खेळला जातो. मात्र भानुचं आकस्मात आजारीपण ही घटना अघटितासारखी होती उल्कापातासारखी चकाकणारी ठरली हचा घटनेतून दोन जीवांचे आकर्षण निर्माण झाले. प्रवासात गोडी निर्माण झाली. नविन प्रकारचा गंध दरवळू लागला मने वाट पाहू लागली. स्नेहाचा मधुगंध धुंद करू लागला. जागा—सांभाळल्या जाऊ लागल्या. आवड-निवड पारखली जाऊ लागली. घटनेतून निर्माण झालं ते मनोमिलन नावाचे एकेरी रुप. सोज्वळ निर्विकार अशी प्रीत निर्माण झाली. तिची भरती ओहटी जाणवू लागली. प्रीती सागरात प्रीती नौका वल्हवू लागली. पण त्या नौकेला नियतीच्या खेळाची चाहूल नव्हती माणसाला नियतीच्या खेळाची माहिती असती तर तो अमर झाला असता.

' भानू–आज–आमच्या घरी जेवायचं— आईने श्रीखंड केलं आहे. तुला गोड फार आवडतं ना ?'

' शर्मिला जास्त गोड खाल्ल्याने शेवटी कडवट लागतं.—असे म्हणतात, थोडया साशंक स्वरात भानू उत्तरला.

' भानू असं कसं तुझं मन– मनात काहीही विचार आणतोस. हलक्या स्वरात शर्मिला बोलत होती.

' शर्मिला प्रेमाच्या अबोलात बोल असतात. सुख-दु:खाची कुठं तरी अंत:करणात चाहूल लागते. तो विधाता आहे ना फार स्वार्थी आहे. त्याला चांगल्याची आवड आहे. तो चांगल्या गोष्टी हिरावून घेत असतो. न जाणो पुन: मी—"

" असं अभद्र काय बोलतो—शर्मिला करड्या आवाजात उद्‌गारली.

डॉक्टर त्यांची पत्नी–भानू–शर्मिला टेबलाभोवती जेवायला बसली. गप्पांना ऊत आला होता. जेवणाचा मध्यंतर गाठण्याच्या बेतात होते. शर्मिलाचे जेवणात लक्ष लागेना. तिला गरगरल्यासारखे वाटायला लागले. अशक्तपणा जाणवू लागला. जेवण्याची गती थांबली.

' शर्मिला जेवत नाही बाळ. ' डॉक्टर उद्‌गारले.

आईने मायेचा हात कपाळाला लावला. अंग थोडसं तापलेलं होतं. जेवणं थांबवलीत. शर्मिला अंथरुणावर झोपली.

जेवणातल्या श्रीखंडाची गोडी अर्ध्यात सोडली. शर्मिला अंथरुणाला खिळली. दिवसामागून–दिवस रात्रीमागून रात्रो जावू लागल्या. शर्मिला असाध्य आजाराने आजारी पडली. नामांकित डॉक्टर आलेत उपचार झालेत शेवटी परमेश्वर हाच एक महान

वैद्य आहे. उपचारासाठी तो रोग्याला आपल्या दवाखान्यात नेतो.

भानूने कॉलेज बद केले. शर्मिलासाठी डॉक्टरकडेच राहू लागला. त्यांना दुसरं होत तरी कोण? भानूने रात्रंदिवस शर्मिलाची काळजी घेतली, सेवा केली. त्याचे आई–वडील रोज डॉक्टरकडे येत असत. पोरीची विचारपूस करीत असत. पाणावलेल्या डोळयांनी डोळा भरून पहात असत.

अेक भयानक रात्री शर्मिला कासावीस होत होती. कृश शरीर अंथरुणात खिळलं होतं. तोंडाला कोरड पडली होती. डोळे खोलवर गेले होते. चेहऱ्यावर थोड स्मित उमटलं होतं. गोड आठवणींच्या स्मृती पटलावरोल स्मृती आठवत होती.

'भानू ...... पाणी— !'

भानूने चमच्याने पाणी दिले. शर्मिलाच्या शेजारी तो बसला. केसावरुन हात फिरवला. पाण्याचे ओघळणारे गालावरील थेंब पुसले.

'भानू - !'

'बोल बोल शर्मिला - मी येथे बसलो आहे तुझ्याजवळ'

'भानू — किती सेवा केली. मी ..... जाते आहे आता. ह्या जन्मी अेकत्र जगता आले नाही ...... प्रेयसी म्हणून ...... पत्नी..... म्हणून माझ्या दैवात तुझ प्रेम नसलं तरी..... पुढील जन्मी..... जन्म ..... तुझ्या पोटी..... !

डोळे भिजले. गळा सुकला..... भानूने हंबरडा फोडला ..... 'डॉक्टर — शर्मिला.'

# बारावीचे वारकरी


राजेश काळे
प्रथम वर्ष विज्ञान (अे)


जय देवी जय देवी बारावी माता
लवकर लवकर घरी जाऊ दे आता ॥ धृ ॥

पेपर कोरा होता तरी न बोलवे काही
बोललो तरी तो हाकलून देई ॥
प्रतिउत्तर देता कंडक्टर येई ।
तीन वर्षाची विश्रांती देऊन जाई ॥१॥
जयदेवी — —

अभ्यास करताना थकले तनमन ।
कारण वर्षभर केली 'गनमन' ॥
विचारलं कोणी तर कारण टयुशन ।
सिनेमाला जाण्याची युक्ती पण छान ॥
पेपर कोरा देता शरमते मन
सोसावा कसा हा इतुका अपमान? ॥२॥
जयदेवी — —

माता–पितरांना होती फार आशा ।
केली पण त्यांची पूर्ण निराशा ॥
दाखविल्या त्यांना तळहातावरील रेषा ।
उलटल्या कुंडलीतील ग्रहांच्या दिशा ॥
आणिक त्यात कॉलेजचा तमाशा ।
समजत नव्हती म्हणे सरांची भाषा ॥३॥
जयदेवी — —

वर्षभर दिला इतरांना त्रास ।
कुणी म्हणे मूर्ख किंवा बदमाष ॥
ऑक्टोबरमध्ये मिळविन सुयश ।
आश्चर्याचा धक्का बसेल सर्वांस ॥४॥
जयदेवी — —



# आजचा युवक—


विजयकुमार हरी पाटील
द्वितीय वर्ष विज्ञान


"महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विद्यापीठ जाळुन टाकले !" "विद्यार्थ्यांनी प्राचार्यांना घेराव घातला." विद्यार्थ्यांनी एस. टी. गाड्या जाळून टाकल्या. "विद्यार्थ्यांनी पोलिसांना घायाळ केले, नेत्यांच्या गाड्या अडविल्या !"

आजच्या बहुतेक वर्तमानपत्रात एखाद्या तरी पानावर अशा स्वरुपाच्या बातम्या असतात. आज सर्वत्र या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबद्दल, युवकांबद्दल वाईट, प्रतिकूल बोलले जाते. सर्वांनाच त्यांच्याबद्दल तिरस्कार वाटतो. अशा मार्गाने जाणारे हे तरुण पाहिले की मन व्यथित व व्याकूळ होते देशाचे हे तरुण रक्त अशा प्रकारे देशाचा विध्वंस करीत असलेले पाहून भविष्यकाळातील भीषणता कल्पनेच्या टप्प्यात देखील येत नाही. आणि वाटते की "आजचे हे युवक देशाचा इतिहास घडविणार काय? या युवकांनी आता काय करायचे बाकी ठेवले आहे? त्यांना सर्व प्रकारची व्यसने लागलेली आहेत. दारू न पिणारा, सिगारेट न ओढणारा हा त्यांच्या दृष्टीने महामुर्ख ठरतो तसेच आज विद्यार्थ्यांबरोबर विद्यार्थिनी ही देखील कोणत्याही बाबतीत मागे नाहीत या व्यसनाधीन विद्यार्थ्यांमध्ये प्रामुख्याने श्रीमंत वर्ग पुढे असतो एक श्रीमंत विद्यार्थी दहा गरीब विद्यार्थ्यांना आपल्या बरोबर घेऊन स्वतःचा पथ निर्माण करतो.

आजच्या चित्रपटसृष्टीने विद्यार्थ्यांवर फार मोठा प्रभाव पाडलेला आहे. त्यामुळे त्यांची कल्पनाच बदललेली आहे. सिनेमातील नटनट्या स्वतःला कलावंत समजणारे कलेच्या नावाखाली सावळा गोंधळ घालतात. खरी कला कोणाला कळली यांचा पत्ताच नाही. ना भाषा, खेळ ना आचार ना विचार कशाचाच त्यांना अभिमान नाही, त्यांच्यात पाशवी वृत्ती वाढलेली आहे. आज काय पाहतो भानगडी–शिवाय गाव नाही। भानगडीशिवाय माणूस नाही, त्यामूळे त्याला कोणतेही गाव आपलेसे वाटत नाही. म्हणजेच देशाविषयी त्यांच्या मनात प्रेम नाही, कोणत्याही व्यक्तीवर विश्वास ठेवीत नाहीत. असे हे आजचे युवक. आजच्या भडक जाहिरातींनी त्यांच्यातील माणुसकी, परोपकारी बुद्धी, सत्यप्रियता गिळंकृत केली आहे. आजच्या साहित्यातून त्याला प्रेरणा मिळत नाही. आज त्याला राष्ट्रीय गीते आवडत नाहीत. राष्ट्रीय गीत "वंदे मातरम्" च्या केवळ उच्चारणामुळे अनेकांनी हौतात्म्य पत्करले. चंद्रशेखर आझादने 'वंदे मातरम्' ची घोषणा दिल्या कारणाने त्यांना कोर्टाने पंधरा फटक्याची शिक्षा दिली परंतु प्रत्येक फटक्यानिशी 'वंदे मातरम्' चा आवाज बुलंद केला. अशा अगणित राष्ट्रभक्तांनी जनतेच्या मनात राष्ट्रप्रेमाचा घणघणता अंगार पेटवला, परंतु आजचा युवक अशा गीतांबद्दल नाराजी व्यक्त करतो. सिनेमातील "लैला हो लैला" "तुमने कभी किसिसे प्यार किया," "रंभा हो रंभा" अशा प्रकारच्या अश्लील सिने संगीताच्या आहारी जातो. अशा प्रकारचे अभिमान नसलेले अंध युवक काय इतिहास घडविणार.

युवकांमधील बेशिस्त आज पराकोटीला पोहोचलेली आहे. त्यांच्यावर विश्वास ठेवणे धोक्याचे झाले आहे. बनारसच्या विद्यार्थ्यांनी ३५ लाखांचे बनारस विद्यापीठ जाळले. त्यांना कोणाबद्दल आदर नाही, कोणत्याही व्यक्तीवर, तत्त्वावर, ध्येयावर श्रद्धा नाही. देव धर्म या गोष्टी त्यांना तर माहीत नाही. चारित्र्य,

आत्मविश्वास, ध्येयवाद, आज्ञाधारकपणा ह्या गोष्टी त्यांच्या शब्दकोशात तर वसतच नाहीत हा सर्व त्यांना वेडपटपणा वाटतो.

हे तरुण असे का वागतात. हे पूर्णत: दोषी आहेत काय ? नाही. आज देशात युवकांना योग्य मार्गदर्शन करतील अशा नेत्यांचाच अभाव आहे. आजचे नेतेच लक्षावधी पैसे खातात आणि इतर लोक त्यांची स्तुती करतात मग या युवकांनी कोणाचा आदर्श पुढे ठेवावा. बहिष्कार घालणे, हरताळ पाळणे, संप, मोर्चा या गोष्टी आजच्या नेत्यांनीच शिकविल्या. युवा शक्तीच्या जोरावर या नेत्यांनी आपली प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न केला. आज हेच नेते व्यासपीठावरून विद्यार्थ्यांची नालस्ती करतात. आई-वडील ही युवकांवर आज पुरेसे लक्ष देऊ शकत नाहीत. शाळा महाविद्यालयांना बाजारी स्वरूप आले आहे. म्हणून की काय आजचा विद्यार्थी "युवक वादळात" सापडलेल्या "फुटक्या जहाजा" सारखा भटकत चालला आहे. त्याला मार्गदर्शन करणारा दीपस्तंभच आज विझला आहे. युवक हे संस्कारक्षम असतात. त्यांचेवर जसे संस्कार होतील तसे ते घडत असतात. आज सर्वत्र भीषण अंधःकार पसरलेला आहे, म्हणून निराश होण्याचे कारण नाही. जनतेच्या हृदयात खऱ्या राष्ट्रप्रेमाची ज्योत तेवत राहावी, दुष्काळ पीडितांची सेवा करणारे, युद्धकाळात रक्तदान करणारे कित्येक युवक आजही आपल्या देशात आहेत. अशा युवकांची संख्या कमी असेल परंतु ते दृढनिश्चयी आहेत. नेतृत्वाचे गुण ते संपादन करीत आहेत. असे हे युवक योग्य क्षणाची वाट पहात आहेत. त्यांच्यावर फुंकर घालणारा कोणीतरी निर्माण व्हावा लागतो आणि मग ते अत्यंत प्रज्वलित होतील. असे हे उत्साही ज्वलंत दृढनिश्चयी युवक पुढे येतील व प्राणाची पर्वा न करता एक महान इतिहास घडवून दाखवतील.

खुदीराम बोस सारख्या केवळ १८ वर्षाच्या युवकाने ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्यासाठी बॉंबफेक करण्यास मागेपुढे पाहिले नाही. आणि हसत हसत वधस्तंभ कवटाळला. अनेक भारत वीर युवकांनी आपल्या बलिदानाने स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा केला. अशा प्रकारे भारताचा इतिहास अनेक युवकांनीच व युवतींनी घडविला आहे. भारताची परंपराच एवढी महान आहे की ज्या ज्या वेळी सर्वत्र अत्याचार, अधर्म माजला त्या त्या वेळी प्रत्यक्ष भगवंताने जन्म घेऊन जनतेला मार्गदर्शन केले.

वेष बदलला, फॅशन बदलल्या तरी तेच सळसळते रक्त पुन्हा एकदा आपल्या कर्तृत्वाची प्रचिती देईल आणि मानवतेची हाक येताच हीच युवाशक्ती दैदिप्यमान इतिहास घडवून दाखविल.

## सूर्यास्त

भांगरे गिरीष शिवाजी
१२ वी शास्त्र, (आय)

एके संध्याकाळी फिरावयास गेलो,
गावा बाहेरच्या टेकडीच्या माथ्यावर ।
समोर बघितले तर काय दिसले,
जमिन अस्मान चे अनोखे मिलन ॥
मला कोणीतरी बोलवीत होते,
जोर जोरात हाका मारीत होते ।
विस्तीर्ण, भव्य अशा पसरलेल्या,
भयानक क्षितिजा पलीकडून ॥
मी नीट बघितले तेव्हा समजले,
तापून – तापून लाल झालेला सूर्य ।
क्षितीजा पलिकडच्या भव्य विश्वात,
कोणाकडून तरी ओढला जात होता ॥
जगण्याचा केवीलवाणा प्रयत्न तो,
माझे कडून बघवत नव्हता ।
पूर्णपणे डोहात बुडाल्यावर,
सप्तरंगी हातांनी रामराम करीत होता ॥
एकदम अश्रू डोळ्यात साचले,
डोक्यात विचारांचे काहूर माजले ।
जगण्यासाठी धडपडत असलेल्या,
प्रत्येक वस्तूचा अंत ठरलेला आहे ॥

# अगतिक



मिलिन्द म. कुळकर्णी
द्वितीय वर्ष विज्ञान

समीर भागवतांचा हृय काव्यसंग्रह. काव्यक्षेत्रात तळपत असलेला सूर्य या काव्यसंग्रहामुळे रसिकमनावर अधिक तेजस्वी झाला. मराठी सारस्वताचे यंत्रयुगाशी नाते जोडणार ! अप्रतिम काव्यसंग्रह वैज्ञानिक दृष्टीकोण आणि निसर्गप्रणीत विचारांनी ओथंबलेल्या काव्यसंग्रहामुळे मराठी माणसाच्या मनात समीर भागवतांनी अटळ स्थान मिळवलं टिकाकारांनी 'मृगेश'ची चांगलीच दखल घेतली ! त्याबरोबरच प्रकाशन समारंभाचे छायाचित्रही झाले होते. समीरच्या शेजारी माझेही फोटो आले होते.

"दै. पहाट'मध्ये काही आलेला दिसत नाही फोटो, पण समीर तर म्हणाला होता........अय्या खरंच आलाय. कित्ती शेवटी दिला फोटो, नाहीतरी हे पेपरवाले कवींना कमीच किंमत देतात. जाऊंदे मेलं. सांस्कृतिक मंच्याच्या शेजारी माझा फोटो ! इश्श ! कित्ती कित्ती समाधान दिसतंय समीरच्या चेहऱ्यावर. पहिलटकरीण बाईप्रमाणंच असतं साहित्यिक मंडळींचं. बाळंतपण सुखरूप झाल्यासारखंच समाधान पुस्तक प्रकाशित झाल्यावर वाटतं या मंडळींना.

आज तर समीर फार खुष. त्याच्या काव्यसंग्रहाला बरीच प्रसिद्धी प्राप्त झाली. आज नाटकाला जायचं म्हणतोय. कोणते लागलेयू नाटक. अं अं रविंद्रमध्ये... काही खास दिसत नाहीय. समीरला जे आवडेल त्याच नाटकाला जाऊया.

"संदिप समेळांचं अपघाती निधन, oh God !"

निशाचा हात कापावयास लागला, उर धडधडत होते सिलिंग फॅन अधिक वेगाने फिरतोय की काय असं वाटायलं लागलं. या अशाच वेगानं फिरवा फिरतो तो कोसळेन 'कोसळायला'च हवा. अती आनंदानंतर परमेश्वर त्याला तेवढंच दुःख देतो की काय ? का परमेश्वराला मनुष्यप्राणी हा आनंदी पहावयाचा नाही. मनुष्याचा आनंद परमेश्वराच्या डोळ्यात खुपू लागतो की काय ?

संदीप..... संदीप . एक साधाभोळा सात्विक, सश्शील, स्वप्नाळू, निसर्गकवी. खरं तर निसर्गकवी ही उपाधी त्याला आवडतच नसे. माझ्या घराशेजारीच रहात होता तो. एका कोंदट खोलीत. मावशीची म्हणे इस्टेट फार पण ह्याला तेथे राहणे जमत नाही. हा घरी कधी सापडतच नाही. कायम भटकणारा.

त्याचे ते कुरळे केस, स्वप्नील निळे डोळे. त्याच्या निळ्याशार गर्दगहिऱ्या डोळ्यांतच सारं काव्य ठासून भरलेलं. गोरा गोरा गच्च अन् ती तपकिरी तांबूस दाढी, कायम हास्य असायचं त्याच्या चेहऱ्यावर अन् ते हास्य दाढीत लुप्त होते की काय असे वाटे. तो गंभीर झाला की गोड गैरसमज व्हायचा. पहाता पहाता कल्पना विश्वात रममाण होणारा संदीप केव्हाच घेऊन गेला होता उडवूनी मन माझं.

तो बोलायला लागला की समोरचा श्रोता त्याच्या बोलण्यात रममाण व्हायचा. अगदी जगाच्या रहाटगाडग्याविरुद्ध. एक विक्षिप्तच. तो म्हणायचा.... तो म्हणायचा "निशा निशा .. ह्या जगाला झालंय तरी काय ग ? निव्वळ भांडत असतात. नाहीतर निव्वळ घरात बसून असतात, घरकोंबड्याप्रमाणे. हे एवढं निसर्ग परमेश्वराने कोणाकरता

निर्माण केलंय्. मनसोक्त हिंडावं ह्या निसर्गात. मन अगदी स्वच्छ, प्रसन्न, निर्मळ होतं. हे मेणचट जग क्षणात विसरून जाऊ शकतो आपण. ते क्षितीजाशी दिर्घचुंबन घेणारे कडे आणि नजर त्यांच्याबरोबर पोहचू शकत नाही तो निळा दर्या. कित्ती कित्ती बघावं ह्या डोळ्यानं. ती गवताची काडी बघ, किती ताठ्यानं उभी आहे. किती डौलानं बाऱ्या-बरोबर डुलतंय त्याला माहीत आहे एक दिवस कोणाच्यातरी पायाखाली आपण तुडवले जाणार त्याचं दुःखं नाही ह्याला. हा आपल्याच विश्वात रममाण माणसाला जीवन कसं जगावं हे शिकवतंय तृण. मात्र निसर्गात हिंडावं लागते मनसोक्त हिंडावे. ते गोंडस फूल बघ, किती किती रंग उधळलेत निसर्गाने अन् हा मनुष्यप्राणी चार भितीच्या आत स्वतःला जखडून घेतोय."

हे त्याचे बोल ऐकताना देहभान बिसरून तल्लीन व्हायची मी. बाबा म्हणायचे संदिपवेडी झालीय निशा. आमच्या वर्गातला हुशार मुलगा समीर भागवत. त्याचा अगदी जीवलग मित्र. तोसुद्धा त्याच्या खोलीवर असायचा. तो आपला अभ्यास करण्यात मग्न अन् हा चार भितीत बसलेला पण मन फिरतंय सैरावैरा.

अन् तो दिवस, त्या दिवशी मी संदिपच्या खोली-वर आली. संदीप गेला होता भटकायला निसर्गात. समीर आपल्या कवीता वाचत होता, मी आल्याने त्याची तंद्री भंगली.

"कोण निशा, संदीप बाहेर गेलाय."

"अच्छा, तर मी जाते."

"म्हणजे माझा तसा उद्देश नव्हता मी फक्त म्हटलं संदिप नाहीये म्हणून..... बस ना..बस."

"नाही, मला आज काम आहे."

"प्लीज निशा, निशा आज माझी कविता ऐक."

"अरे व्वा तू सुद्धा कविता करतोस, संदीपच्या संग-तीत तुलासुद्धा छंद जडलाय वाटतं."

"नाही निशा, माझं काव्यक्षेत्र निराळं आहे. मी अन्यायाला वाचा फोडणारं काव्य प्रसुत केलंय. संदिपसारखी प्रतिभाशक्ती नाही माझ्याजवळ, पण जे काही आहे ते माझे माझ्या कुबतीनुसार मी काव्य करतो."

त्याने कविता वाचून दाखवली.

संदिपप्रमाणे निसर्ग कविता नव्हती तो. नवीनच क्षेत्र असावं. खरं तर मला त्या कवितेतलं काही काही कळलं नव्हतं, त्यातले शब्द अति जहाल, अवजड, गूढ होते. संदिपच्या कवितेसारखे तरळ, प्रणयरम्य शब्द नव्हते, पण त्याला मी नाराज केलं नाही.

कवी ही अशी चीज असते की एक तुच्छतादर्शक शब्द जरी त्यांच्या कवितेविषयी तुम्ही वापरलात तरी त्यांचे काव्यबीज तेथेच करपून जाते. नैराश्येच्या उष्णतेने, पण एक गौरवात्मक शब्द वापरला सहानु-भूतीने, तर त्या बीजाचे वृक्षात रुपांतर व्हायला वेळ नाही लागायचा !

संदीप अन् समीरचे अधूनमधून वाद झडायचे. दोघे अगदी हमरीतुमरीवर यायचे पण शेवटी संदीपच माघार घ्यायचा समीरला तो आपला विजय वाटायचा.

समीरने एके दिवशी मला कॉलेजमध्ये गाठलं. "निशा..... निशा... एक सांगायचं होतं, राग नाही ना येणार ?"

"छे, राग कसला."

"निशा......निशा ....आय ..आय लव्ह यू.. आय लाईक यू."

— — — —

मी सायंकाळी संदीपला त्याच्या खोलीवर गाठलं.

"संदीप मला काही सांगायचंय तुला!" मी तोऱ्यात म्हटलं.

"तुला अन् मला काही सांगायचंय." संदीपने हसणेवारीने अंबेरीचा प्रयत्न.

"संदीप गांभीर्याने घे प्लीज."

"ओके."

मी सकाळी घडलेली घटना संदीपला निस्संकोच सांगितली.

"अभिनंदन,... अभिनंदन निशा."

"संदीप चेष्टा करू नकोस. तुला माहितेय माझं तुझ्यावर किती प्रेम आहे. का छळतोयस आता. बाबासुद्धा तयार आहेत आपल्या लग्नाला. संदीप तूच सांग आता समीरला हे सगळं."

"सॉरी निशा, हे मी त्याला सांगू शकत नाही."

"विरहीणी पृथ्वीवरील न्यायाच्या गोष्टी करणारा तूच, शकुंतलेला न्याय मिळविण्याच्या गोष्टी तूच कवितेत करतोस. दुष्यंताची वेळ तुझ्यावर आली तर का मागे हटतोस. का धैर्य कोठे गेले तुझे, अर्जुनाच्या तोडीचे तुझ्यात अन् दुष्यंतात मग काय तो फरक. कल्पना कर त्या विरहीणी पृथ्वीची, सूर्याच्या मिल-नाची वाट बघणारी ती प्रियतमा त्याच्या मागे मागे किती दिवस झाले फिरतेय, माझ्यात तुला पृथ्वी दिसत नाही, शकुंतला दिसत नाही ?"

"निशा, व्यवहारात काव्य निकृष्ट ठरतं, काव्य कल्पना विश्वात फुलतं, व्यवहारात कोमेजून जातं. आपला विवाह हा अशक्य कोटीतली गोष्ट आहे. तुला समीरच सर्व ते सुख देऊ शकेल. त्याला व्यवहार येतो तुझे रक्षण करण्याची धमक, अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची ताकद त्याच्यात आहे."

तुला माहीत आहे माझं जीणं, चार भितीच्या आड जीणं मला पसंत नाही, आणि तुझ्या प्रेमाची कदर मी केली तर मला पिंजऱ्यात अडकलेल्या पोपटाप्रमाणे दिवस जगावे लागतील. निशा तू दुसरं काही सांग पण माझ्यावर हे लादू नकोस. पोपट हा निसर्गातच आपल्या स्वबळावर आपलं विश्व निर्माण करू शकतो, पण जर त्याला पिंजऱ्यात अडकवले तर तो दुसऱ्यावर अवलंबून असतो.


## बी.के.इलेक्ट्रॉनिक्स

आमचेकडे :-

सुप्रसिद्ध एअर टाईट स्पिकर बॉक्सेस तसेच

**T. V. 20" 24"**

आणि इलेक्ट्रॉनिक्स अॅटम.

**१६०, भवानी पेठ, जळगांव**

जळगांव जिल्ह्यातले मार्लेक्स कुकरचे डिलर
व महाराजा मिक्सर, स्टेनलेसस्टील भांडी
व प्रेझेंटेशन आर्टिकल योग्य दराने
विक्रीचे एकमेव ठिकाण–



## दोशी ज्वेलर्स

**सराफ बाजार, जळगांव**

" समीर हुशार आहे. तो त्याच्या स्वकर्तृत्वावर नोकरी मिळवू शकतो चांगला पगार मिळेल अन आपल्या राणीला तो सुखात ठेवेल. विशा तू माझा नाद सोड अन समीरची हो. प्लीज त्याचं मन मोडू नकोस. "

" संदिप, प्रेम ही वस्तु आहे ? तुला नीट वसत नांही म्हणून दुसऱ्याच्या डोक्यावर नेवून ठेवायची ?"

" नाही. ... नाही निशा मी तुला सुखी ठेवू शकणार नाही. पुढे माझं काव्य हे चार भिंतीत फुलणार नाही. मला निसर्गाचं एक दिवस जरी दर्शन घडलं नाही तर तडकडून फडफडून मरेन मी. एखाद्या रोपट्यासारखा करपून खाक होईन. "

" हे सर्व मी पाहिलेलं आहे. अनुभवलंय माझ्या पप्पांच्या बाबतीत. मी स्वतःच्या हातानं माझा ' पोपट ' बनवून घेणार नाही. क्षमा कर निशा मला क्षमा कर. "

निशा.........ए निशा, अग काय विचार करतेस का दुसऱ्या काव्यसंग्रहाचे उद्घाटन प्रकाशन सोहळ्याचे दिवसाढवळचा स्वप्न बघतेस "

" कोणत्या नाटकाला जायचे. रविंद्रमध्ये काही खास नाहीय्. बालगंधर्वला ' पुण्यप्रभाव ' आहे, चालेल ? अग पण तू बोलत का नाहीस. "

मी काहीही न बोलता समीरच्या पुढे ' दै. पहाट'चे संदीपच्या निधनाचे पान दिले.


मंदाकिनी : अगं श्रीदेवी कोठे गं निघालीस ?
श्रीदेवी : तुला माहित नाही कां ? राधाचं लग्न ठरलंय् ना, म्हणून लग्नाचं सामान घ्यायला निघाले !
मंदाकिनी : कुठच्या दुकानावर जाणार गं ?
श्रीदेवी : माझं एकमात्र खात्रीनें निवडलेलं आवडीचं दुकान म्हणजे–

वैशाली स्टोअर्स
सौंदर्य प्रसाधने, होजिअरी–कटलरी
गिफ्ट हाऊस
प्रेझेंटेशन आर्टिकल्स, ॲरिस्टो क्रॉट, सफारी, व एस्कोर स्पेशालिस्ट.
फोन–५५२९
१८२, नवी पेठ,
नटवर टॉकीजजवळ, जळगांव.

शृंगार
१०३, फुले मार्केट,
जळगांव
साड्या,
सुटींग, शर्टींग,
ड्रेस मटेरियल्स,
पंजाबी सूट
आणि
मॅचिंग ब्लाऊज
पिसेससाठी
अवश्य भेट द्या !




# यशवंताची काव्यसृष्टी


## कु. प्रतिभा भडंग आडगांवकर
M. A. सिनियर


कलावंताच्या कलासृष्टीत एकदा पाऊल टाकले की त्या कलावंताची एक अस्मिता रसिकांच्या डोळ्यासमोर उभी राहते. तसे कविवर्य यशवंतांच्या काव्यसृष्टीत पाऊल टाकले की महाराष्ट्रातील एक ख्यातनाम, ज्येष्ठ, श्रेष्ठ कवि म्हणून महाराष्ट्रीय रसिकांच्या मनात निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच ' रवीकिरण मंडळाचा अखेरचा तारा निखळला ' म्हणून सारा महाराष्ट्र हळहळला.

ज्या माणसाच्या अंतःकरणात मन किंवा हृदय मग ती कठोर असो वा कोमल असो .... ...

आई ऽऽ म्हणोऽनी कोऽणी ।
आईस हाक मारीऽ .... "

ह्या त्यांच्या ' आई ' ह्या कवितेत हृदय हेलावून सोडण्याचे सामर्थ्य आहे.

' नोहेच हाक माते मारी कुणी कुठारी ऽ '
यशवंताना काळाने मारलेली हाक त्यांच्या रसिकांना त्यांच्या शब्दांचे सामर्थ्य आठवून मारलेल्या कुठारी सारखिच आघात करणारी भासली. निदान मराठी माणसांच्या मनावर त्यांचे अस्तित्व गमावल्याचा आघात झाला ह्यात शंकाच नाही

यशवंतांची ' आई ' सारखी स्फुट काव्ये बरीच गाजली. स्फुट कविता लेखनाबरोबरच खंडकाव्याची निर्मितीही यशवंतांनी केली. १९३१ ते १९४९ वर्षाच्या अवघ्या अठरा वर्षाच्या कालावधीत त्यांची ' जयमंगला ' ' बंदिशाळा ' व ' काव्यकिरिट ' ही तीन खंडकाव्ये प्रसिद्ध झालीत. वृत्तीतील स्वयंकेंदितत्त्व व आशयातील सामान्यत्त्व ही दोन ठळक वैशिष्ठे यशवंताच्या कवितेत उत्तम प्रकारे जाणवतात. त्याची कविता बहुतांशी आत्मपर आहे.

' जयमंगला ' हे यशवंताचे पहिले खंडकाव्य. या खंडकाव्यात राजकन्या व कवि असलेला तिचा एक शिक्षक यांच्या सफल प्रितीची कथा रंगविलेली आहे. सुरवातीला या दोघांच्या प्रेमाला राजाची मान्यता नसते, विरोध असतो. तो त्या कवीला कैद करुन त्याला देहांताची शिक्षा फर्मावतो. पण ती अंमलात येण्याच्या वेळी राजकन्या त्याची मुक्तता करते. त्याआधी अर्थातच राजकन्या आपल्या प्रेमाला राजाची मान्यता मिळवते. नायकाच्या माध्यमातून २२ भावगीतातून ही एक कथा गुंफलेली आहे. यशवंतांचे खरे चातुर्य जुन्याच रुढ कल्पनांची परिणामकारक योजना करण्यातच मुख्यतः दिसते. कवीचे विशेष कौशल्य हे की ह्या काव्यातील प्रत्येक भावगीत स्वतंत्र रितीने पूर्ण असूनही खंडकाव्यातील कथानकाचा दुवा म्हणूनही ते राहिले आहे. आधुनिक मराठीतील एक कलापूर्ण आणि सरस प्रेमकाव्य म्हणून हे खंडकाव्य निर्विवाद गौरविण्यासारखे आहे.

यशवंतांनी ' बंदिशाळा ' दुसरे आणि ' काव्यकिरीट ' हे तिसरे खंडकाव्य लिहिले. हे वास्तवदर्शी काव्य आहे. या खंडकाव्याच्या निर्मितीचे, प्रकाशनाचे ७१ च्या ललीत मासिकात मोठे रसाळ वर्णन कवीवर्य यशवंत यांनी जयवंत दळवी यांना दिलेल्या मुलाख-

तीत केले आहे. ह्याच मुलाखतीत यशवंतांच्या कवि मनाची सहजपणे आपल्याला जाणिव होते. ह्या मुलाखतीत त्यांची दोन वाक्य मोठी मार्मिक वाटतात. अन् त्यांचे काव्या विषयीचे मत प्रकर्षाने व स्पष्टपणे जाणवते " शब्दांना ध्वनींचं, रसांचं वजन असतं ते वजन पोहचवण्यापुरता आम्ही गेयतेचा आधार घेतला. भावगीत गायक गेयतेवर भर देऊन शब्द मारतात.

कवितेच्या दुर्बोधतेवर बोलतांना ते मोठ्या खेळी-मेळीच्या वातावरणात म्हणतात, " मर्ढेकर मला दुर्बोध वाटत नाहीत तसेच दुर्बोधतेवर बोलतांना " तुकाराम सुद्धा काही ठिकाणी दुर्बोध आहे " असे हे नवकाव्याचे कैवारी म्हणतात. पण तुकारामाची दुर्बोधता अपवादात्मकच आहे. आमजनता डोक्यावर घेते तो जनरल तुकाराम; अपवादात्मक तुकाराम नव्हे " ह्या यशवंतांच्या भाष्यात थोडीशी विनोदाची छटा असली तरी यशवतांच्या भाषासरणीतही अर्थ-सुलभता असून, संस्कृत शब्दांच्या मर्यादित उपयोगा-मुळे तिच्यात एक प्रौढताही आलेली दिसून येते, व प्रसंगी ओजस्विताही प्रतीत होते.

यशवंतांची प्रतिमा कमालीची आत्मपर आहे. ही आत्मपरता एक प्रकारच्या विषण्णतेने ग्रासलेली आहे सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव हे यशवंतांच्या वृत्तीतील विषण्णतेचे कारण आहे असे ग. त्र्यं. माडखोलकर म्हणतात. त्याच्या 'रत्नाकर' व 'यशोधन' ह्या काव्यात ह्याची जाणिव होते. ह्याच कारणामुळे त्यांच्या 'आई' ह्या कवितेसारख्या इतर स्फूट कविता जोरकस व परिणामकारक भावविष्करण करणाऱ्या वाटत नाहीत. पतग सारख्या कवितेत तर - - - - -

थरथरे दिपिकेपरी।
गिरगिरे नर्तिकेपरी।
की वारुवरुन वायुच्या
बघे हा स्वार शिलगण करु।
हा पतंग की पाखरु।
म्हणे मज आभाळी चल फिरु।

ह्या ओळीत भावनांच्या उत्कटतेपेक्षा कृत्रिम कल्पनाविलासच अधिक जाणवतो. पण 'आई' या कवितेतल्या – – – –

" स्वामी तिन्ही जगाचा
आई विना भिकारी"

ह्या ओळी चटकन् मनावर ठसा उमटवतात. हृदय हेलावण्याचे, पिळवटून टाकण्याचे सामर्थ्य त्यांच्या विषण्ण भावाविष्कारात साकारलेल्या भावकाव्यात जेवढे आहें. तेवढा प्रभाव 'पतंग' सारख्या काव्याचा पडत नाही.

जगाची " सारी तऱ्हा उफराटी ! " अशी त्यांना जगाच्या व्यवहारांची प्रचीती आली आहे. यशवंतांच्या काव्यसृष्टीचा विचार करतांना त्यांच्या इतर वाङ्मय-याचाही विचार करणे अपरिहार्यच आहे. कारण तेही काव्यात्मकच आहे. त्यादृष्टीने 'रामदास एक अभ्यास' खरोखरच एक लक्षणीय ग्रंथ आहे एका थोर कविने एका महान संत कवींचा केलेला अभ्यास असाच ह्या ग्रंथाचा उल्लेख आवर्जून करावासा वाटतो.

मासिक मनोरंजन व नवयुग ही त्यावेळची श्रेष्ठ ललित मासिके होती. नवयुगात 'तारकानाथ' ह्या नावाने यशवंतांची एक कविता प्रसिध्द झाली. ह्या-वेळी यशवंत 'दासानुदास' ह्या नावाने कविता छापत ह्या घेतलेल्या टोपण नावाबद्दल 'साधुदास' ह्या त्यांच्या शिक्षकांच्या नावाचा व रामदासांचा प्रभाव असे कारण ते आपल्या मुलाखतीत सांगतात.

सातारा जिल्ह्यातले चाफळ ही यशवंतांची जन्म-भूमी. त्यामुळे बाल वयात एकीकडून रामदासांचे व दुसरीकडून लोकमान्यांचे खड बोल त्यांच्या कानांवर सतत पडत राहिले असावेत, त्यामळे तेजस्वी ऐति-हासिक कविता लिहिण्याची इच्छा यशवंतांच्या मनात निर्माण होणे साहजिकच आहे.

'स्वातंत्र्यलक्ष्मीस मुजरा' ह्या कवितेत ..
...." इथे संचारतें वारें, थरारे स्पर्शाने अंग,
अहाहा ! जाहली वृत्ती समाधीमाजि गुंग!"

ह्या ओळी येतात, त्यात केवळ विनयच नाही; तर औचित्यपूर्ण असा जन्मभूमीविषयीचा अभिमानही आहे म्हणूनच ते म्हणतात..

" यशाचा कौल मानोनी मुदे सोडीन दर्बारा
मराठ्यांच्या महालक्ष्मी, तुला घे शाहिरी
मुजरा. "

'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य त्यांनी लिहिले आहे.

ऐतिहासिक थाटाच्या कवितांनी लोकप्रियता मिळविली असूनही यशवंत त्याप्रकारचेच काव्य करीत राहिले नाहीत. याचे कारण भावगीताला अत्यंत अनुकूल असलेली त्यांच्या मनाची घडण हेच होय

जीवन सुखांतिका नाही हे ते स्पष्टपणाने सांगतात आणि वारंवार सांगतात पण जीवनातल्या या दुःखाला दैवापेक्षा माणूसच अधिक जबाबदार आहे, असे त्यांना वाटते. म्हणूनच 'जग-रहाटी' मध्ये ते म्हणून जातात - – – -

फुकटचा शब्द गोड
बोलला न कोणी धड
उठविली निंदा झोड
श्मशान हे निनादते आता स्तुनी पाठी.

जगात वास्तवाचं केवढं हे सत्य दर्शन यशवंतांनी घडविले आहे ?

श्रेष्ठ भावकवीला आवश्यक असणारे बहुतेक गुण यशवंतांच्या कवितेत आहेत. त्याच्या काव्यात जीवंत भावना आहेत त्यांचे काव्य नकली काव्य नाही.

'अन्य नको वरदान' ह्या कवितेत -

प्रभो, मज अन्य नको वरदान
कोणी अवती भवती माझ्या
जमले किंवा जमवियले ज्या
पुरवायाते त्यांच्या गरजा
द्या सामर्थ्य निदान
प्रभो मज अन्य नको वरदान.

त्यांच्या काव्यातले चित्रणही जितके अकृत्रिम तितकेच स्पष्ट व हृदयस्पर्शी आहे.

'तुझ्या विना न कोणी। लावील सांजवाती"
सांगेल ना म्हणाया। आम्हा 'शुभं करोती ।।

'आई' तील ह्या ओळी वाचून कोणता सहृदय रसिक आवंढा गिळणार नाही ?

दैनंदिन जीवनातील आणि संभाषणातील भाषा काव्यात योजूनही त्याचे सौन्दर्य कमी होऊ न देणारी, कोमलतेपासून कठोरतेपर्यंत, कोणत्याही प्रकारच्या कृत्रिमतेला थारा न देणारी कविता-आधुनिक कवि-तात क्वचितच आढळते.

तीव्र निराशा हे 'जग - रहाटी'चे अधिष्ठान असले तरी 'नसे जग सर्वस्वी अनुदार' ह्या कवितेतल्या

तरी चरफडसी कुढसी कां रे
वल्लव नौका धीरे धीरें
तुफान लाटा देतील वाटा
" तुजला व्हाया पार ।। नसे जग सर्वस्वी अनुदार"

ह्या ओळीही त्यांच्या आशावादाची साक्षच आहेत.

स्वातंत्र्याच्या कार्याकरिता स्वतःच्या 'देहाचा पूल' करणाऱ्या चार मावळ्यांचा त्यांनी भरल्या हृदयाने गुणगौरव केला आहे. राष्ट्रीय कवितांच्या रुपाने ही यशवंतांची सुरुवातीचीच कविता आहे.

प्रेम, निराशा, समाजातील अन्याय, रुढींचा जुलुम, सामाजिक सुधारणांचे विचार ह्या सगळ्याच विषयांना यशवंतांच्या कवितेत स्थान मिळाले आहे. त्यांचे 'न्याहरीचे गाणे' हे ग्रामजीवन गीत विशेष प्रसिद्ध पावले आहे यशवंतांनी बाळगाणीही केली आहेत. ती 'मोतीबाग' नावाच्या पुस्तकात संग्रहित केली आहेत.

यशवंतांनी खंडकाव्य निर्मिती केलेली असली तरी प्रकृतीने ते मुख्यतः आत्मलक्षी होते. आधुनिक कवीमंडळात त्यांना जे स्थान आहे ते, या प्रकृतीशी एकनिष्ठ राहून त्यांनी जे जिव्हाळ्याचे आणि उत्कट

भावगीतलेखन केलेले आहे त्यावरच आधारलेले आहे. त्यांची काव्यसृष्टी रसिकांसमोर त्यांच्या विषयी एक जिव्हाळयाची अन् विषयाच्या बाबतीत सर्वस्पर्शी अशा भावकवीची अस्मिता उभी करते. अन् ह्याबरोबर ‘ पाणपोई ’ या कवितेतील त्यांच्या या ओळी सार्थ वाटतात–

“ येई भाई येथ पाही घातली ही पाणपोई,
धर्म-जाती कोणती ती भेद ऐसा येथ नाही,
संसृतीचा हा उन्हाळा, तल्खली होई जिवाची
स्वेदबिन्दू अश्रुधारा याविना पाणीच नाहीं
पावतां तृप्ती मना, संचारता अंगी उमेदी
जो दुवा देशील पान्था तेवढी माझी कमाई।



आमच्या ग्राहकांना हे नवीन वर्ष सुखाचे जावो

**श्री गुरुदत्त फ्रूट कंपनी**

**केळीचे व्यापारी**

राधा मॅन्शन, जिल्हा पेठ, (आठवडे बाजार)
शिवाजी रोड, जळगांव

फोन – घर : ३९४३
दुकान : ४८२१

प्रोप्रा. श्री. शांताराम भगवंत गोरडे

# रक्तपिपासा !

कु. कल्पना कोसोदे
१२ वी कला

रक्तपिपासा कशी वाढली,
हुंडेवाल्या नराधमांची !

का अबला या अबोल असती,
श्वापदामुखी माना देती ?

का न तोडिती पाश रुढींचे,
जाती, धर्म, अन् अन्यायाचे !

रुतुनि बसती लब्ध प्रतिष्ठी
सत्ता अन् संपत्तीच्या

देऊनि हुंडा आपणास का,
विकीतो त्या अधमाला ?

माणुसकीला अन् कर्तृत्वा
का न अर्पिती वरमाला ?

का न शोधिती समतेचे अन्
न्यायाचे ते विश्व नवे ?

उपेक्षुनि त्या धनवंताला –
ज्याचे आहे उलटे काळीज ;

का न शोधिती गुणवंताला
हृदयाच्या ‘ त्या ’ संपत्तीला ?

खंत वाटते हीच मनाला,
होईल कधी ‘ भारती ’ प्रबला ?



# अशीच एक रात्र येते

कु. कल्पना कोसोदे
१२ वी, कला

रात्रीची वेळ होती. फलाटाची दोन्ही टोकं अंधारात पार बुडून गेली होती. शेवटची गाडी केव्हाच निघून गेली होती. जांभया देणारा पोर्टर आणि पेंगुळलेला स्टेशन मास्तर सोडून स्टेशनवर कोणीही नव्हत नंतरची गाडी तीन-चार तासांनी येणार होती. म्हणून दोघेही जण एखादी डुलकी काढण्याच्या तयारीत होते. इतक्यात कुणाच्या तरी पावलांचा आवाज ऐकू येऊ लागला. भास झाला असेल असं म्हणून ते झोपी जाण्याच्या विचारातच होते. पोर्टर तर केंव्हाच आडवा झाला होता. पण तो आवाज जवळ जवळ येऊ लागला. तरीही पोर्टरने कूस बदलली आणि तो घोरायला लागला. पण स्टेशन मास्तरची मात्र झोप उडाली. तो केबिनच्या बाहेर आला. अंधारातून एक व्यक्ती त्याच्या दिशेनंच यत होती. जवळ आल्यावर त्या प्रवाशाचा अटबाजपणा स्टेशन मास्तरला जाणवला. त्याच्या एकंदर रुबाबावरुन तो सेल्समन किंवा मॅनेजर असावा असा स्टेशन मास्तरने तर्क केला.

“ माफ करा, इथे कुठं वेटिंग रुम नाही का ? ”

“ नाही ” पेंगुळलेल्या स्वरात स्टेशन मास्तर म्हणाला.

त्याचा चेहरा पार उतरुन गेला. त्याने घड्याळात पहात म्हटले - “ आपण रात्रभर इथेच आहात का ?”

स्टेशन मास्तरनं जरा घुश्शातच ‘ हो ’ म्हटल.

त्याचा चेहरा उजळला. “ माझ --- छोटसं काम होत, ही... माझी ब्रीफकेस तुमच्याकडे ठेवता का ? मला सकाळच्या गाडीने जायचय. तो पर्यंत मी ही कुठे कुठे वागवू बरोबर ? “ प्लीज. ”

स्टेशन मास्तरने कंटाळून होकार दिला प्रवाशाने हसून ब्रीफकेस पुढे केली. असतील ह्यात त्याचे कपडे बिपडे असं म्हणून स्टेशन मास्तरनेही सहजच ती घ्यायला हात पुढे केला. पण तो हातात घेतल्यावर मात्र तो चांगलाच चमकला कारण ती खूप जड होती.

“ जरा जपून ठेवा हं ” तो म्हणाला त्याच्या सुरात काळजी होती.

स्टेशन मास्तरने मान हलवली आणि तो आत आला. ती ब्रीफकेस टेबलावर ठेवतांना त्याच्या मनात काहुर उठले. काय असावं बरं यात ? तशी जड आहे बरीच. पण खरंच जड आहे की अर्धवट झोपेत आपल्याला भास झाला ? तसं कशाला आपण उचलूनच पाहूया, पण तो परत आला तर केवढी शोभा होईल आपली. छं नको तो विचार. पण कितीही प्रयत्न केला तरी त्याला मोह आवरेना. त्याने बाहेंर येऊन पाहिले दूर बाकावर कोणीतरी पांघरुण घेऊन झोपले होते. बहुतेक तो प्रवासीच असावा. स्टेशन मास्तर पुन्हा आत आला. त्याची नजर पुन्हा ब्रीफकेसवर गेली. त्याने ती उचलून पाहिली. हो खरंच जड होती ती, त्याने काळजीपूर्वक ती हलवून पाहिली पण आतलं काही हलल्याचं जाणवलं नाही. काय असावं यात ? काही तरी मौल्यवान असणार खास, जरा जपून ठेवा असं म्हणाला तो. त्याअर्थी शंकाच नको मग यात काय असेल ? पैसे ? पण छे, नोटांच्या थप्प्या अगदी खचून भरल्या

तरी एवढं वजन होणार नाही. मग काय असावं सोनं? जडजवाहीर ? नाहीतर अफू, गांजा, हाशिश यासारखं एखादं मादक द्रव्य, काहीही असो मौल्यवान असणार याबद्दल शंकाच नको. समजा हे सगळं आपलं झालं तर? जन्माची ददात मिटेल, ही भिकार स्टेशन मास्तरची नोकरी करायची गरज राहणार नाही. निदान म्हातारपणी चार घास सुखाने खायला तरी मिळतील. मग ती ब्रीफकेस घेऊन पळून गेलो तर, पण पळून पळून पळणार तरी कुठे ? पोलीस पकड-तीलच, शिवाय तो बरा स्वस्थ बसेल ? एवढा ऐवज गेल्यावर, त्यापेक्षा त्यालाच खलास केला तर ?

पण कसा करणार ? गळा दाबूनच, पण प्रेताची विल्हेवाट कशी लावायची ? एकटया दुकटयाचे काम नाही हे. कुणाची मदत घ्यावी बरं ? हो आपला मुलगा किशा आहे तसा. हो पण आज तो पिक्चरला जाऊन येणार आहे इकडेच झोपायला. स्टेशन मास्तरने घड्याळात पाहिले छे किशा यायला अजून बराच वेळ आहे.

तेवढ्यात त्याला जाग आली तर ? त्यापेक्षा आपणच त्याचा गळा घोटावा, काय हरकत आहे ? गळा दाबून त्याला नुसतं खाली लोटून दिलं तरी प्रेत जाऊन खालच्या खड्डयात पडेल. तिथं गवतही इतकं माजलंय की कुणाला संशयही येणार नाही. पुढची व्यवस्था पहायला कोल्हीं-कुत्री अन् गिधाडे आहेतच. आणि समजा फारच दुर्गंधी सुटली तर पोलीस येतील आणि फारतर पचनामा करतील. त्यांचाही तर्क असा होईल की अंधारात पाय घसरून पडला असावा किंवा बाकावर झोपलेला, झोपेत तोल जाऊन पडला असावा कुणाला कसलाच संशय येणार नाही आणि मग एवढा सगळा ऐवज आपला, फक्त आपलाच.

आणि या विचारासरशी स्टेशन मास्तर उठला. त्याची छाती धडधडत होती. हाता-पायांना कापरं सुटलं होतं, पायाखालची वाट असून सुद्धा नीटसं काही दिसत नव्हतं. त्यानं आपल्या गळ्याचा मफलर सारखा केला. बरा आहे हा मफलर, यानंच त्याचा गळा घोटता येईल. असं म्हणून तो धडपडत चाचपडत निघाला आणि त्या बाकाजवळ आला.

'तो' डोक्यावर पांघरूण घेऊन शांतपणे झोपला होता.

स्टेशन मास्तरने आजूबाजूला पाहिलं, कोणीही नव्हतं. त्यानं झटकन मफलर काढला आणि त्याच्या गळ्याखालून काढून आवळला. त्याने धडपडत उठण्याचा प्रयत्न केला. त्याच्या तोंडून अस्पष्ट असे नकळणाऱ्या शब्दांचे बुडबुडे बाहेर पडले. पण स्टेशन मास्तरने सर्व शक्ती एकवटून त्याचं डोकं खाली आपटलं. त्याचा शेवटचा प्रतिकारही लुळा पडला. तो मेलाय की नाही हे न बघताच स्टेशन मास्तरने त्याला बाकावरून खाली ओढले. तसेच ढकलत ढकलत फलाटाच्या टोकाला आणलं आणि खाली लोटून दिलं धप्पकन एक आवाज उमटला आणि त्याने स्टेशन मास्तर भानावर आला.

आपण काय केले हे ? खून ?

आणि त्याने वेड्यासारखे आपले हात पाहिले. त्याला ते रक्ताने माखलेले दिसले. त्याने ते हात झटकले व पुन्हा पाहिले हात स्वच्छ होते. खरंच हातावर रक्त आहे की भास आहे म्हणून त्याने पुन्हा हात पाहिले, हात रक्ताळलेले होते. त्याला काहीच सुचेनासं झालं, त्याचं डोकं भनभनायला लागलं.

धडपडतच तो केबिनमध्ये आला आणि त्याने आपलं अंग खुर्चीत लोटून दिले. केबिनमधील प्रत्येक वस्तू जिवंत होऊन त्याच्या रोखाने येत होती आणि त्याला ओरडून सांगत होती, 'तू खूनी आहेस' त्यानं आपले डोळे गच्च मिटून घेतले आणि डोक टेकून तो पडून राहिला. असा किती वेळ गेला कोणास ठाऊक तो जेव्हा जागा झाला तेव्हा खांद्यावर हात ठेवून त्याला कोणीतरी उठवत होत,

" अहो झोप लागली वाटतं. माझी ब्रीफकेस देता ना ? " तशाही स्थितीत स्टेशन मास्तरला हसू आलं. "हं ! ब्रीफकेस ! ! " आणि त्यानं किंचित डोळे किलकिले करुन बघितलं आणि अस्फुट किंकाळी त्याच्या तोंडून बाहेर पडली, " तू . . तू ... तुम्ही ? " " हो, मीच, अहो काल ब्रीफकेस नाही का ठेऊन गेलो ? आणि हे काय, तुम्ही किती घाबरलाय, काही भयंकर स्वप्न पडलं होतं का ? तुम्हाला घाम पहा किती आलाय, हे घ्या, थोडं पाणी प्या, म्हणजे तुम्हाला बरं वाटेल. " " हो. " हा तर तो प्रवासी मग आपण काल मारला तो कोण ? की हे त्याचं भूत आणि भूत म्हटल्यावर त्याच्या अंगाला कापरं सुटलं त्यानं त् त् प् प् करीतच त्याच्या पायाकडं बघितलं पाय तर सुलटे आहेत म्हणजे हा प्रवासीच आहे तर, त्याच भूत नव्हे मग 'तो' कोण होता ज्याचा आपण खून केला तो ? " माझी ब्रीफकेस देता ना ? " घ्याना घ्या " स्टेशन मास्तरनं ब्रीफकेस दिली.

पण त्याला काय वाटलं कुणास ठाऊक त्यात त्या प्रवाशाला विचारलं "काय हो या बॅगेत काय आहे?" प्रवासी बुचकळ्यात पडला सांगाव की सांगू नये, " नाही माफ करा हं, मी तुम्हाला हा खाजगी प्रश्न विचारायला नको होता, " " नाही तसं खाजगी त्यात काही नाहीये. "

" मग त्यात आहे काय ? " " त्यात ना, दगड आहेत " " दगड ? " " हो दगड पण साधे सुधे नाहीत इथे गावाजवळ मँगेनीजची खाण सापडेल असा आमचा अंदाज आहे आणि म्हणून मी हे दगड प्रयोगशाळेत नेत आहे काल रात्री मला खाणीत अर्जंट काम निघाल म्हणून मी हे ओझं इथे ठेवून गेलो अरे आलीच की गाडी अच्छा भेट् पुन्हा " असं म्हणून प्रवासी निघून गेला

स्टेशन मास्तर चक्रावून गेला आपण खून केला तो कोण आणि आपण खून तरी कशासाठी केला आपण. त्या दगडांसाठी. त्याला काही सुचेनास झाल त्याच डोक भणभणून गेलं त्यानं कसंबस काम आटपलं

गाडी निघून गेल्यावर तो धावतच फलाटाच्या टोकाला आला त्यानं इकडे तिकडे पाहिले कोणीही नव्हत त्याने पटकन खाली उडी मारली आणि तो खड्डयाजवळ गेला वरुन तरी काही समजत नव्हत स्टेशन मास्तरला हायसे वाटले. त्याने दोन्ही हातांनी गवत बाजूला केलं आणि स्टेशन मास्तरची एक प्रचंड किंकाळी स्टेशनात दणाणून गेली. त्या खड्डयात एक प्रेत पडले होते डोकं दगडावर आपटल्याने रक्ताचा सडा पडला होता चेहरा ओळखू येत नव्हताच पण तरीही ते कपडे ते घड्याळ हो गावात मिळत नाही म्हणून शहरात जाऊन आणलेलं ते घड्याळ, शंकाच नको तो किशा होता होय. ते प्रेत किशाचेच होते.




## सोना इलेक्ट्रीकल्स्

६, ढाके कॉलनी,
श्रीमती इंदिरा गांधी मार्ग
हॉटेल शिवा जवळ, **जळगांव**



आमचेकडे सर्व प्रकारचे टयूब लाईट,
बल्ब, पी. व्हि. सी. पाईप व वायर
तसेच फिटींगचे मटेरियल योग्य
दरात मिळेल. आणि सर्व प्रकारची
इलेक्ट्रीक फिटींगही करुन मिळेल

# खानदेशचे भूषण - शिरीष मेहता



नरेंद्र एम. तोरवणे

M.Sc Ist Year

'दुर्लभम् भारत जन्म:' असे एक सुभाषित आहे पण आचार्य अत्रे म्हणत 'अतिदुर्लभम् महाराष्ट्र जन्म:' या भारताची भूमी म्हणजेच क्रांतीकारकांचीं भूमी आहे. मायभुमीसाठी अनेक हुतात्मे झाले खानदेशात शिरिषकुमार मेहता सुद्धा असाच हुतात्मा झाला.

शिरिषचा जन्म २८ डिसेंबर १९२६ ला झाला. शिरीषच्या घरी विविध विचारांचे लोक येत असत, चर्चा करत त्यांचे विचार शिरीष ऐकत असे. आई-वडीलांनी देशसेवेला वाहून घेतले होते. आणि याच वातावरणाने शिरीषकुमारवर देशप्रेमाचे संस्कार केले.

मुंबईला राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन भरले अर्थात आईवडील जाणार होते. शिरीष लहान होता. तोही अधिवेशनाला गेला. या अधिवेशनात म. गांधी, सरदार वल्लभभाई पटेल यांची भाषणे झालीत.

देशाबद्दलचे प्रेम, निष्ठा या भाषणातून त्याला दिसून आली.

रामायण, श्रीमद्भगवतगीता, गीता रहस्य त्याने लहानपणीच वाचले होते. गुजराथी, संस्कृत, हिंदी, इंग्लीश या भाषा त्याला अवगत होत्या.

बोलण्याची विशिष्ट लकब असल्यामुळे त्याला भरपूर मित्र मिळाले.

रोज पहाटे प्रभातफेरी निघे. प्रभातफेरीत 'वंदे मातरम, भारत माता की जय' अशा घोषणा दिल्या जात.

प्रभात फेरी संपल्यावर तो भाषण देत असे.

"मित्र हो,

आपल्या रक्ताचा थेंब न थेंब राष्ट्राच्या कामासाठी आला पाहिजे आपल्या देशात आपणच गुलाम हे आता चालू दयावयाचे नाही. स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय गप्प बसावयाचे नाही. या मायभुमीसाठी काहीतरी केले पाहिजे.

अशा तऱ्हेची भाषणे तो देत असे भाषणातून राष्ट्राबद्दलचे प्रेम, आदर व निष्ठा दिसून येते

शिरीषच्या मनावर महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस यांचा जबरदस्त पगडा होता.

वडील मुंबईला गेले त्यांनी विचारले,

"बेटा शिरीष तुझ्यासाठी मुंबईहून काय आणू"

तर त्याने सांगितले,

"दादा,

माझ्यासाठी महात्मा गांधींनी इंग्लडच्या पार्लमेंटमध्ये जे भाषण दिले आहे ती कॅसेट आणा."

वडीलांनी कॅसेट आणली. शिरीषने बऱ्याच वेळा ऐकली.

गांधींची खादी त्याला फारच प्रिय होती. त्यामुळे त्याचा पोषाख खादीचाच असे. स्वत:च्या टोपीपुरते सूत तो सहज कातीत असे.

शिरीषचे घर म्हणजे क्रांतीकारकांचा एक बालेकिल्लाच असे तेथे रोज चर्चा होत, बैठका होत असत.

शिरीषच्या घरी बैठका आणि चर्चा होतात असे समजल्यावर गोऱ्या पोलीसांची कडक नजर या घरावर राहिली.

पोलीसानी एके दिवशी या घराची झडती घेतली. कारण गावात जी पत्रके लावली जातात ती येथूनच सायक्लोस्टाईल केली जातात असा त्यांना संशय होता, पण पोलीसांना झडतीत काहीही सापडले नाही. अर्थातच हे काम शिरीषच्या घरुन होत असे.

गांधींना अटक झाली त्यांना सोडा म्हणून मिरवणुका काढल्या, मोर्चा काढला. 'वंदे मातरम, गांधी को छोड दो' अशा घोषणा देण्यात येत असत.

गांधींच्या अटकेचे पडसाद देशभर उमटले. नंदुरबारचा शिरीषही वर्गात गेला. वर्ग बंद झाले, देशप्रेमाबद्दलचे भाषण दिले. विद्यार्थ्यांकडून शपता घेतल्या. जोरजोरात घोषणा देत मिरवणूक निघाली.

मिरवणूक वाढतच होती, पोलीस आले. सगळ्यांना अटक झाली. शिरीषच्या वडीलांना समजले शिरीषला अटक झाली.

म्हणून ते कचेरीकडे गेले आणि परीक्षा पहाण्याचे हेतूने म्हटले,

"शिरीष मी तुला जामीनवर सोडवून घेण्यासाठी आलो आहे."

हे बोलल्यावर शिरीषने बाणेदार उत्तर दिले. तो म्हणाला,

"दादा,

मी येथे एकटा नाही, अनेक मित्र माझ्याबरोबर आहेत मी तुमचा लाडका आहे ते पण त्यांच्या आई बापाचे लाडके असतील ना? तुमच्या प्रेरणनेच मी या स्वातंत्र्याच्या युद्धात उडी घेतली आहे. आपण माझी हिंमत कमी करु नका. जा आपण आईला आणि आजीला सांगा, शिरीष आनंदात आहे."

केवढा बाणेदारपणा दिसून येतो त्याच्या बोलण्यात!

कचेरीतच 'वंदे मातरम' च्या घोषणा देण्यात अटक झालेल्या मुलांनी सुरवात केली शेवटी रात्री आठ वाजता या मुलांना सोडून देण्यात आले.

इंग्रजांनी सोडून दिल्यामुळे यांना अधिक उत्साह आला. आपण इंग्रजांना हरवले म्हणून त्यांचा चेहरा एखाद्या फुलासारखा टवटवीत झाला होता. लागलीच मिटींग झाली व उदया 'मशाल मोर्चा' काढण्याचे ठरले.

प्रत्येकाचे रक्त सळसळत होते डोळ्यात आग होती तर डोक्यात क्रोधाग्नी भडकलेला होता प्रत्येकाला स्वातंत्र्य मिळावे असे वाटत होते.

९ सप्टेंबरला गांधींच्या अटकेला एक महिना झाला. मिरवणूका, निदर्शने अशा तऱ्हेच्या अस्त्रांनी सरकारचा निषेध होवू लागला.

शिरीष या कामात मागे नव्हता विद्यार्थ्यांना गोळा केले आणि शाळेतच घोषणाबाजी करु लागला म्हणून मुख्याध्यापक रागावले पण त्या रागावण्याकडे दुर्लक्ष करुन आपले देशसेवेचे व्रत शिरीषने चालुच ठेवले.

त्याच्या डोळ्यासमोर दोनच ध्येये होती. गांधींची मुक्तता आणि भारताला स्वातंत्र्य.

एक महिन्यापासून नंदनगरी धगधगतच होती. दहा सप्टेंबरला बाळशंकर दादाचे श्राद्ध होते. नातेवाईक जेवायला येणार होते. लाडू बनविले जात होते शिरीष

बाहेर जाण्याच्या तयारीत होता. आजीने शिरीषला जेवण केल्याशिवाय बाहेर जाऊ दिले नाही त्याने जेवण केले आणि खाली गेला मित्र-मंडळी वाटच पहात होती.

हाच तो दहा सप्टेंबरचा दिवस जळक्या बाजारातुन मिरवणूक निघाली. हरताळ पाळला गेला. शाळा बंद झाल्या. मिरवणूक जशी जशी पुढे जात होती तशी तशी गर्दी वाढतच होती.

सर्व नंदनगरी एक झाली होती.

"जिंकू किंवा मरु स्वातंत्र्यासाठी युद्ध आमचे सुरु"

अशी भावना मिरवणूकीतील प्रत्येक माणसामध्ये झाली होती. मिरवणूक कचेरीजवळ आली. कचेरीवर तिरंगा फडकला. नंतर माणिकचौकात तिरंगा फडकवून घरी जावयाचे असे ठरले होते पोलीसानी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पण मिरवणूक पांगली नाही. मिरवणूक माणिकचौकाकडे कुच करीत होती.

शिरीषचे म्हणणे होते की, "माणिकचौकात तिरगा फडकणार म्हणजे फडकणार" पण हे गोरे पोलीस त्याला तसे करु दयावयाला तयार नव्हते.

पोलीसांनी लाठीमाराचे तंत्र वापरले. लोक मिळेल त्या दिशेने पळत सुटले. परंतु शिरीषकुमार जागेवरुन हालला नाही. तो या भारताची शान हातात घेवून तसाच उभा होता. आणि जोरजोरात घोषणा देत होता.

गोऱ्या पोलीसांनी शिरीषला अडवले आणि झेंडा दे म्हणून मागणी केली आणि झेंडा न दिल्यास गोळी चालवू अशी तंबीसुद्धा दिली.

पण देशप्रेमी शिरीषला या गोळीची काय भिती वाटणार.

प्राण गेला तरी चालेल पण या भारताची शान त्याला द्यावयाची नव्हती.

त्याने उत्तर दिले,

"गोळी चालवायची असेल तर चालवा पण हा झेंडा मिळणार नाही."

शिरीषच्या हातातून झेंडा हिसकावण्याचा प्रयत्न या गोऱ्या पोलिसांनी केला पण शिरीषने आपल्या मित्राच्या हातात झेंडा दिला, त्याने त्याच्या मित्राच्या हातात अशा तऱ्हेने झेंडा पुढे पुढे सरकत होता. पण झेंडा खाली पडू दिला नाही आणि या गोऱ्या पोलिसाच्या हातात तर मुळीच नाही.

पोलीस खवळले तर शिरीष आज प्रफुल्लीत मनाने हसत होता. आजूबाजूचे मित्रसुद्धा हसत होते.

एवढी लहानशी मुले आपले ऐकत नाहीत म्हणून गोऱ्या कुत्र्याचा राग अनावर आला घोषणा चालूच होत्या. गोंधळ वाढतच होता मिरवणूक आता पोलीसांच्या आटोक्याबाहेर गेली.

शेवटी या मिरवणुकीला पांगविण्यासाठी गोळीबार करावा लागला. पोलिसांनी मिरवणुकीतील मुलींवर गोळीबार करावयाचा असा बेत आखला आणि मुलींवर नेम धरायला सुरुवात केली.

शिरीषचा क्रोधाग्नी भडकला तो म्हणाला,

"भित्र्यांनो, मुलींवर गोळी चालवायला लाज नाही वाटत. खरे मर्द असाल तुमच्यात हिंमत असेल तर चालवा माझ्यावर गोळी ही घ्या माझी छाती."

या बोलण्यामुळे पोलीस खवळले आणि त्यांनी नेम धरला, एक गोळी चुकली पायाच्या खालून निघून गेली

दुसरी गोळी सुटली तीही मांडीतून निघून गेली.

"अरे पाय आणि हात लाठी खाण्यासाठी आहेत, माझ्या छातीवर चालवा ना गोळी!"

तिसरी गोळी मात्र शिरीषच्या छातीतून निघाली.

रक्ताच्या थारोळ्यात शिरीष पडला. त्याने पाणी मागितले पण त्याला कोणी पाणी दिले नाही. त्याच्या हातात तिरंगा होता, शिरीषबरोबर घनश्यामदास, लालदास यांचीही शव आणलीत आणि अंतिम यात्रेला सुरवात झाली, प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू होते.

या दुःखामुळे ५ वर्षापर्यंत लोकांनी सण साजरे केले नाहीत.

त्यांची स्मृति सदैव तेवत राहावी म्हणून माणिक चौकात 'शहीद स्मारक' उभारण्यात आले आहे. अशा या हुतात्म्यांना लाख लाख प्रणाम !



# असहायता

पितांबर डालू पाटील
प्रथम वर्ष साहित्य

दुपारची वेळ होती, सुमारे बाराची वेळ असावी. प्रकाश रस्त्यावरून गाडी भरधाव वेगाने चालवत होता. त्याला कशाचेच भान नव्हते. त्याच्या मनात सकाळच्या शब्दांनी काहूर माजवले होते, "तुमच्या मुलामध्ये काहीतरी व्यंग असेल", "किंवा कदाचित तो माणसातच नसावा." मग प्रकाशच्या मनात एकामागून एक घटना चित्रपटाच्या रिळाप्रमाणे यायला लागल्यात.

जवळ जवळ २ वर्षापूर्वीची घटना त्याला आठवत होती. सकाळची वेळ होती. कॉलेजचं वातावरण एकदम उल्हासी होते. आणि कॉलेजवर त्या दिवशी व्याख्यान होतं. "हुंडा एक अनिष्ठ रुढी" प्रकाश हा विद्यार्थी प्रतिनिधी असल्यामुळे प्रथम आपले विचार मांडायला उभा राहिला एखाद्या सखोल विचार करणाऱ्या विचारवंताप्रमाणे तो बोलू लागला.

"मित्रमैत्रिणींनो, आज आपण या ठिकाणी ज्या गोष्टीसाठी ज्या समस्यवर विचार करण्यासाठी जमलो आहोत, तर त्याचा उपयोग केवळ आपण काहीतरीच नुसतं ऐकायचं म्हणून ऐकायचं नव्हे तर आपण त्या गोष्टी प्रत्यक्ष आचरणात आणल्या पाहिजे. आज मी तुम्हाला एक छोटसं उदाहरण सांगतो, समजा एक मुलगा आहे आणि त्याच्या घरात त्याच्या विवाहाचे वारे वाहतात. असे दोन चार स्थळं येतात. त्याला पहायला नेण्यात येतं आणि काही ना काही कारणानुसार ते टळत असतं. शेवटी एकदा तर त्याचं उत्तर येतं ते स्थळ आपल्या हिशोबात बसत नाही. यावर तो मुलगा म्हणतो म्हणजे कशा प्रकारे? त्याचं असं आहे, तुला मी लहानाचं मोठं केलं तेव्हा त्याला जो खर्चं लागला त्याची भरपाई नको का काढायला त्यावर तो मुलगा म्हणतो (अर्थातच त्याच्यावर तुमच्याप्रमाणेच कॉलेजचा प्रभाव पडलेला असतो) "बाबा तुम्ही जे केलं ते तुमचं कर्तव्य होतं पण आता माझा विवाह हा माझ्या जीवनाचा प्रश्न आहे तेव्हा तुम्ही ह्याची विक्री करू नका." बाबा म्हणतात,

"जर मी तुझ्याकरिता हुंडा म्हणून कांहीही घेतलं नाही तर माझं समाजात नाक काटलं जाईल."

"पण बाबा" मुलगा विरोध करीत म्हणतो, "एक गोष्ट सांग तुला माझी मानमर्यादा धुळीस मिळावी असं वाटत असेल तर तू खुशाल "कोर्ट मॅरेज" करु शकतो. आमच्या काय अपेक्षा होत्या तुझ्याबद्दल" आणि असे इतरही नाटकं वगैरे करून त्या मुलाला गप्प केल जात."

तर असं व्हायला नको आपण तरुण पिढीने पुढाकार घेऊनच हुंडारुपी राक्षसाशी झुंजायचं आहे आज मी आपणासमोर शपथ घेतो की माझ्या जीवनांत मी हुंडारुपी दैत्याला स्थान देणार नाही."........ झाल भाषण संपलं.

त्यामागून दिवस गेले, महिने गेले आणि तो आता एका कंपनीत मॅनेजरच्या "पोस्ट" वर चांगल्या "आकर्षक" पगारावर होता. साहजीकच त्याच्या घरात विवाहाचे वारे वाहू लागले. एका टिकाणी

स्थळ पहायला गेले मुलगी वगैरे पसंत पडली आणि त्याच्या घरी त्यांना मुहूर्त पक्का करण्यासाठी बोलावलं सर्व आपल्या मनाप्रमाणे झालं म्हणून तो मुहुर्ताच्या वेळी शेजारच्या खोलीत बसला होता. त्याच्या शेजारील खोलीत त्याचे वडील, एक त्याच्याच बाजूकडील गृहस्थ, एक मध्यस्थ, वधूपिता, व एक वधू पक्षाकडील गृहस्थ अशी मंडळी बसली होती. मध्यस्थाने बोलायला सुरवात केली, " काय मंडळी मगं मुलगी वगैरे पाहून झाली आता पुढं घेण्या देण्याच्या बाबतीत बोला. "

" हे बघा रघूनाथराव मी माझ्या मुलाच्या इच्छेविरुद्ध कांहीही करु शकत नाही. आणि माझ्या मुलाची इच्छा आहे कि त्याचं लग्न हे बिना हुंड्यानं व्हावं " वामनराव एका वाक्यात म्हणाले.

त्यावर मध्यस्थ खळबळून म्हणाले " तुम्ही काय म्हणताय वामनराव, आहो हिच वेळ असते आपण मागून घ्यायची. " मला परमेश्वराने पुष्कळ दिले आहे. मी त्यावरच खूष आहे. " वामनराव.

हे सर्व संभाषण शेजारच्या खोलीत प्रकाश ऐकत होता. यावर वधू पक्षा कडील गृहस्थाने म्हटले, " हे पहा वामनराव कांही तरी रितीने बोला कि लोक काय म्हणतील. "

" मला लोक काय म्हणतील याची पर्वा नाही आहे. " वामनराव ठासून म्हणाले मग त्या वधू पक्षा कडील गृहस्थाने पेट्रोलवर ठिणगी टाकावी त्याप्रमाणे बोलला

" तुम्ही हुंडा का घेत नाहींत ते माझ्या लक्षांत आलं, तुमच्या मुलांत काहीतरी व्यंग असले पाहिजे किंवा मग तो माणसातच नसावा. अशा मुलाला मुलगी देवून काय उपयोग.

" वामनराव एकदम कडाडून म्हणाले, " रघुनाथराव चालते व्हा माझ्या घरुन मला तुमच्या मुलीशी माझ्या मुलाचा विवाह करायचा नाही. " आणि मग ते सर्व निघून गेले इकडे खोलीत मात्र प्रकाशवर आभाळ कोसळलं होतं ......

अशातच तो एकदम भानावर आला पुढे मोटारीची रांग लागली होती व नकळत त्याचा पाय ब्रेकवर पडला. तो घरी आल्यावर सरळ बाबांना म्हणाला " बाबा आता माझ्या करता एक असं स्थळ पहा कि जे जास्तीत जास्त हुंडा देवू शकेल. "


आमचा मागील वर्षाचा निकाल !

१० वी इंग्रजी शे. ८८

सायन्स १४५।१५०, गणित १४८।१५०

१२ वी इंग्लिश ८०

सायन्स ९१, गणित ८८

**संपूर्ण तयारीसाठी भेटा—**

**प्रा. महाजन**

**राजेंद्र कोचिंग क्लासेस**

शिवाजी पुतळ्यासमोर, जळगांव.


# अनोळखी पाऊलवाटा



## ( पुस्तक–परीक्षण )

प्रा. सौ. चारुता गोरवले

" अनोळखी पाऊलवाटा " हे सौ माधुरी (प्रधान) ताम्हणे यांचे 'मेनका प्रकाशन' ने फेब्रुवारी इ स. १९८५ मध्ये प्रकाशित केलेले पुस्तक. ह्या पुस्तकाच्या प्रारंभीच,

" उमेदीचे, बुध्दीचे, प्रतिभेचे गरुडपंख लाभलेल्या, आणि त्या जोरावर अनोळखी पाऊलवाटांवर मार्गदर्शक पाऊलखुणा उमटवणाऱ्या कर्तृत्ववान महिलांच्या मुलाखती. "

अशा शब्दांत लेखिकेने वर्णन केले आहे म्हणून ही अनोळखी वाटांवरुन जाणाऱ्या स्त्रियांसाठी एक प्रकारची मार्गदर्शिकाच लेखिकेने तयार करुन ठेवली आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

अनोळखी पाऊलवाटां मध्ये लेखिकेने अनेक निरनिराळ्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवलेल्या महिलांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. 'माहेर' या मासिकामधून इ स. १९८१ ते १९८५ पर्यंत ' अनोळखी पाऊलवाटा ' हे सदर सुरु होते. त्यामध्ये प्रमिला दातार, सई पराजपे, सुहासिनी मुळगावकर, देवयानी चौबळ यांच्यासारख्या स्त्रियांच्या मुलाखती प्रसिद्ध झाल्या होत्या. तसेच लष्करी अधिकारी- नीला पंडित बॅंकेच्या डायरेक्टर– कला पंत, कुष्ठरोग्यासाठी ' आनंदग्राम ' उभारणाऱ्या इंदुताई पटवर्धन आणि उद्योगपती– माणिक बांद्रेकर ह्यांच्यासारख्या उच्च दर्जाचे काम करणाऱ्या, परंतु ज्यांचे कार्य सामान्यांना फारसे परिचयाचे नाही, अशाही स्त्रिया होत्या.

प्रस्तुत मुलाखतींमध्ये ( अनोळखी पाऊलवाटा )

१) सौ सुहासिनी मुळगावकर
२) सौ. प्रमिला दातार
३) सई परांजपे
४) सौ सुजाता मनोहर
५) रेश्मा
६) देवयानी चौबळ
७) शोभा किलाचंद
८) सौ. माणिक बांद्रेकर
९) डॉ. इंदु पटवर्धन
१०) स्विटी थॉमस
११) नमिता व मेधा

या महिलांच्या मुलाखती लेखिकेने घेतल्या आहेत

प्रथमतःच संपूर्ण मानापमान, संपूर्ण सौभद्र, संपूर्ण स्वयंवर ह्या नाटकांचे एकपात्री प्रयोग यशस्वी रीतीने सादर करणाऱ्या सौ सुहासिनी मुळगांवकर यांची मुलाखत घेतली आहे. अमेरिकेत सुद्धा ह्या हसतमुख, चिरतरुण मनाच्या स्त्रीनं आपले प्रयोग मोठ्या हिंमतीन आणि जिद्दीनं पार पाडले आहेत संगीताच ह्या स्त्रीला अतोनात वेड आहे, तेही शास्त्रीय संगीताच रोज सकाळी आपल्या मुलीबरोबर आजही ही स्त्री टेनिस खेळायला जाते. टी. व्ही. वर प्रसन्न फुललेल्या सदाफुलीप्रमाणे अनेक कलाकारांच्या मुलाखती घेते. शेवटी आपल्या चिरतारुण्याच रहस्य सांगतांना सुहासिनीबाई म्हणतात,

" दिवस उगवतो, दिवस मावळतो ह्या प्रत्येक दिवसात किती किती घडतं ! काही आपल्या मनासारखं घडत, काही आपल्या मनाविरुद्ध घडत. काही वेळा कल्पना नसतांना अनपेक्षीत सुंदर घडत, कधी

अनपेक्षित वाईट घडतं. हेच जगणं आहे, आणि ते हिंमतीनं जगायला ताकद लागते. आणि ही हिंमत, ही ताकद काही इंजेक्शनसारखी टोचून बाहेरून आत घेता येत नाही. ही मनाची उभारी तुमची तुम्हाला घ्यावी लागते आणि ही उभारी तुम्ही उगवत्या सूर्यबिंबातून घेता, निळ्या आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांच्या थव्यावरून घेता, वसंतात झाडावर फुटणारी कोवळी पालवी असते-तिच्यातून घेता. एकदा ही उभारी मनानं घेतली, की आयुष्य एवढा निरामय आनंद देऊन जातं, की ते कधी संपूच नये असं वाटतं. मीही आयुष्यावर असंच उदंड प्रेम करते आणि करत रहाणार आहे."

ह्यानंतरची मुलाखत संगीताच्या भावविश्वात संपूर्णपणं रमणाऱ्या सौ प्रमिला दातार यांची घेतली आहे. 'सुनहरी यादे' या आपल्या ऑर्केस्ट्राचे १०० ऱ्या वर प्रयोग यशस्वी रीतीने प्रमिलाबाईंनी सादर केले आहेत त्यांच्या मुलीही या ऑर्केस्ट्रामधून गातात. सुरुवातीपासून शास्त्रीय संगीत शिकणाऱ्या प्रमिलाबाईंनी हा ऑर्केस्ट्रा यशस्वीपणे पेलून दाखविला त्यांच्या साथीदारांमध्ये आणि स्वतःमध्ये अतिशय कौटुंबिक, जिव्हाळ्याचे संबंध त्यांनी प्रस्थापित केले आहेत.

प्रमिलाबाईंच्या ह्या वाढत्या व्यापात सासूबाई, मुली व पती यांचं सहकार्य सर्वार्थानं मिळालं आहे. म्हणूनच त्यांची ही यशस्वी घोडदौड सुरू आहे

सई परांजपे हे सर्वतोमुखी असलेलं नाव, मासिकं, पेपर, टी. व्ही मधून बऱ्याचदा यांच्या मुलाखती प्रसिद्ध झाल्या आहेत. लहानपणापासूनच लाभलेल्या संस्कारांच्या, कौटुंबिक पार्श्वभूमीचं फलित म्हणूनच आज मी समर्थपणानं उभी आहे, असं सईबाई म्हणतात. वयाच्या आठव्या वर्षीच या मुलीनं स्वतःच्या गोष्टींचं एक पुस्तक लिहिलं, प्रसिद्ध केलं. आणि पुढे ह्या परीकथा, राजाराणींच्या गोष्टी, गाणी, अंगाईगीत घराघरात पोचली.

"झाली काय गंमत", "जादूचा शंख", "पत्तेनगरी" इ. छोटी नाटकं लिहिणाऱ्या सईबाईंची आज "सख्खे शेजारी" सारखी नाटकं प्रेक्षकांची मनं जिंकून घेताहेत. आणि 'कथा', 'चष्मेबहाद्दूर', 'स्पर्श' यांसारखे चित्रपट प्रेक्षकांना वास्तवतेची जाणीव करून देऊन आगळ्यावेगळ्या भावविश्वात नेत आहेत.

परदेशाहून बॅरिस्टर होऊन आलेल्या सुजाता मनोहर ह्या पहिल्या स्त्री न्यायमूर्ती आपल्या पदाची आणि स्वीकारलेल्या जबाबदारीची जाणीव त्यांना पूर्णपणानं आहे. त्या म्हणतात,

"वकिलांचे यक्तिवाद आणि संबंधित कायदा ह्या दोन्हींवर न्यायमूर्तींचे निकाल आधारलेले असतात. त्यांचा विभक्तपणे विचार करता येत नाही. वकिलानं केलेल्या युक्तिवादाची सत्यासत्यता पडताळून पाहण्याची जबाबदारी ही शेवटी न्यायाधिशाची असते. त्याप्रमाणे कायद्यानुसार न्याय देणं हे महत्वाचं काम अखेर न्यायाधिशाच्या हाती उरतं."

यानंतर लेखिकेने ज्या दोन कर्तृत्ववान महिलांच्या मुलाखती घेतल्या आहेत, त्यापैकी एक, चित्रपटात काम करणारी आहे, तर दुसरी चित्रपटात काम करणारांमध्ये सतत वावरणारी आहे.

वयाच्या चौदाव्या वर्षापासून "राखी और हथकडी", "गरम मसाला", "रामपूर का लक्ष्मण" चित्रपटात स्टंट गर्ल म्हणून काम करणाऱ्या 'रेश्मा' ची मुलाखत लेखिकेने घेतली आहे. अविवाहित असलेल्या या तरुणीच्या जीवनात चित्रपटसृष्टीत काम करतांना कसे चित्तथरारक, रोमांचकारी अनुभव आलेत, याचं प्रत्ययकारी दर्शन या मुलाखतीत घडत.

देवयानी चौबळ ही स्वतःच कुटुंब सोडून ख्रिश्चन कुटुंबातच वाढली. फटकळ आणि सडेतोड स्वभावाची ही तरुणी. तिला उनाडपणा करायला, निरुद्देश भटकायला खूप आवडत. देवयानी अतिशय बिनधास्त आहे, खर्चिक आहे. स्वतःच्या जीवनाबद्दल तिची रोखठोक मतं आहेत. म्हणूनच ती इतक्या सडेतोडपणानं, तूफानांप्रमाणं स्वतःच आयुष्य बेदकारपणानं जगते आहे.

शोभा किलाचंद ही एक यशस्वी पत्रकार. 'सोसायटी' 'सेलिब्रिटी' या अंकांच आगळवेगळं संपादकीय, हे शोभाताईचं वैशिष्टय. प्रसिद्ध वकील आणि केन्द्रिय खात्यातले कायदे सल्लागार श्री. राजाध्यक्ष यांची ही कन्या. प्रथम मॉडेलिंग करून नंतर हिने पत्रकारिता सुरु केली.

तिच्या सहकाऱ्यांबरोबर तिची वागणूक स्वच्छ, स्नेहपूर्ण आहे. रात्रंदिवस आपल्या मासिकाच्या प्रसिद्धीसाठी ही सारी माणसं झटत असतात.

सौ. माणिक वांद्रेकर ह्या एक प्रसिद्ध उद्योगपती. सुमारे दोनशे रुपये भांडवलावर घराच्या गॅलरीत सुरु केलेल्या एका हस्तव्यवसायाचं रुपांतर आज करोडो रुपयांची उलाढाल करणाऱ्या तीन-चार कंपन्यांच्या भव्य व्यवसाय केन्द्रात झालय.

'लेदर फर्निचर' ची कल्पना प्रदर्शनांच्या मार्फत या व्यवसायात खूप मोठ यश देऊन गेली सध्या सौ. माणिक वांद्रेकरांनी चांदीच फर्निचर बनवायला सुरुवात केली. या व्यवसायात त्यांना असंख्य अडचणी आल्या. या अडचणींना त्यांनी यशस्वीपणानं, समर्थपणानं तोंड दिलयं. आपल्या व्यवसायातील यशस्वीतेबद्दल त्या म्हणतात,

"ज्या स्त्रीला व्यवसायाबरोबर संसारातही यशस्वी व्हायच आहे, तिला प्रथम पतीच्या स्वभावाशी मिळतं-जुळतं घ्यायला जमल पाहिजे. मी बाहेर कितीही यश मिळवलेलं असलं, तरी त्यात माझ्या पतीचं सहकार्य सर्वात मोलाचं ! आम्ही सर्व सुख दुःख एकत्र भोगलीत, त्याची मला जाणीव आहे. आणि अशी कृतज्ञ जाणीव ठेवणं, ह्यातच स्त्रीचा मोठेपणा आहे. व्यवसायात जरी तुम्ही चार पावलं पतीपुढे चाललात, तरी संसारात मात्र नेहमीच सावलीसारख त्याच्यामागे राहिलं पाहिजे, असं मला वाटत."

डॉ. इंदू पटवर्धन ह्या एक प्रख्यात समाज कार्यकर्त्या. 'आनंदग्राम' येथे कुष्ठरोगपीडितांची सेवा त्या करीत असतात. राजघराण्यातील एका स्त्रीनं हा व्यवसाय पत्करावा, हे खरोखर आश्चर्यच आहे.

सर्व धर्माचे लोक इथं एकत्र राहतात. म्हणूनच गणपती, दिवाळी, ईद, ख्रिसमस इ. सर्वच सण उत्साहानं साजरे केले जातात. हे सारे लोक ह्या आनंदवनाचं नंदनवन करण्यासाठी झटत असतात.

स्विटी थॉमस ही एक सर्कस सुंदरी आपल्या सर्कसच्या विश्वात रममाण होऊन शिवणकाम, भरतकाम यात उरला-सुरला वेळ घालवणारी. आपल्या व्यवसायाशी ती ईमानी आहे तिचे अनेक रोमहर्षक अनुभव ऐकून सर्कसच्या विश्वातले ते चित्तथरारक प्रसंग आपण जणू काही सर्कसच पहात नाही ना ? ह्या शंकेनं वाचक क्षणभर स्तिमित होऊन जातात.

नमिता व मेघा ह्या दोघी सख्ख्या बहिणी. ह्या दोघी हवाई सुंदरी. आपल्या व्यवसायातले अनेक बरेवाईट अनुभव यांनी सांगीतले आहेत. ह्या दोघी मात्र सुसंस्कारित आहेंत. घरादारा-पासून- सण-समारंभापासून सतत त्या दूर राहिल्या आहेत त्या केवळ व्यवसायामुळे. त्या खंबीर आहेत पण हेकट नाहीत. शालीन आहेत, पण बुजऱ्या नाहीत स्वतंत्र आहेत, पण स्वैराचारी नाहीत.

अशा रीतीनं एकूण अकरा, भिन्न व्यवसायक्षेत्रातल्या कर्तृत्ववान महिलांच्या मुलाखती सौ- माधुरी (प्रधान) ताम्हाणे यांनी घेतल्या आहेत.

या 'अनोळखी पाऊलवाटा' लेखिकेनं वाचकांना ओळखीच्या करून दिल्या आहेत. साधी-सरळ भाषा, नेमके, व्यवसायाशी संबंधित, वेधक प्रश्न, संवादातील मोकळेपणा इ. वैशिष्टयामुळं 'अनोळखी पाऊलवाटा' पायाखालून (नजरेखालून) घालाव्याशा वाटतात.

स्त्री–मुक्ती आंदोलनाच्या ह्या काळात प्रत्येक स्त्री जर यातील महिलांसारखी कर्तबगार, कर्तृत्ववान, स्वतःच्या पायावर उभी रहाणारी असली, तर स्त्री–मुक्ती आंदोलन न करताच ती खऱ्या अर्थाने मुक्त होऊ शकेल, हे निश्चितच !

# युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती




राजेंद्र चौधरी

टी. वाय बी. एस्‌सी. ( रसायन )


युवा एकदाच होता येतं तसंच जीवनही एकदाच अनुभवता येतं. आणि अशा या युवाशक्ती-शाली जीवनात जे सुद्धा तुम्ही, देशहीतवादीय कार्य जर तुम्ही करून दाखवाल तर ते म्हणजे आयुष्याअंती स्वतःच्या कर्तृत्वाने कमवलेला अनमोल खजिनाच असेल.

तुम्ही तुमच्या युवाशक्तीचा उपयोग या विश्वात शांतता नांदण्यासाठी व आपल्या देशाला प्रगतीच्या शिखराकडे घेऊन जाण्यासाठी केला पाहिजे तुम्ही युवक आहात आणि तुमच्यात काहीतरी करून दाखवण्याची क्षमता आहे असे फुकटच तुम्हांला कोण म्हणेल ? किंवा स्वतःच्या नावाने आपणास दुसऱ्याने ओळखण्यापेक्षा आपल्या कर्तृत्वाने जर त्यांनी ओळखले तर !

—पण हे सर्व केव्हा ? जेव्हा युवाशक्तीचा प्रयोग तुम्ही या जगावर कराल तेव्हा ! आणि जास्तीत जास्त शांतता व प्रगतीची पावले, यांचा पीछा कराल.

जीवन जर आता तुम्हास मिळालेच आहे तर साधं म्हणून का जगतां ? जेवढे जनहित, देशहित करता येईल तेवढे करा. पुढील जन्मी युवाच बनायला मिळेल याचा काय विश्वास.

जीवन हे एक झाड आहे अशी अनेकांची अनेक जीवनं आहेत, त्यात ' त्या झाडावर बहार आणणे हे तुमच्या हाती. ' जेवढे जास्त परिश्रम तेवढा जास्त बहार. मग तुमचे झाड या अनेकांमध्ये उठून दिसले पाहिजे नाहीतर काय उगीचच जीवन काय वेडेवाकडे जगायचे, भूक लागलेला कुत्रा जसा फिरतो तसे !

तर तुमच्याकडून आता अशीच अपेक्षा करू या की प्रत्येक युवा आपआपले जीवन, देशाला पूर्णपणे अर्पण करेल, कितीही केले तरी आपण आपल्या राष्ट्रावेच आहोत आपली युवाशक्ती ही राष्ट्रशक्तीच आहे.

# गडकऱ्यांचा विनोद




कु. विनिता दि. महाजन

एफ्. वाय बी. कॉम, ( ए. )


राम गणेश गडकरी म्हणजे मराठी साहित्यातील एक चमत्कारच म्हटला पाहिजे. ते भाषाप्रभू होते. थोर नाटककार होते, महाकवी होते. तसेच विनोदी लेखक म्हणून त्यांचे स्थान मराठी साहित्यात अव्वल दर्जाचे होते खालील काही प्रसंगनिष्ठ विनोदातून त्यांची तैलबुद्धी, हजरजबाबीपणा, खेळकर वृत्ती, कोटीबाज़पणा, उपरोध, मार्मिकता इत्यादी अनेक गुणांचे दर्शन घडू शकते. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचेही दर्शन घडते.

## १ मी कामात आहे –

अष्टौप्रहर विचारांची समाधी लावून बसलेले गडकरी व्यवहारी आयुष्याला जवळजवळ मुकलेच होते. आणि अशा वेळी कोणी त्यांचा समाधीभंग केला तर ते त्याला टाकून बोलत. नंतर मात्र त्यांना घडलेल्या प्रसंगाबाबत वाईट वाटे. " माझ्या या कठोरपणातूनच माझे सुंदर ताजमहाल बाहेर पडायचे आहेत " असे म्हणून ते स्वतःचे समाधान करून घेत. परंतु असले प्रसंग टाळण्याकरीता गडकऱ्यांनी मुद्दाम ' मी. कामात आहे ! ' अशी एक पाटी मुख्य दारावर लावली होती. अर्थात त्या पाटीचा उपयोग झाल्याचे कधीच आढळून आले नाही. इतक्या चौक्या ओलांडूनही एखादा माणूस गडकऱ्यांपर्यंत पोहोचायचाच.

असेच एक अनोळखी गृहस्थ बेधडक गडकऱ्यांपर्यंत गेले तेव्हा गडकरी त्यांच्या अंगावर खेकसून ओरडले, "मी कामात आहे, तुम्हाला भेटायला मला वेळ नाही " तो गृहस्थ शांतपणे म्हणाला, " पण मला तर तुम्ही ' कामात आहात असे दिसत नाही. ' नुसते विडया ओढीत तर बसला आहात. तेव्हा गडकरी उत्तरले, " लोकांना ज्यावेळी मी कामात नाही असे वाटते त्याचवेळी मी खरा कामात असतो. "

## २ नारळ फुटला पण......? –

किर्लोस्कर मंडळी फुटली तेव्हा तिच्यातून फुटून जाणारे एक गृहस्थ आपले सामानसुमान कंपनीतून नेत होते सर्व बाधाबांध झाल्यावर ते इकडे-तिकडे पाहून म्हणाले, " आता काय राहिले बरे ? अरे हो जोडे राहिलेच की ' गडकरी तत्काळ उद्गारले, " राहू द्या राहिले तरी आता इथून बाहेर पडल्यावर लोक हवे तितके देतील. " याच गृहस्थांना त्यांच्या कंपनीचा नारळ फुटला तेव्हा गडकऱ्यांनी विचारले, " नारळ फुटला पण कंपनी केव्हा फुटणार ?"

## ३ वैद्याची किमया –

काय सांगितलं वैद्यांनी ? गडकरी आजारी असतांना एका स्नेह्याने विचारले. गडकऱ्यांनी उत्तर दिलं, " तीन दिवसात बरं करतो म्हणतात. अगदी छातीला हात लावून सांगितलं त्यांनी. स्नेही आनंदाने म्हणाले, ' वा मग दोन तीन दिवसात आराम पडेल तुम्हाला. ' गडकरी उत्तरले, " तोच तर प्रश्न आहे, वैद्याने आपल्या छातीला हात लावून तसे म्हटलं, माझ्या छातीवर हात ठेवला असता तर तसे म्हणण्याची त्यांची छातीच झाली नसती ! "

## ४ कोट्यांचा गोंधळ नि हंशाचा सुकाळ –

कोल्हटकरांनी पुढे पुढे गडकऱ्यांना अगदी बरोबरीच्या नात्याने वागविले, त्यांच्या वयातले चौदा वर्षांचे अंतर दोघांची विनोदबुद्धी तात्काळ नाहीसे करी. कोटचा विनोदांच्या वर्षावात वयाचे भान कसे राहणार? हे गुरू–शिष्य कोटचा करण्यात कुठलाही निर्बंध पाळीत नसल्याने परिहासाची मजल किती जायची बघा!

खामगावातील एका वकिलाने गाढवावर केलेली एक मजेदार कोटी कोल्हटकरांकडून गडकऱ्यांना कळली. ती कोल्हटकरांचीच कोटी समजून आनंदाने इतरांना सांगताना गडकरी म्हणाले, ' ही कोटी मला इतकी आवडली आहे की, आता ज्या ज्या वेळा मला गाढव दिसतं त्या त्या वेळी मला नात्यांची आठवण होते!" गडकऱ्यांची ही प्रतिकोटी ऐकून कोल्हटकर मनमुराद हसले आणि गडकऱ्यांना म्हणाले, ' मास्तर, ही तुमची कोटी इतकी चांगली झाली आहे की यामुळे मला जेव्हा गाढव दिसत जाईल तेव्हा तुमची आठवण होत जाईल ' " गुरुशिष्यातील किती मोकळेपणा हा!"

## ५ गुरुदक्षिणा –

' मास्तर तुम्ही कोणाच्याही स्वभावाची पारख लवकर करता ना? मग माझा स्वभाव कसा आहे सांगा पाहू? गडकऱ्यांच्या एका शिष्यवराने मोठ्या ऐटीने त्यांना प्रश्न केला, शिष्यापासून पराजयाची इच्छा करणाऱ्या गुरुसारखे गडकरी थोडेच होते? त्यानी शिष्याचे समाधान खालील शब्दांनी केले, " तुझा स्वभाव का? रस्त्यानं चालता चालता तुझ्या बुटाचा बंद तुटला तर तू माझं आतडं मागशील."

## ६ खरी अडचण –

किर्लोस्कर कंपनीचे जुने चिंतोबा गुरव व कंपनीचे मालक मुजुमदार यांची एका बाबतीत बोलाचाल झाली, त्यावेळी कावून गेलेले चिंतोबा गडकऱ्यांना म्हणाले, ' या शंकररावांचा एक मूक अनुभव पाहिला की, डोक्यात राख घालाविशी वाटते. ' गडकऱ्यांनी हसत तात्काळ उत्तर दिले, ' उपयोग काय डोक्यात राख घालून? तुमच्या पांढऱ्या झालेल्या डोक्याखालील राख शंकररावांना दिसणार कशी?"

## ७ प्रसंगावधान –

पुण्यप्रभाव संबंधाने एका गृहस्थाचा गडकऱ्यांशी मोठ्या कडाक्याचा वाद झाला. बोलता बोलता ते गृहस्थ चिडले व म्हणाले, " मी गाढवाशी बोलत नसतो." त्यांच्या त्या उद्गाराचा भरपूर फायदा घेतल्याशिवाय गडकरी थोडेच राहतात, ते आपले तोंड या गृहस्थाजवळ नेऊन म्हणाले, " मी बोलतो बुवा!" गडकऱ्यांजवळ कॅमेरा नव्हता नाहीतर त्यांनी त्यावेळी त्या गृहस्थाचा फोटोही घेतला असता.

## ८ दगडाखाली विंचू –

एक दिवस गडकरी असेच मंडळीत गप्पा-गोष्टी करीत बसले असता एक जण सांगू लागला, ' काल नाटकाला गेलो होतो, जाण्यापूर्वी बिछाना करून ठेवला होता. नाटक संपल्यावर घरी येऊन दिवा मालवून बिछान्यावर पडलो, इतक्यात डोक्याखाली काहीतरी वळवळल्यासारखे वाटले दिवा लावून पाहतो तो काय चमत्कार! अगदी माझ्या डोक्याखालीच एक तळहाताएवढा काळाभिन्न असा विंचू! वरं तर बरं तो जर चावला असता तर कदाचित माझ्या प्राणांवरही बेतले असते!' सर्व मंडळी उगीच भारल्यासारखी झाली होती. इतक्यात गडकरी हसून म्हणाले, ' अहो, असे घाबरून आश्चर्यचकित होण्याचे कारणच काय मुळी? दगडाखाली नेहमीच विंचू सापडत असतात!'

## ९ ' मी मात्र नागवाच!' –

गडकऱ्यांचे सबंध आयुष्यच भयंकर दारिद्र्यात गेले. कधी कधी त्यांची अवस्था फारच हलाखीची होई. पुढे पहिल्या महायुद्धामुळे झालेल्या महागाईत ' गंधर्व नाटक मंडळी ' कडून वरचेवर मिळणारे पैसे त्यांना पुरत नसत.

एकदा त्यांच्या घरात सर्वांचे कपडे फाटके होते, गंधर्व मंडळीकडून त्यांना शंभर रुपये मिळाले. ते पैसे येताच त्यांनी आईला आणि पत्नीला घरात नि बाहेर नेसण्याकरीता चार-पाच लुगडी आणली. आणि त्या खरेदीत पैसे संपले त्याच सुमारास आलेल्या पांडोबा क्षीरसागर यांना विनोदाने म्हणाले, " पांडोबा, घरात सर्वांना कपडे झाले, पण मी मात्र नागवाच राहिलो!"

विनोद बुद्धीने दारिद्र्यावरही मात केलेली पाहून आश्चर्य वाटते!

## १० नामी उपाय –

गडकऱ्यांनी एकदा पांडोबा क्षीरसागर यांना रात्री फराळाला बोलविले. फराळ वगैरे आटोपल्यावर ते पुष्कळ वेळ बोलत बसले. बरीच रात्र झालेली पाहून क्षीरसागर जायला निघाले. तेव्हा गडकरी कंदील घेऊन त्यांना रस्ता दाखविण्याकरीता उठले, क्षीरसागरांना कसेसेच वाटून ते म्हणाले, मास्तर तुम्ही कशाला उगीच तसदी घेता? गडकरी विनोदाने म्हणाले, छे, छे, मी तुम्हाला रस्ता दाखवायला उठत नाही काही! आज सकाळीच मी नवीन जोडा आणला आहे, तो तुम्ही अंधारात चुकून घालून जाल म्हणून दिवा दाखवतो आहे.

## ११ मूकनायकाची जन्मकथा! –

गडकऱ्यांचे ' मूकनायक ' हे दोन-तीन पानांचे छोटेसे विनोदी नाटक कोणाला माहीत नाही? नायकाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्व संस्कार त्या इवल्याशा नाटकात किती खुलेदारपणे दाखविले आहेत मुख्य वैशिष्टच हे की नाटकाचा नायक सबंध नाटकात एक अवाक्षरही काढीत नाही. जन्मल्यावर रडतदेखील नाही!! नायकाचे नाव विक्रांत आणि नायिकेचे नाव सरोजिनी असले तरी ते तात्यासाहेबांच्या सुप्रसिद्ध ' मूकनायक ' नाटकाचे विडंबन मात्र नाही.

## १२ मी त्याच्यावर हटकून फिर्याद करीन –

गडकरी अतिशय निगर्वी आणि विनयशील होते, अगदी जवळच्या मित्राखेरीज स्वतःच्या लेखनाविषयी ते क्वचितच कोणाजवळ बोलत असत. त्यांनी स्वतःला ' कवी ' म्हणवून कधी घेतले नाही. समाजात आपला मोठेपणा मिरविण्याचा त्यांना मनापासून तिरस्कार असे. ते हयात असतांना त्यांचा इतका नावलौकिक झाला तरी आपल्या भक्तांच्या मदतीने जाहीर सभा होऊन स्वतःचे अभिनंदन करून घेण्याचा त्यांनी कधीही प्रयत्न केला नाही.

گذشتہ سال اسی کالم میں ذکر کیا گیا تھا کہ غریب مُسلم طلبہ و طالبات کی اِمداد اور شعبۂ اُردو کی ترقی و استحکام کے لئے اُردو مضمون میں امتیازی نمبروں سے کامیاب ہونے والے طلبار کی حوصلہ افزائی کے لئے انعامات دینے کی اسکیم زیرِ غور ہے۔ خدا کا شکر ہے کہ کالج کے اُردو داں طلبہ کے تعاون سے بزمِ اُردو ادب کا قیام عمل میں آیا۔ اس بزم کے تحت "شبِ غزل" کا پروگرام شاندار پیمانے پر منعقد کیا گیا۔ شہر کے معززین اور مخیر حضرات نے نیز غیر اُردو داں طلبہ و طالبات نے اس پروگرام کو کامیاب بنانے میں بھرپور تعاون کیا۔ چند غریب طلبہ کو کتابوں اور فیس کی شکل میں امداد بھی دی گئی۔ جناب سیّد مشتاق قادری نے اپنے والدِ مرحوم سیّد وکیل کے نام سے سالانہ ۱۰۱ روپے کا انعام اُردو میں اوّل آنے والے طالبِ علم کو دینے کا اعلان کیا ہے۔ ہم ان کے نہایت مشکور ہیں۔ اسی طرح ہم کالج کے پرنسپل، وائس پرنسپل، پروفیسر حضرات، تمام طلبہ و طالبات کا دِلی شکریہ ادا کرتے ہیں جنہوں نے بزمِ اُردو ادب کے پروگراموں کو کامیاب بنانے میں تعاون کیا۔

کالج میں بی اے کی سطح پر اُردو اسپیشل جاری کرنے کے لیے ضروری ہے کہ زیادہ سے زیادہ طلبہ ایم جے کالج میں اُردو مضمون لے کر شریک ہوں۔ ضلع کی مختلف ہائی اسکولوں اور تعلیمی اداروں سے گذارش ہے کہ وہ شعبۂ اُردو کو مضبوط اور مستحکم بنانے میں تعاون کریں۔

پروفیسر اکبر رحمانی
صدر شعبۂ اُردو ایم جے کالج جلگاؤں

# जिमखाना - अहवाल १९८५ - ८६

## ज्युनियर कॉलेज

या वर्षी जळगाव येथे झालेल्या पावसाळी तालुका पातळीवरील स्पर्धामध्ये, मु. जे. कनिष्ठ महाविद्यालयाचे एकूण सात संघापैकी सहा संघ विजयी झालेत.

विजयी झालेले संघ –

१) टेबल टेनिस (मुले) २) फुटबॉल
३) बास्केट बॉल (मुले) ४) हॅण्डबॉल (मुले)
५) खो–खो (मुले) ६) कबड्डी (मुले).

टेबल टेनीसमध्ये मनिष सावजी व मनिष आपटे यांचा खेळ प्रेक्षणिय झाला, फूटबॉलमध्ये राजेश चौधरी, संदीप मेहता, दीपक आडें, भिमराव इंगळे व विवेक बन्याल यांचा खेळ प्रेक्षणिय झाला. बास्केट बॉल व हॅण्डबॉलमध्ये भावेश शहा, किरण सरोदे, रविंद्र धर्माधिकारी, अतुल गाजरे, सुहास झांबरे व जयंत पाटील यांनी साऱ्या प्रेक्षकांना मोहित करून टाकले.

खो–खो संघात संतोष पाटील, अनिल कुलकर्णी, शशिकांत घोडके व अतुल मळे यांचा खेळ सर्वोत्कृष्ट ठरला. त्यांना विश्राम अभ्यंकर या अष्टपैलू खेळाडूचे मार्गदर्शन लाभले. अतिशय चुरशीच्या प्रेक्षणीय अशा कबड्डी सामन्यामध्ये प्रकाश पाटील, अविनाश खडके, कैलास भोळे, सुनिल चौधरी, किरण अत्तरदे व अजय देशमुख यांचा खेळ दैदिप्यमान झाला. खो-खो मुलींच्या संघास मात्र दुर्दैवाने अपयश पत्क-रावे लागले. त्यात कु. ज्योती टोके, ज्योती वायकोळे, उज्वला कोतवाल व उर्मिला जगताप यांचा खेळ उत्कृष्ट झाला.

पावसाळी जिल्हा पातळीवरील स्पर्धामध्ये कबड्डी, खो–खो, बास्केटबॉल व हॅण्डबॉल या चारही संघांनी विजयी खेचून आणली. टेबल टेनीस व फूटबॉल या संघांना उपविजेते पदावर समाधान मानावे लागले, कबड्डीमध्ये प्रकाश पाटील, अजय देशमुख, सुनिल चौधरी, कैलास भोळे, किरण अत्तरदे व अविनाश खडके यांचा खेळ उत्कृष्ट ठरला. खो-खो मध्ये संतोष पाटील, अनिल कुळकर्णी, शशिकांत घोडके व अतुल मुळे यांचा खेळ उत्कृष्ट ठरला. बास्केट बॉल व हॅण्डबॉलमध्ये रविंद्र धर्माधिकारी, अतुल गाजरे, भावेश शहा, किरण सरोदे, सुहास झांबरे, जयंत पाटील याचा खेळ प्रेक्षणिय ठरला. पोहोण्याच्या स्पर्धामध्ये राजेश चौधरी १०० मी. ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये प्रथम आला व विभागीय स्पर्धामध्ये उपविजयी ठरला.

विभागीय पातळीवरील स्पर्धामध्ये खो-खो संघाला उपविजेतेपद मिळाले. त्यात संतोष पाटील, भूषण ढाके, अनिल कुळकर्णी व शशिकांत घोडके यांचा खेळ प्रेक्षणिय झाला व राज्य निवड चांचणी-साठी संतोष पाटील व अनिल कुळकर्णी यांची निवड

झाली, त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

बास्केटबॉल राज्य निवड चाचणीसाठी सुहास झांबरे, अतुल गाजरे, रविंद्र धर्माधिकारी यांची निवड झाली. श्रीनगर येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील खो-खो या विजयी संघातील खेळाडू संतोष पाटील यास सुवर्ण पदक मिळाले. प्राचार्य डी एस. नेमाडे व उपप्राचार्य डी. एच. महाजन यांनी त्याचे अभिनंदन केले.

हिवाळी तालुका स्पर्धामध्ये बॅडमिंटन मुले व मुली दोन्ही संघ विजयी झालेत. त्यात दीपक आर्डे, उमेश घटी तसेच कु. अनुपमा नेहेते व दीपाली कुलकर्णी यांचा खेळ प्रेक्षणिय झाला.

अॅथेलेटिक्स् मध्ये पुढील सर्व खेळाडू विजयी झालेत.

१) कु. सुनिता बाहेकर - १०० मी. धावणे व लांब उडी.
२) ज्योती टोके, ज्योती वायकोळे, सुनिता बाहेकर व उर्मिला जगताप यांचा ४ × १०० मी. रिले हा संघ विजयी झाला.
३) अजय देशमुख कुस्ती व लांब उडी.
४) अजय यादव कुस्ती.
५) संजय भार्गव १०० मी. धावणे.
६) राजेश चौधरी ८०० मी. धावणे.

हिवाळी जिल्हा पातळीवरील स्पर्धामध्ये बॅडमिंटन मुले व मुली ह्या दोन्ही संघानी विजयाची पताका फडकाविली. त्यात दिपक आर्डे, उमेश घटी यांच्या खेळाने साऱ्या प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करुन टाकले. कु. दीपाली कुलकर्णी व अनुपमा नेहेते यांचा खेळ उत्कृष्ट झाला.

अॅथेलेटिक्स्‌मध्ये कु. सुनिता बाहेकरने १०० मी. धावणे व लांबउडी मध्ये प्रथम क्रमांक मिळविला. संजय भार्गवने १०० मीटर धावणे मध्ये विजेतेपद मिळवले. विभागीय स्पर्धामध्ये संजय भार्गव याने १०० मी. धावणे मध्ये प्रथम क्रमांक मिळविला. तसेच कु. सुनिता बाहेकर हिने लांब उडी मध्ये दुसरा क्रमांक पटकाविला. सर्व विजयी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन.

जिमखान्याचा सतत वाढता पसारा सावरतांना सहकार्याचा सिंहाचा वाटा असणारे प्राचार्य डी एस. नेमाडे, उपप्राचार्य डी. एच. महाजन, उपप्राचार्य एम. के. येवले, उपप्राचार्य डॉ. चिरमाडे, प्रा. पी. जी. अभ्यंकर यानी आपला अमूल्य वेळ खर्चून वेळोवेळी केलेल्या अमोल सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

तसेच सर्व वर्षाच्या कार्यवाहीत कबड्डी, खो-खो व बास्केटबॉल या सर्व असोसिएशन टेलीफोन एक्सचेंज व नगरपालिका या सर्व संस्थांनी तसेच प्रा. ए यु चव्हाण, प्रा. पी. बी. चौधरी, प्रा. एम. एल. पाटील, प्रा. पी. डी. तळेले व ज्या इतर प्राध्यापकांनी व क्रिडा प्रेमींनी सहकार्य केले त्या सर्वांचा मी आभारी आहे.

**प्राचार्य डी. एस. नेमाडे**
प्राचार्य

**प्रा. बी. एम. महाजन**
क्रीडा-प्रमुख

मु. जे. महाविद्यालय, जळगाव

# जिमखाना - अहवाल १९८५ - ८६

## सिनियर कॉलेज

या वर्षी जिमखाना निवडणुका घेण्यात आल्या, परंतु आनंदाची गोष्ट ही की, या सर्व निवडणुका बिनविरोध झाल्या. खालील प्रमाणे जिमखाना कार्यकारिणी तयार झाली.

१. प्राचार्य डी. एस. नेमाडे
२. उपप्राचार्य डी. एच. महाजन
३. ,, एम. के. येवले
४. ,, डॉ एस आर. चिरमाडे
५. प्रा नारायण खडके (क्रिडा प्रमुख)
६. श्री. बी. एस. पाटील (ऑफिस प्रमुख)
७. श्री. मधुकर पाटील (जनरल सेक्रेटरी)
८. श्री अतुल तडवी (इंडियन गेम सेक्रेटरी)
९. श्री. किरण खडके (अॅथलेटिक्स सेक्रेटरी)
१०. श्री. एस. पी. जोशी (बास्केट बॉल सेक्रेटरी)
११. श्री किशोर भोळे (विद्यापीठ प्रतिनिधी)

या वर्षी आपल्या महाविद्यालयीन खेळाडूंनी अतुलनीय असा पराक्रम गाजवून महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेत बहुमोल अशी भर घातली. पुणे विद्यापिठाच्या निरनिराळ्या संघात खेळाडूंची चांगल्या संख्येने निवड झाली.

आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन सामन्यात आपल्या मुलींच्या संघाने जळगांव विभागात विजेतेपद मिळविले. व कुमारी अनघा आठवले हिच्या उत्कृष्ठ खेळामुळे आपल्या महाविद्यालयाच्या संघाने विजेते पद कायम राखले. जळगांव विभागाच्या संघात कुमारी अनघा आठवले व अल्पना सेनी यांची निवड झाली. व कुमारी अनघा आठवलेने जळगांव विभागाच्या संघाचे नेतृत्व केले त्याच प्रमाणे बॅडमिंटन (मुलांच्या) संघाने आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत विजेते पद मिळविले. आपल्या महाविद्यालयाचा संघ ८ वर्षानंतर पहिल्यांदा विजयी झाला. जळगांव विभागाच्या संघात शेखर जाखेटे, रमेश घटी, संदिप कर्पे, सुभाष टिल्लु यांची निवड झाली. व श्री शेखर जाखेटे यांनी जळगांव विभागाच्या संघाचे नेतृत्व केले.

आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस सामन्यात मुलींचा व मुलांचा संघ उपविजेता पदावर राहिला. कु स्वाती पाटील व स्मिता वैद्य यांची निवड जळगांव विभागाच्या संघात झाली. मुलांमध्ये चंद्रशेखर त्रिपाठी याची निवड जळगांव विभागाच्या संघात झाली व कु. स्वाती पाटील हिने जळगांव विभागाच्या संघाचे नेतृत्व केले.

आंतर महाविद्यालयीन फुटबॉल सामन्यात

आपल्या महाविद्यालयाचा संघ प्रतिस्पर्धेवर सहज विजय मिळवला. एकूण पांच खेळाडूंची जळगांव विभागाच्या संघात निवड झाली. कर्णधार आर. डी. महाजन, संजय थोरात, सलीम तडवी, अजय सेठी, इ. पी. सुरेश व राजू शेलके.

आंतर महाविद्यालयीन हॉकी मुले-मुलींच्या हॉकी स्पर्धा झाल्या. त्यात दोघी संघ उपविजयी ठरले.

सर्वश्री आर. डी. महाजन (कर्णधार) सलीम तडवी, मारिओ विट्टल, राजू शेलके व कु. अलका बजाज, वंदना लड्ढा, मंगला नेवे, स्मिता कुरकुरे, अलका भालशंकर, एम. एम. जोशी यांची विभागीय संघात निवड झाली.

श्री आर डी. महाजन यांनी जळगांव विभागाचे कर्णधाराचे हॉकी संघाचे नेतृत्व केले.

पुणे विद्यापिठ संघात कु. वंदना लड्ढा हिची निवड झाली.

आंतर महाविद्यालयीन बास्केट बॉल संघात मुलांच्या संघाने सतत ५ वर्षे विजेते पद कायम राखले सर्वस्वी श्री. यशवंत देसले, रत्नाकर नेमाडे विकास महाजन, गणेश महाजन, एस पी. जोशी, एस. एन अमृतकर या खेळाडूंची विभागीय संघात निवड झाली. विभागीय सामन्यात श्री. यशवंत देसले व रत्नाकर नेमाडे याचा खेळ चांगला होऊन त्यांची पुणे विद्यापिठाच्या संघात निवड झाली. व जळगांव विभागाचे नेतृत्व यशवंत देसले यांनी केले आपल्या महाविद्यालयीन वजन उचलणे स्पर्धेत मात्र चॅम्पीयनशिप मिळविण्याची शान गेल्या आठ वर्षापासून कायम ठेवली आहे सर्वस्वी- किरण खडके, कदीर-खान, शकील शेख, जयंत मुदलीयार, मधु पाटील, दिलीप लालापुरे हे आपआपल्या गटात अनुक्रमे पहिले व दुसरे आले. त्यांना प्रा. श्री. अशोक पाटील यांचे उत्कृष्ठ मार्गदर्शन लाभले.

आंतर महाविद्यालयीन हॅंडबॉल संघाने आपल्याच महाविद्यालयात आयोजित केले. आपला मुलांचा संघ विजयी ठरला व मुलींचा संघ उपविजयी ठरला. श्री. यशवंत देसले, आर. आर. नेमाडे, गणेश महाजन, विकास महाजन, एस. पी. जोशी व जळगांव विभागाच्या संघाचे नेतृत्व श्री. यशवंत देसले यांनी केले.

पुणे विद्यापीठाच्या संघात श्री यशवंत देसले यांची निवड झाली.

आपल्या आंतर महाविद्यालयीन क्रिकेट सामने आपल्याच महाविद्यालयात आयोजित केले व आपला महाविद्यालयाचा संघ विजयी ठरला. संघ ११ वर्षानंतर पहिल्यांदाच विजयी ठरला. सर्वस्वी संजय थोरात, सी. एम. नांदेडकर, सुरेश देशमुख, गिरीश कुलकर्णी, चंद्रशेखर देशमुख, के. आर. शुक्ला, एस. पी. गुप्ते यांची जळगांव विभागाच्या संघात निवड झाली व पुणे विद्यापीठाच्या संघात आपल्या महाविद्यालयातील आतापर्यंत श्री. संजय थोरात यांची प्रथमच निवड झाली. चंद्रशेखर देशमुख, सी. एम नांदेडकर व अतुल तडवी यांचा प्रेक्षणीय खेळ झाला.

आंतर महाविद्यालयीन खो-खो संघाच्या मुलांच्या संघाने विजेते पद सतत दोन वर्ष कायम ठेवले. सर्वश्री दिलीप करे, विश्राम अभ्यंकर, ए ए. अंबिकर, एस. एस. मुळे, एस. पी. राणे, एस. के. घोडके यांची जळगांव विभागाच्या संघात निवड झाली व दिलीप करे यांनी जळगांव विभागाचे नेतृत्व केले.

आंतर महाविद्यालयीन वैयक्तिक स्पर्धेत श्री. किरण खडके व किशोर भोळे हे प्रथम आले. कु. मंगला नेवे ही २०० मी. मध्ये दुसरी आली. त्याच प्रमाणे श्री. किरण खडके, किशोर भोळे, कु. मंगला नेवे, सरोज उंबरकर, स्मिता कुरकुरे, एम. एम.जोशी यांची जळगांव विभागाच्या संघात निवड झाली. या वर्षी आंतर महाविद्यालयीन सामन्यात आठ विजेते पद, चार विजेतेपद व एक चॅंपियन शिप मिळविली. जळगांव विभागाच्या निरनिराळ्या संघातून एकूण १५ मुलींची व ४५ मुलांची अशी एकूण ६० खेळाडूंची निवड झाली. विद्यापीठाच्या संघातून चार खेळाडूंची संघात निवड झाली.

पारितोषिक वितरण समारंभ श्री डॉ. जी. डी. वेंडाळे यांच्या शुभ हस्ते व आमच्या महाविद्यालयातील प्राचार्य श्री. डी. एस. नेमाडे यांच्या हस्ते पार पडला.

जिमखान्याचा अवाढव्य पसारा सावरणेकरिता प्राचार्य नेमाडे सर, उपप्राचार्य श्री. महाजन, चिरमाडे व येवले, सर्व जिमखाना सेक्रेटरी व विद्यार्थी आणि सहकारी प्राध्यापक यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

| | |
|---|---|
| **मधुकर पाटील** | **नारायण खडके** |
| जनरल सेक्रेटरी, जिमखाना | क्रिडा-प्रमुख |

मु. जें. महाविद्यालय, जळगाव

---

# कला मंडळ
## वार्षिक अहवाल १९८५-८६

---

१९८५-८६ वर्षासाठी खालील प्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली.

| | |
|---|---|
| प्रा तेजपाल चौधरी | चेअरमन |
| प्रा. चारुदत्त गोखले | सभासद |
| प्रा. पी. एल. कोल्हे | ,, |
| प्रा. आर. बी. पाटील | ,, |
| प्रा. पी. व्हि. वाणी | ,, |
| प्रा. ए. जे. चौधरी | ,, |
| प्रा. एम. एस. झोपे | ,, |
| प्रा. (सौ.) एस. एस. पिंपरकर | सभासद |
| प्रा. (सौ) एल. एस. पाटील | ,, |
| श्री. संजय भोलाणे | विद्यार्थी प्रतिनिधी |

या वर्षी देखील कलामंडळाच्या कामाचा मोठ्या उत्साहाने प्रारंभ झाला. १९८४-८५ वर्षातील युवक महोत्सवाप्रसंगी आयोजित होणाऱ्या अन्तिम स्पर्धा काही अपरिहार्य कारणामुळे गेल्या वर्षी न घेता या वर्षी दि. २१ व २२ सप्टेंबर १९८५ रोजी पुणे विद्यापीठ कॅंम्पस मध्ये घेण्यात आल्या. या स्पर्धात जिल्हा पातळीवरील प्रथम क्रमांक मिळालेली 'बाळू जोशीला नक्की काय वाटतं?' ही एकांकिका सादर करण्यात आली. तसेच जिल्हा पातळीवरील 'समूहगान' व 'पोवाडा' स्पर्धात अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळालेल्या आपल्या महाविद्यालयातील संघांनी 'आता उठवू सारे रान' आणि 'एका नगराची कहाणी' ह्या रचना सादर केल्या.

एकांकिका संघाच्या यशाबद्दल यंदाचे वर्ष ही उल्लेखनीय ठरले. या वर्षी तीन एकांकिका बसविण्यात आल्या. त्या पैकी 'पानी गये न उबरे' या हिंदी एकांकिकेने 'मानस सांस्कृतिक व्यासपीठ' धुळे यांच्या तर्फे आयोजित केलेल्या खुल्या एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या स्पर्धेत चन्द्रशेखर त्रिपाठी यांना सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक ही मिळाले. वैयक्तिक अभिनयाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कु. आरती बझे यांनी जिंकले. शफी पटेल यांना अभिनय नैपुण्याचे उत्तेजनार्थ पारितोषिक ही मिळाले. नतर 'पानी गये न उबरे' या एकांकिकेस संघवी ढाल एकांकिका स्पर्धेत ही प्रथम क्रमांक मिळाला. चन्द्रशेखर त्रिपाठी यांना सर्वोत्तम दिग्दर्शनाबद्दल 'कै. शेठ जगन्नाथ गणेशराम अग्रवाल नाट्य पदक' ही देण्यात आले. अभिनय नैपुण्याचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस या एकांकिकेतील कलावंत शफी पटेल यांना मिळाले.

हिंदी विभागाच्या रौप्य महोत्सव प्रसंगी पुणे विद्यापीठ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा पातळीवरील हिंदी एकांकिका स्पर्धेत सुद्धा 'पाणी गये न उबरे' ही एकांकिका प्रथम ठरून केंद्रीय

स्पर्धासाठी निवडण्यात आली. या एकांकिकेत चंद्रशेखर त्रिपाठी, शफी पटेल, संजय भोलाणे, नितीन केंकरे, शशिकांत गुप्ते, संदीप भिसे, जयप्रकाश चौबे हनीफ मुहम्मद, कु. आरती वझे, कु. अस्मिता देव व कु. खैरुन्निसा पटेल या कलावंतांनी भाग घेतला होता.

'काळा ग्रंथ' या एकांकिकेने 'संवाद मुक्त व्यासपीठ धुळे' यांच्या वतीने आयोजित झालेल्या एकांकिका स्पर्धेत सांघिक प्रथम, सर्वोत्तम प्रायोगिक एकांकिका, सर्वोत्तम दिग्दर्शने ( कु संगीता सोमण व संजय भोलाणे ) अभिनय-नैपुण्य प्रथम क्रमांक ( शफी पटेल ) उत्तेजनार्थ ( संदिप भिसे ) अशी एकूण सहा पारितोषिके जिकून कौतुकास्पद विक्रम केला. 'काळा ग्रंथ' या एकांकिकेस 'एक्टर्स क्लब' अमळनेर यांच्या तर्फे घेण्यात आलेल्या खुल्या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला. दिग्दर्शनाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस कु. संगीता सोमण व संजय भोलाणे यांना मिळाले. या एकांकिकेत पुढील कलावंतांनी भाग घेतला — चंद्रशेखर त्रिपाठी, संजय भोलाणे, किशोर शिंपी, दिलीप शिंपी, चंद्रशेखर कुलकर्णी, मनोज जोशी, प्रशांत देशपांडे, अतुल देशपांडे, शैलेश मुळे, उमेश कोतवाल, संजय सोनवणे, शरद भोलाणे, शफी पटेल, देवांग दोशी, नितीन अस्मार, नितीन केंकरे, शशिकांत गुप्ते, संदिप भिसे, कु. संगीता सोमण, कु. अस्मिता देव, कु. अनघा आठवले व कु. खैरुन्निसा पटेल. गीत-संगीत नितीन केंकरे, वेशभूषा व नेपथ्य शिंपी बंधू आणि दिग्दर्शन कु. संगीता सोमण व संजय भोलाणे यांचे होते.

आपल्या महाविद्यालयातील 'जीवशास्त्र विभाग' यांच्या सौजन्याने बसविण्यात आलेल्या 'झेंडे पाटील महाविद्यालयात गंगू अंबू विठा' ही एकांकिका 'लोकहितवादी मंडळ, जामनेर' यांच्या तर्फे आयोजित झालेल्या आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत तृतीय पारितोषिक मिळवून यशस्वी ठरली. या एकांकिकेत नीलकंठेश्वर घनराळे, शब्बीर दहिवेलवाला, सचिन अमलकर, नरेन्द्र तोरवणे, मछिंद्र पठारे, शत्रुघ्न पाटोळे, रमेश आदंकी, शशिकांत सगरे, प्रमोद चौधरी, देविदास महाजन, मोतीलाल खैरनार, माणिक वाघ, विलास बोरोले, कु. मंगला नेवे. आणि कु. मंगला जोशी या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भाग घेतला होता.

नरेन्द्र तोरवणे 'मानस' धुळे तर्फे आयोजित कथाकथन स्पर्धेत द्वितीय तसेच 'उत्सव-८६' स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिके मिळवून यशस्वी ठरले. त्यांची स्व-रचित 'बळी' ही कथा हुंडा समस्येवर आधारित होती.

'राष्ट्रभाषा प्रचार सभा, पुणे' यांच्या वतीने धुळे येथे आयोजित 'हिंदी-पद-गीयन गायन' स्पर्धेत कु. संजीवनी पाठक तृतीय क्रमांक मिळवून यशस्वी झाल्या. शिवाय आपल्या महाविद्यालयातील गायक कलावंत नितीन केंकरे, संदीप भिसे, शेख मुहम्मद, कु. साधना पटवर्धन, कु. संजीवनी पाठक, कु. विनया साठे, कु. लक्ष्मी कुलकर्णी आणि आपल्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थी राम देशपांडे यांनी 'राष्ट्रीय एकात्मता शिबिरा' चे उद्घाटन आणि समारोप समारंभाच्या वेळी, खानदेश गीत, स्वागत गीत व सारे जहाँ से अच्छा' इ. गीत सादर केले. ह्या गीतांना श्रोत्यांची तसेच शिबीरार्थ्यांची चांगली दाद मिळाली. ह्या गीतांमध्ये कु शुभांगी रावेरकर, हेमन्त सपकाळे, सच्चानंद जोशी व विनय नेवे यांची उत्कृष्ठ साथ लाभली.

कलामंडळाच्या विद्यमाने जैन करंडक व संघवी ढाल एकांकिका स्पर्धा सालाबाद प्रमाणे आयोजित करण्यात आल्या. शिवाय या वर्षी पुणे विद्यापीठ-हिंदी विभागाच्या रौप्य महोत्सवाप्रसंगी हिंदी एकांकिका स्पर्धा ही घेण्यात आली ह्या स्पर्धांना स्पर्धक संघाचा चांगला प्रतिसाद मिळाला.

आपल्या विद्यार्थ्यांना नाट्य तंत्राची शास्त्रीय समज व्हावी म्हणून पुणे विद्यापीठ यांच्या तर्फे आयोजित 'नाट्य प्रशिक्षण शिबीरा' त भाग घेण्यासाठी धनंजय राजहंस यांना पाठविण्यात आले होते. पुढील वर्षांमध्ये त्यांच्या अनुभवाचा लाभ अन्य कलावंतांना मिळेल अशी अपेक्षा.

विविध कार्यक्रमांसाठी मा. प्राचार्य डी. एस. नेमाडे, उपप्राचार्य डी. एच. महाजन, उपप्राचार्य

## दत्तक ग्राम तुरखेडे–

या वर्षीचे दत्तक खेडे तुरखेडे येथे वर्षभर कार्यक्रम आयोजन करण्यात आले. प्रथम गावाचे सर्वेक्षण करुन घेतले. गावातील काही घरांमध्ये निर्धूर चुली व शोष खड्डे यांचे प्रात्यक्षिक करून दाखविले. मलेरिया निर्मूलन योजना, कुष्ठरोग निवारण योजना इ. आरोग्य संबंधातील योजनांचा विद्यार्थ्यांमार्फत प्रचार करण्यात आला. कुष्ठरोग निवारण विभाग, जळगांव येथील मान्यवर डॉ भागवत महाजन यांनी सुबोध रित्या स्लाईड द्वारा नागरिकांना कुष्ठरोगाविषयी माहिती दिली. शेतकी खात्यामार्फत शेतकी अधिकाऱ्यांनी शेतीविषयक माहिती दिली. सामाजिक वनीकरणातर्फे उपसंचालक अष्टुनकर यानी वृक्षारोपणाचे व वृक्षसंवर्धनाचे महत्व पटवून दिले. सकस आहार योजनेत प्रात्यक्षिक दाखवून स्त्रियांना त्यांना उपलब्ध असलेल्या स्वस्त भाज्या आणि कडधान्ये वापरून पोषक आहार कसा राबविता येईल, याबाबत तज्ञांनी मार्गदर्शन केले.

## सहकार प्रशिक्षण शिबीर–

या वर्षी मु. जे. महाविद्यालयात सहकार प्रशिक्षण महाविद्यालयातर्फे एक दिवसाचे शिबीर आयोजित करण्यात येऊन त्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनात नोकरीवर न अवलंबून राहता स्वतंत्र उद्योग कसा काढता येईल व यशस्वी जीवन वाटचाल कशी करता येईल, याची माहिती सदरहू शिबीरात दिली. स्वतंत्रपणे उद्योग करु इच्छिणाऱ्यांनी कोणते उद्योग सुरु करावेत, उद्योग धंद्यासाठी आर्थिक तरतूद कशी करावी. इथपासून तर अगदी यशस्वी उद्योगपती होईपर्यंतची माहिती देण्यात आली.

## वहातूक नियंत्रण प्रशिक्षण शिबीर–

जळगांव शहरातील वहातुक नियंत्रण खात्यामार्फत डिसेंबर महिन्यात १५ दिवसांचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले. त्यात शहरातील वेगवेगळ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा समावेश होता.

या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना प्रत्येक रस्त्यावर उभे करुन वहातुक नियंत्रण कसे करावे याचे शिक्षण देण्यात आले.

## पोलिओ-ट्रिपल योजना–

हरिविठ्ठल वाडी व खंडेराव वाडी मध्ये रोटरी क्लबच्या सौजन्याने पोलीओ ट्रिपलचा कार्यक्रम आखण्यात आला. त्याचा फायदा सुमारे १०० लहान मुलांना झाला.

## तुरखेडे येथील विशेष हिवाळी शिबीर–

या वर्षाचे विशेष हिवाळी शिबीर तुरखेडे, ता. जळगांव येथे घेण्यात आले. या शिबीरात विविध कार्यक्रम राबविण्यात आले. ग्रामीण विकास योजना म्हणून सांडपाण्याची व्यवस्था, धुरविरहीत चुली, प्राथमिक शाळा, क्रीडांगण भराव इ. उपयुक्त कार्यक्रम शिबीरात पूर्ण करण्यात आले. गावात कच्च्या गटारी खोदून व त्यानंतर ग्रामपंचायतने ताबडतोब पक्क्या गटारी बांधण्याचे काम हाती घेतले व शिबीराच्या काळातच पक्क्या गटारी पूर्ण केल्या. त्यामुळे गावात सांडपाण्याचा होणारा त्रास कमी झाला. हे शिबीर पूर्णपणे विद्यार्थ्यांनीच राबविले. त्यासाठी शिबीरार्थींची पाच व्यवस्थापकीय समित्यांमध्ये विभागणी करण्यात आली. आणि या समितीच्या कार्यात सुसुत्रता रहावी म्हणून समन्वय समिती तयार करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणाऱ्या त्यांच्या ठिकाणी विचार प्रकट करायला लावणाऱ्या आणि देशातील सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रवाहाची ओळख करुन देण्याचा अनेकविध विषयांवर चर्चा शिबीराच्या काळात झाली.

## राष्ट्रीय एकात्मता शिबीर :–

महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय एकात्मता शिबीर २ फेब्रूवारी ते ७ फेब्रुवारी १९८६ या काळात आयोजित करण्यात आले त्याचा सविस्तर अहवाल स्वतंत्र दिला आहे.

डॉ. एस. आर. चिरमाडे व उपप्राचार्य एम. के. येवले यांनी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन केले. त्याबद्दल त्यांचे आभारी आहोत. प्रा. म. मो. केळकर प्रा. मो. स. भावे, प्रा. ए. जी. कर्णिक, प्रा. राजा महाजन, प्रा. सुरेश जावळे, प्रा. शरद छापेकर प्रा. ए. बी. पाटील, प्रा श्रीरंग राजे, प्रा चौधे यांनी केलेल्या अमूल्य सहकार्याबद्दलही मंडळ त्यांचे आभारी आहे.

या शिवाय शहरातील विद्वान व कलावंत सर्वश्री सतीश देशमुख शशिकांत राजदेरकर, गोपाल अवटी, अनिल श्रीवास्तव, रमेश प्रीतमणि, प्रा. सौ एस. एम. जोशी व अनेक माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षकेतर वर्ग यांनी जे सहकार्य केले ते बहुमोल आहे. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**तेजपाल चौधरी**
चेअरमन
कला मंडळ, मु. जे. महाविद्यालय, जळगांव

# राष्ट्रीय सेवा योजना
## १९८५-८६

या वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कामाची सुरवात जुलै महिन्यापासून झाली. महाशय प्राचार्य डी. एस. नेमाडे यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. उद्घाटनप्रसंगी प्राचार्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टचे विद्यार्थ्यांना फारच सुबोधरीत्या समजावून दिले व बहुसंख्येने या योजनेत विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले.

### प्रबोधन-

राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना योजनेच्या उद्दिष्टांची पूर्ण माहिती होण्यासाठी १४ जुलै व २१ जुलै दोन दिवसांचे प्रबोधन सत्र घेण्यात आले. या सत्रात प्रा. व्हि. जे. चौधरी, प्रा बोंडे, प्रा एम. एस. राणे, प्रा. ए एस. भोळे यांनी व्याख्यानाद्वारे योजनेच्या विविध कल्पना दिली.

### महाविद्यालय प्रांगण विकास योजना-

चालू वर्षी विद्यापीठाने कळविल्यानुसार महाविद्यालयातील परिसर जास्तीत जास्त रम्य दिसावा यासाठी काही कार्यक्रम महाविद्यालयातच घेण्यात आले त्यात आवारातील साफसफाई, गाजर गवत निर्मूलन व आवार दुरुस्ती तसेच भव्य प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले वृक्षारोपणाचा कार्यक्रम विशेष करण्यात आला. आवारात अशोक वृक्षाची झाडे लावून त्याचे संगोपन करण्याची व्यवस्था केली. तसेच इतर अनेक जातीची झाडे आवारात लावण्यात आली. जुलै महिन्यातच महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागातर्फे वनमहोत्सव महाविद्यालयातच साजरा करण्यात आला त्यासाठी वृक्षदिंडी काढण्यात आली कार्यक्रमास जिल्हाधिकारी, जिल्हा वन अधिकारी, प्रसिद्धी अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, प्राचार्य नेमाडे इ अनेक मान्यवर व्यक्ती सहभागी होत्या

### रोपवाटिका -

या वर्षीचा अभिनव उपक्रम म्हणजे जळगांव जिल्हा सामाजिक वनीकरण विभागातर्फे महाविद्यालयात ६०,००० ची रोपवाटिका मंजूर करण्यात आली. या रोपवाटिकेत रोपे लावण्यापासून वाढविण्याचे काम 'कमवा व शिका' या योजनेखाली करण्यात आले त्यामुळे गरीब मुलांना शिक्षण घेत असतांना आर्थिक मदतही झाली तसेच महाविद्यालयालाही त्यापासून उत्पन्न मिळाले या उत्पन्नातून महाविद्यालयाला तारेचे १५०० फूट लांबीचे कुंपण करता आले. या रोपवाटिकेतून आसपासच्या प्लॉटमध्ये व शेतामध्ये रोपे लावणाऱ्यानी रोपे मोफत नेली.

या वर्षीचे योजनेचे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शहरातील अनेक मान्यवर व्यक्तींचे आम्हास सहकार्य व मार्गदर्शन लाभले तसेच विद्यापीठ पदाधिकाऱ्यांचे महाविद्यालयातील प्राध्यापकांचेही बहुमोल मार्गदर्शन मिळाले. त्या सर्वांचे आम्ही हार्दिक आभार मानतो.

| | |
|---|---|
| प्रा. व्ही. जे. चौधरी | प्रा. एम्. डी. बोंडे |
| प्रा. ए. एस. भोळे | प्रा. एस. एम. राणे |

राष्ट्रीय सेवा योजना मु. जे. महाविद्यालय जळगांव

# युवती सभा अहवाल
## १९८५-८६

उच्च शिक्षणाबरोबरच विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणांच्या आविष्काराला वाव मिळावा यासाठी युवती सभेने गतवर्षाप्रमाणे या वर्षीही विविध उपक्रम आयोजित केले.

### उद्घाटन -

दि. १६ ऑगस्ट १९८५ रोजी प्रा. स्वर्णलता भिशीकर ( ज्ञानप्रबोधिनी, पुणे ) यांच्या शुभहस्ते युवतीसभेचे उद्घाटन झाले. त्यांनी 'सौंदर्य आणि अभिरुचि' या विषयावर अत्यंत भावपूर्ण आणि विचार प्रवर्तक असे भाषण दिले. त्यानंतर प्राचार्य डी. एस. नेमाडे ह्यांनी 'युवती सभेची उद्दिष्टचे' या विषयावर आपले विचार व्यक्त केले.

### समूहनाट्य -

दि. १९ ऑगस्ट १९८५ रोजी औरंगाबादच्या 'जिगिषा' नाट्य संस्थेतर्फे 'स्त्री' या समूहनाट्याचा प्रयोग सादर करण्यात आला. 'स्त्री' जीवनातील विविध समस्यांचे हृदयस्पर्शी चित्रण हे या नाटकाचे वैशिष्टच होते.

### कराटे प्रात्यक्षिक -

दि. २ सप्टेंबर १९८५ रोजी जळगांव शहरातील कराटेपटू युवकांनी कराटेविषयी उपयुक्त माहिती देऊन काही सुंदर प्रात्यक्षिकेही करून दाखवली.

### कथाकथन -

दि. ४ सप्टेंबर १९८५ रोजी 'कथाकथन-स्पर्धा' आयोजित करण्यांत आली. ह्या स्पर्धेत २० विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. त्यांत खालील विद्यार्थिनींना बक्षिसे मिळाली.

प्रथम क्रमांक – कु. चंदा जोशी
द्वितीय क्रमांक – कु. नीता जगताप
तृतीय क्रमांक – कु. निवेदिता नेरकर
चतुर्थ क्रमांक – कु. उज्वला पाटील
उत्तेजनार्थ – कु. वृंदा मोहरील

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. ए. एस. भोळे आणि प्रा. कु. तळेले ह्यांना नियुक्त करण्यात आले होते

### नाट्यगीत स्पर्धा -

दि. ११ सप्टेंबरला शास्त्रीय रागांवर आधारित नाट्यगीत स्पर्धेचा अभिनव कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यांत खालील विद्यार्थिनी यशस्वी झाल्या.

प्रथम क्रमांक – कु. रेवती ठिपसे
द्वितीय क्रमांक – कु. लक्ष्मी कुलकर्णी

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सौ. करपे, सौ. कोलगीकर, सौ गोखले ह्यांना नियुक्त करण्यात आले होते.

## एकांकिका –

युवतीसभेने या वर्षीच्या स्नेहसंमेलनांत 'पुन्हा एकदा एकच प्याला' ही श्री. हरिहर लिमये (पुणे) लिखित एकांकिका अत्यंत प्रभावीपणे सादर केली. त्यांत कु. अस्मिता पाटील (तृतीय वर्ष विज्ञान) या विद्यार्थिनीला महाविद्यालयातर्फे अभिनयाचे द्वितीय पारितोषिक देण्यात आले.

## सहल–

विविध प्रेक्षणीय स्थळे दाखवून विद्यार्थिनींचा उत्साह द्विगुणीत करावा या उद्देशाने युवती सभेने या वर्षी दोन सहली आयोजित केल्या. प्रथम सत्रांत 'पाटणादेवी' व द्वितीय सत्रांत ओंकारेश्वर, इन्दौर, उज्जैन, देवास, मांडवगड ही ठिकाणे दाखवण्यात आली.

## पारितोषिक वितरण समारोह आणि समापन –

दि १।४।८६ रोजी प्रा. सौ. खानोलकर (शारदा महाविद्यालय जळगांव) यांच्या हस्ते विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थिनींना पारितोषिके देण्यांत आली. यावेळी प्रा. सौ. खानोलकर ह्यांनी युवतीसभेच्या कार्यांची प्रशंसा करून, भावी जीवन यशस्वी कसे करता येईल याविषयी विद्यार्थिनींना सुयोग्य मार्गदर्शन केले. त्यानंतर समारोपाच्या भाषणांत प्राचार्य डी. एस. नेमाडे ह्यानी विद्यार्थिनींना समुन्नत व्यक्तिमत्व कसे घडवता येईल यासंबंधी मार्गदर्शन करून परिक्षेत सुयश चिन्तिले.

## आभार –

वरील कार्यक्रमासाठी प्राचार्य डि. एस. नेमाडे, उपप्राचार्य डि एच. महाजन, उपप्राचार्य चिरमाडे, प्रा. हुपरीकर, प्रा भावे, प्रा. शिरसीकर, प्रा राणे, प्रा. भोळे प्रा. ए. पी. चौधरी, प्रा. अत्तरदे, प्रा. सौ. जावळे, प्रा. कु. तळेले यांचे सतत सहकार्य लाभले. त्याबरोबरच महाविद्यालयाच्या कर्मचारी वर्गानेही सहकार्य दिले, म्हणून युवतीसभा सर्वांची आभारी आहे.

**डॉ. सौ. वासंती साळवेकर**
( अध्यक्षा युवती सभा )

| | |
|---|---|
| प्रा. सौ. गोखले | प्रा. सौ. अत्तरदे |
| प्रा. सौ. पाटील | प्रा. सौ. तळेले |
| प्रा. सौ वाणी | प्रा. सौ. नारखेडे |

# केमिस्ट्री असोसिएशन अहवाल
## १९८५–८६

या वर्षी सुरुवातीला असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. निवडणुकीस उमेदवार मोठ्या संख्येने रिंगणात उतरले होते. त्यांची वर्गनिहाय निवडणूक होऊन खालील प्रतिनिधी केमिस्ट्री असोसिएशनच्या कार्यकारिणीवर निवडून आले.

जनरल सेक्रेटरी – श्री. सुनिल डी. इंगळे
( टी. वाय. बी. एस.सी )

वर्ग प्रतिनिधी – १) श्री. युवराज पी पाटील
( टी वाय बी. एस सी. )
२) श्री. विजय पी पाटील
( एस. वाय. बी. एस.सी )
( ए डिव्हिजन )
३) श्री. राजीव व्ही सरोदे
( एस. वाय बी एस सी )
( बी डिव्हिजन )
४) श्री. अनिल डी इंगळे
( एफ्. वाय बी. एस.सी. )
( ए डिव्हिजन )
५) श्री. राजू वाय. झोपे
एफ्. वाय. बी. एस.सी. )
( बी डिव्हिजन )

विद्यार्थिनी प्रतिनिधी – कु. मिनाक्षी ए. नेहते
( टी. वाय. बी. एस सी. )

असोसिएशनच्या कार्यक्रमाची सुरुवात उद्घाटन सोहळयाने झाली. उद्घाटनांसाठी पाहुणे श्री के आर. सोनवणे "डिव्हीजनल इंजिनिअर ऑफ टेलिग्राफ" यांचे हस्ते झाले, त्यावेळी उद्घाटन भाषणात त्यांनी शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना तार व टेलिफोन विभागात चांगल्या नोकऱ्यांचे मोठे दालन उघडे असल्याचे सांगून, मोठ्या संख्येने त्या क्षेत्रात शिरण्याचे आव्हान केले. समारंभाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डी. एस. नेमाडे यांनी भूषविले त्यांनीदेखील विद्यार्थ्यांना उद्बोधक असे व्याख्यान दिले

दुसऱ्या सत्रात असोसिएशनचेतर्फे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी–विद्यार्थिनी मिळून एक दिवसाची पद्मालय ह्या ऐतिहासिक ठिकाणी सहल आयोजित केली होती. सहलीस विशेष म्हणजे सर्वांनी म्हसावद स्टेशनहून पायीच पद्मालयचा परतीचा प्रवास आनंदात पार पाडला.

पुणे विद्यापीठातील ज्येष्ठ प्रा. डॉ. एस्. एफ् पाटील रसायनशास्त्र विभाग, यांचे वरच्या वर्गातील मुलांसाठी दोन दिवस अभ्यासक्रमावर आधारित व्याख्याने रसायनशास्त्र विभागात आयोजित केले. त्यामुळ विद्यार्थी वर्गांत नवचैतन्य व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

शेवटचा असोसिएशनचा कार्यक्रम गॅदरींगवजा श्री. काळे यांचे कांनळदे रस्त्यावरील मळयात संपन्न झाला, विद्यार्थी-विद्यार्थिनी व सर्व प्राध्यापक मंडळी-सह उपप्राचार्य व कर्मचारी यांनी भाग घेतला. सर्व मंडळीसह वरणबट्टीचा जेवणाचा कार्यक्रम आटोपला. आमच्या असोसिएशनचा आर. आर. चौधरी ( टी. वाय. बी एस.सी ) चा विद्यार्थी या वर्षीचा महाविद्यालयात "बेस्ट स्टुडंट" म्हणून निवड झाली. ही अभिमानाची बाब आहे

असोसिएशनच्या उपक्रमांना प्राचार्य, उपप्राचार्य, स्नेही, प्राध्यापक व जनरल सेक्रेटरी तसेच वर्गप्रतिनिधी यांनी अमोल सहकार्य दिले. या सर्वांचे मी रसायनशास्त्र मंडळातर्फे मनःपूर्वक आभार मानतो.

तसेच प्रत्यक्षाप्रत्यक्ष मिळालेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञ आहोत.

| | |
|---|---|
| श्री. सुनील डी इंगळे | प्रा. डब्ल्यू एस्. पाटील |
| जनरल सेक्रेटरी | चेअरमन |

केमिस्ट्री असोसिएशन

# जीवशास्त्र मंडळ
## १९८५–८६

या वर्षी "जीवशास्त्र मंडळाचे" उदघाटन माननीय प्राचार्य डी. एस नेमाडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. उद्घाटन भाषणात त्यांनी "नवीन शिक्षण पद्धती" या विषयावर विद्यार्थ्यांशी चर्चा केली. विद्यार्थ्यांनी या चर्चेत अत्यंत उत्साहाने भाग घेतला, व प्राचार्य साहेबांकडून येऊ घातलेली नवीन शिक्षण प्रणाली समजावून घेतली.

जीवशास्त्र विभागात नव्याने नेमणूक झालेल्या डॉ. आर. टी. महाजन आणि डॉ. एस. एम. चौबे यांचे दि. १० सप्टेंबर १९८५ रोजी जीवशास्त्र मंडळातर्फे स्वागत करुन विद्यार्थ्यांना व इतर स्टाफ सभासदांना त्यांचे परिचय करुन देण्यात आले त्या कार्यक्रमात उभयतांनीं स्वतः केलेल्या संशोधनांची विद्यार्थ्यांना माहिती दिली याच दिवशी प्रा. एस. एम. जावळे यांनी पुणे विद्यापिठाला याच वर्षी एम फिल करीतासादर केलेल्या संशोधन प्रबंधाची माहिती विद्यार्थी व जीवशास्त्र विभागाच्या स्टाफ मेंबर्सना करुन दिली.

जीवशास्त्र मंडळाने डॉ. व्ही. टी पाटील यांचे "एक्यूपंक्चर थेअरी आणि प्रॅक्टीस" या विषयावरचे भाषण प्रात्यक्षिका सहित दि ४ जानेवारी १९८६ रोजी आयोजित केले होते. त्यांनी एक्यूपंक्चर बद्दल सांगितलेल्या माहितीने व प्रात्येक्षिकांनी मुलांना अत्यंत प्रभावित केले.

अजिंठा परिसरातील वनस्पती व प्राणी अभ्यासण्या करीता जीवशास्त्र मंडळाची सहल दि २६ जानेवारी १९८६ रविवार रोजी गेली होती.

जामनेर येथे दि ९ फेब्रुवारी १९८६ रोजी तेथील लोकहित वादी मंडळा तर्फे आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत जीवशास्त्र मंडळाने सादर केलेल्या "झेंडे पाटील महाविद्यालयात गंगू अंबू विठा" या वसंत कानिटकर लिखित नाटीकेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले, त्याच प्रमाणे याच नाटिकेस कॉलेज गॅदरिंग मध्ये द्वितीय क्रमांक मिळाला व श्री. नरेन्द्र तोरवणे व नीलकंठ घनराळे यांना पुरुष अभिनयाचे प्रथम व द्वितीय पारितोषिक मिळाले. तसेच "सहमंच" जळगांव या संस्थेने आयोजित केलेल्या एकांकिका महोत्सवात या नाटिकेचे चांगले स्वागत झाले.

जीवशास्त्र मंडळातर्फे दि २० फेब्रुवारी १९८६ रोजी डॉ एन व्ही. घांडे यांनी "रंग किरण चिकित्सेवर" उद्बोधक भाषण दिले.

दि. १६ मार्च १९८६ रोजी जोरदार तयारीने होऊ घातलेला "बाये डे" काही अपरिहार्य कारणांमुळे रद्द करण्यात आला.

दि. २८ मार्च १९८६ रोजी जीवशास्त्र मंडळाच्या कार्यकारिणीची समारोप सभा झाली. त्याप्रसंगी पुढील वर्षी करावयाच्या कार्यांचा आढावा घेतला गेला. त्यात सर्वानुमते असे ठरले की येत्या दिवाळीच्या सुट्टीत मंडळातर्फे दक्षिण भारतातील मद्रास, कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, उटकमंड, म्हैसूर, बंगलोर, पुणे अशी अभ्यास सहल नेण्याचे ठरले. तसेच पुढील वर्षासाठी काही संशोधन प्रकल्प हाती घेण्याचे व जीवशास्त्रीय प्रश्न मंजूषा सुरू करण्याचे जीवशास्त्र मंडळाने ठरविले आहे.

जीवशास्त्र मंडळाच्या सर्व सभासदांनी या शैक्षणिक वर्षात आम्हास केलेल्या हार्दिक सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

| | |
|---|---|
| सुभाष चौधरी | डॉ. सुधीन्द्र एम. चौबे |
| जनरल सेक्रेटरी | चेअरमन |
| जीवशास्त्र मंडळ | जीवशास्त्र मंडळ |
| मु. जे. कॉलेज जळगांव | मु जे. कॉलेज जळगांव |

## मानसशास्त्र विभाग — अहवाल

### १९८५–८६

आपल्या महाविद्यालयामध्ये मानसशास्त्र हा विषय ११ वी कला या वर्गापासून ते तृतीय वर्ष कला या वर्गापर्यंत शिकविण्यात येतो. मागील वर्षापासून विशेष मानसशास्त्र हा विषय द्वितीय वर्ष कला या वर्गासाठी सुरू करण्यात आला व या वर्षापासून तृतीय वर्ष कला या वर्गासाठी सुरू करण्यात आला आहे. प्रात्यक्षिकासाठी आवश्यक अशी अद्ययावत प्रयोगशाळा मुख्य इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर उभारण्यात आली आहे. प्रयोगशाळेसाठी लागणारे सर्व उपकरणे, व बुद्धीमापन अभिक्षमता मापन इ. मनोमापन, चाचण्या आनंद एजन्सीज् पुणे, नॅशनल सॉयकॉलाजीकल कॉर्पोरेशन– आग्रा, बायो-व्हिज्यूअल प्रॉडक्टस् हैद्राबाद यांच्याकडून खरेदी करण्यात आल्या आहेत. मानसशास्त्र हा मानवी जीवनाशी संबंधित विषय असल्याने विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे विभागाला प्रतिसाद दिला आहे. विभागामध्ये या वर्षी प्रा. के. क्र. जोशी यांची नेमणूक करण्यात आली.

अभ्यासक्रमाशिवाय विद्यार्थ्यांना विषयाचे अवांतर ज्ञान व्हावे या दृष्टीने – डॉ. आर. आर. बोरुडे मानसशास्त्र विभाग प्रमुख, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे "वर्तन–परिवर्तन तंत्र" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह व जिज्ञासा वृत्ती पाहून डॉ बोरुडेंनी विद्यार्थ्यांविषयी प्रशंसोद्‌गार काढले तसेच अद्ययावत प्रयोगशाळा पाहून विभागाची मुक्त कंठाने स्तुती केली.

अमेरिकेतील कॉर्नियल विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाच्या प्रा. ज्योती खरे, पुणे विद्यापीठ अभ्यासक्रम मंडळाचे सदस्य प्रा. ए. जी चिटणीस यांनी विभागाला भेट देऊन विभागाविषयी समाधान व्यक्त केले.

विभागाची विशेष व अभिमानाची बाब म्हणजे १९८५ मध्ये झालेल्या सत्र ३, परिक्षेमध्ये महाविद्यालयीन शिष्यवृत्तीच्या गुणवत्ता यादीत १ ला व २ रा क्रमांक मानसशास्त्र विभागाच्या दोन विद्यार्थ्यांना मिळाला आहे. कु आरती वझे १५० रु. व जयप्रकाश चौबे १२५ रु. अशा शिष्यवृत्त्या मिळवून विभागाची यशस्वीपूर्ण सुरुवात झाली आहे. वर्षाच्या शेवटी माननीय प्राचार्य डी. एस. नेमाडे यांच्या अध्यक्षतेखाली तृतीय वर्ष कला विद्यार्थ्यांना विभागातर्फे भावपूर्ण निरोप देण्यात आला.

वर्षभरात प्राचार्यांनी विभागाला अनेक वेळा भेटी दिल्यात. व त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळेच मानसशास्त्र विभाग यशस्वीपणे कार्यरत झाला आहे, त्यासाठी विभागातर्फे आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोत. विभागाची सुरू असलेली यशस्वी वाटचाल पुढेही अधिकाधिक जोमाने फोफावत जाईल असे आम्ही विभागाच्या वतीने प्राचार्यांना आश्वासन देतो.

**प्रा. एस. एस. राणे**
प्रमुख
मानसशास्त्र विभाग,
मु. जे. महाविद्यालय, जळगांव

## बजमे उर्दू अदब— वार्षिक अहवाल

### १९८५–८६

उर्दू साहित्य आणि वाङ्मयाबद्दलची विद्यार्थ्यांची अभिरूची अधिकाधिक संपन्न करता यावी या दृष्टीकोनातून 'बज्मे उर्दू अदब' मंडळाची स्थापना या वर्षापासून करण्यात आली.

बज्में उर्दू अदब मंडळाचे उद्घाटन दिनांक १६।९।१९८५ रोजी माननीय तेजकिरण दर्डा (व्यवस्थापक दैनिक लोकमत जळगांव) यांचे शुभहस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रा. श्री. डी. एस. नेमाडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून साप्ताहिक जळगांव समाचारचे संपादक श्री. भागवतराव चौधरी हजर होते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना साहित्य आणि वाङ्मयाची अभिरूची निर्माण होऊन त्यांच्यातील साहित्यविषयक कलागुणांना उत्तेजन देण्याच्या हेतूने 'बज्में उर्दू अदब' मार्फत व्याख्याने, काव्यवाचन, शबेगजल, कथाकथन आणि मुशायरा यासारखे विविध कार्यक्रम घेण्याचे ठरविण्यात आले होते. त्यापैकी या वर्षी 'बज्मे उर्दू अदब' तर्फे शबेगझलचा बहारदार व मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम बालगंधर्व खुले नाट्य गृहात दि ४–१–८६ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला सर्व भाषेच्या विद्यार्थ्यांनी, पालक वर्गाने आणि शहराच्या प्रतिष्ठित मंडळींनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष — श्री. काझी अख्तर अली हे होते, या कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय श्री. मधुकरराव किमतकर (चेअरमन एम एस एस आय. डी. सी.) यांचे हस्ते झाले.

बोचणारी थंडी असतांनासुद्धा कार्यक्रमास पाच हजारावर रसिक प्रेक्षक चार-पाच तास या कार्यक्रमास हजर राहून शबेगजलचा आनंद लुटला. एम. जे. कॉलेजचे उपप्राचार्य श्री. डी एस. महाजन यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. या प्रसंगी एफ. वाय. बी. ए., एस वाय बी ए. आणि टी. वाय. बी. ए या परीक्षेत उर्दू विषयात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बज्मे उर्दू अदब तर्फे बक्षीसे देण्यात आली. तसेच कॉलेजमध्ये शिकणाऱ्या गरीब, होतकरू मुस्लीम विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची पुस्तके आणि परीक्षा फी अशी आर्थिक मदत बज्मे उर्दूतर्फे देण्यात आली.

शकील शे. मुसा
विद्यार्थी प्रतिनिधी

प्रा. श्री. अकबर रहमानी
चेअरमन
बज्मे उर्दू अदब

# एन. सी. सी. अहवाल
## १९८५–८६

दरवर्षाप्रमाणे या वर्षीही ३७२ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एन. सी. सी. चे ट्रेनिंग पूर्ण केले.

वृक्षारोपण रक्तदान व इतर सामाजिक उपक्रमात नेहमीप्रमाणेच महाविद्यालयातील एन. सी. सी. च्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणावर सक्रीय भाग घेतला.

यंदाचे विद्यार्थ्यांचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर वरणगाव येथे तर विद्यार्थिनींचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर यवतमाळ येथे पार पडले.

या वर्षी पुढीलप्रमाणे वेगवेगळ्या कॅम्पस्मध्ये सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी प्राविण्य दाखविले. कुलू मनाली ( हिमाचल प्रदेश ) येथे आयोजित कॅम्पमध्ये सार्जंट संजय शर्मा याने उत्कृष्ट प्राविण्य मिळविले. कामठी येथील आर्मी ॲटॅचमेंट कॅम्पमध्य संतोष जाधव, विनायक चौगुले, चंद्रकात वाणी चंद्रकांत महाजन किरण नेवे भाऊराव इंगळे यांनी सहभाग घेतला.

सार्जंट विनायक चौगुले याने उत्तरकाशी ( उत्तर प्रदेश ) येथे गिर्यारोहण शिबीरात उत्कृष्ट कामगिरी बजावली.

युवक महोत्सवानिमित्त महाविद्यालयीन एन. सी. सी. चे CSU/o जयराज छपरीबंद, सतिश जुनागडे, संतोष जाधव व प्रमोद धानापुते हे विद्यार्थी जळगांव ते अहमदाबाद असा सायकल प्रवास केला.

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी प्राचार्य नेमाडे यांच्या हस्ते ध्वजारोहन समारंभ पार पडला.

रोटरी क्लब जळगांव यांच्या सहकार्याने जळगाव ते अजिंठा लेणी या सायकल रॅलीत महाविद्यालयातील २६ कॅडेटस्नी भाग घेतला

विद्यार्थिनींचा ट्रेकिंग कॅम्प उटी या निसर्गरम्य ठिकाणी संपन्न झाला. यात U/o मीना पटेल SGT मंजूषा देशपांडे, किरण अरोरा योगिनी सरोदे मेहेंदळे CPL स्वाती कुलकर्णी व CPI उज्वला कोतवाल या विद्यार्थीनी सहभागी झाल्या. सार्जंट संघमित्रा बिऱ्हाडे हिने उत्तरकाशी येथील शिबीरात प्राविण्य मिळविले. ‘ समाजसेवा ’ या कार्यक्रमांतर्गत मेहरूण येथे विद्यार्थिनींनी श्रमदान व रक्तदान केले.

वहातुकीचे ट्रेनिंग घेऊन वहातूक पंधरवाड्यात महाविद्यालयाच्या एन. सी. सी. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणावर भागघेऊन या संबंधात शहर वहातूक पोलिसांना वेगवेगळ्या ट्राफिक पॉईंटस्‌वर मदत केली.

२६ जानेवारी १९८६ रोजी प्राचार्य नेमाडे यांनी ध्वजारोहण करून एन. सी. सी. च्या कॅडेटस् कडून मानवंदना स्विकारली परेडचचे संचालन S/Uo जयराज छपरीबंद याने केले. प्राचार्यांच्या हस्ते खालील विद्यार्थ्यांना मेडल्स दिलेत.

बेस्ट सायकल एक्स्पीडीशन कमांडर S/Uo जयराज छपरीबंद बेस्ट सिनियर S/Uo सतीष जुनागडे मॅपरिडींग सुहास झांबरे बेस्ट कॅडेट पराग बोरोले, बेस्ट रॅक होल्डर SGT जितेंद्र भावसार फर्स्ट इन क्रास कंट्री SGT भाऊराव इंगळे फर्स्ट इन फायरिंग CPL राजेंद्र चौधरी बेस्ट सर्व्हिस इन एन. सी. सी. CPL चंद्रकांत महाजन.

विद्यार्थिनीमध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या खालील विद्यार्थिनींना प्राचार्यांच्या हस्ते मेडल्स देण्यात आलेत. CPL वंदना लढ्ढा CPL स्वाती कुलकर्णी CPL सुनिता बाहेकर व Cadet छाया पाटील, एन. सी. सी. चा ‘ B ’ सर्टिफिकेट परिक्षेचा निकाल नेहमीप्रमाणे १००% लागला व ‘ C ’ सर्टिफिकेट परिक्षेचा निकालही चांगला लागला

प्रा. आर. आर. भालसिंग यांनी एन. सी. सी. चे प्रशिक्षण पूर्ण केले व आता ते एन. सी. सी ऑफिसर म्हणून काम पाहू लागले आहे.

सर्व विभाग प्रमुख व सहकारी प्राध्यापक यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहोत.

लेफ्टनंट एस. एम. रडे
लेफ्टनंट सौ. एम. एम. जावळे
व सर्व अंडर ऑफिसर्सकरिता.

# वसतिगृह अहवाल
## १९८५–८६

महाविद्यालयातील वसतिगृहात २५० विद्यार्थी व ८५ विद्यार्थिनी आहेत, त्यापैकी पदव्यत्तर शिक्षण घेणाऱ्यांची संख्या ४१ आहे. सर्वच प्रथम श्रेणीचे मानकरी आहेत. विशेषत: या वर्षी वसतिगृहातील बी. एड् च्या सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींनी प्रथमश्रेणी प्राप्त केली आहे. परपरेनुसार वसतिगृहातील विद्यार्थ्यांद्वारे भोजन व्यवस्था क्लब पद्धतीने चालविली जाते.

विद्यार्थ्यांच्या विकासासाठी वसतिगृहात निरनिराळे सास्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यात अनेक विचारवंतांचे मार्गदर्शन लाभले. या वर्षी वसतिगृहात डॉ. व्ही. जी भिडे, ( कुलगुरु पुणे विद्यापीठ ), उपकुलगुरू डॉ. सत्यरजन साठे, पुणे विद्यापीठ विज्ञानशाखा अधिष्ठाता श्री. एन्. सी. जोशी, शिक्षण अधिष्ठात्री सौ. मंदाकिनी जोशी, मानसनिती समाजशास्त्र अधिष्ठाता डॉ. प्राचार्य साळवेकर, पुणे विद्यापीठ वाणिज्य शाखा अधिष्ठाता डॉ. मुकुंद अभ्यंकर, डॉ. मुकुंद महाजन ( संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ पुणे विद्यापीठ ) डॉ भालचंद्र फडके (संचालक प्रौढ शिक्षण योजना पुणे विद्यापीठ) डॉ. भोगीशयन (कुलगुरु शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर) यांनी भेटी दिल्या.

वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या “ झेंडे पाटील महाविद्यालयात गंगू, अंबू, विठा ” या एकांकिकेस आंतर महाविद्यालयीन एकांकीका स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

वसतिगृहाचे आवारात अखिल भारतीय पातळीवर आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा

योजनेच्या शिबीरात ४०० विद्यार्थी-विद्यार्थिनींची सोय करण्यात आली. यावर्षी दुर्दैवाने वसतिगृहातील सेवक कृष्णा वाणीचे आकस्मिक निधन झाले. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !

मुलांचे वसतिगृहात प्रा. एस्. एस्. राणे, प्रा. आर. बी चौधरी व प्रा. जोशी यानी वार्डनची जबाबदारी सांभाळून सहकार्य केले. मुलींच्या वसतिगृहात वार्डन कु. प्रा. विमल तळेले यांचे सहकार्य लाभले. श्री. कोपरकर यांनी 'मेस मॅनेजर'चे काम उत्कृष्ठरित्या सांभाळले.

वसतिगृहाचे कार्यात प्राचार्य डी. एस् नेमाडे उपप्राचार्य डी. एच् महाजन, डॉ एम. आर. चिरमाडे, व प्रा. एम् के. येवले यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच अनेक मान्यवर व्यक्तींनी वेळोवेळी सहकार्य दिले त्याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोत,

प्रा. सौ. मालती जावळे
प्रमुख, मुलींचे वसतिगृह

प्रा. ए. पी. चौधरी
प्रमुख, मुलांचे वसतिगृह


**Udaya Metal Works**

ALLUMNIUM, BRASS GUNMETAL ETC.

Turning asper sample & C. I. Casting
Gas & Elect. Welding

S. C. Dalal
☎ : 5449
Shivaji Nagar, JALGAON
( Near Police Chouky )










अजिंठा संपादक मंडळ १९८५-८६

बसलेले डावीकडून – (१) प्रा. सौ. गोखले (२) प्रा. प्र. ना. हुपरीकर (३) उपप्राचार्य मु. के. येवले (४) प्राचार्य द. सा. नेमाडे (५) उपप्राचार्य दि. ह. महाजन (६) उपप्राचार्य मु. रा. चिरमाडे (७) प्रा. डॉ. सो. साळवेकर

उभे डावीकडून – (१) प्रा. एस्. डी. पाटील (२) प्रा. शा. न. पाटील (३) श्री. र. सो. नारखेडे (४) श्री. र. मा. मोरणकर (५) प्रा. डॉ. हेमंत चौधरी (६) प्रा. अकबर रहेमानी

*Cover Print* : **Shashikant Agency, Pune.**